मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | » सोमवार, १६ जून २०२५ | » वर्ष: १ » अंक:१९ | » पाने-८ | » किमत रु. २ + वितरण खर्च रु. १ एकूण रु.३


## दोषींवर कारवाई करणार - उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पूल कोसळल्याच्या घटनेबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कुंडमळा येथे स्थानिक प्रशासनाने तातडीने मदत आणि बचावकार्य सुरु केले आहे. जखमी नागरिकांना आवश्यक सर्व वैद्यकीय उपचार उपलब्ध करण्याचे निर्देशित देण्यात आले आहेत. या पुलाची अवस्था जीर्ण असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून, देखभालीबाबत कोणतेही दुर्लक्ष झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल," असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्य शासन या संकटाच्या काळात बाधित नागरिकांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, जखमींना आवश्यक ती वैद्यकीय मदत शासनामार्फत तातडीने दिली जाईल.

## अग्रलेख — खरीखरी

### कुंभोत्सव साजरा करा!

काही दिवसांपूर्वी आम्ही नाशिकला कार्यक्रमासाठी जाऊन आलो. नाशिकमध्ये २०२६-२७ मधील जो कुंभमेळा होणार आहे. त्या कुंभ मेळ्यासाठी जय्यत तयारी सुरु असेल, असे आम्हाला वाटले. मुद्दाम चौकशी केली. पण गंमत अशी की, अजून पर्यंत नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी कोणत्याही प्रकारचे व्यवस्थापन सुरु झालेले नाही. मागील वर्षी प्रयागराज येथे अतिशय मोठ्या प्रमाणावर कुंभमेळ्याचे नियोजन आणि व्यवस्था करण्यात आली होती, असे म्हणतात की त्यांची तयारी पाच वर्षांपूर्वीपासून सुरु होती. त्याउपर असेही म्हणतात की, कुंभमेळ्यामुळे उत्तर प्रदेश सरकारला कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. अनेकांसाठी हजार रुपये भाड्याच्या टेंट पासून कुंभमेळ्याच्या म्हणजेच सिंहस्थाच्या तयारीचे प्रत्यक्ष दर्शन पदोपदी होत होते. इथे आपल्या नाशिक क्षेत्री नाशिक की त्र्यंबकेश्वर यातच वाद सुरु झाला आहे. आखाडा परिषद, साधू महंत याबाबत चांगलीच बोंबाबोंब करीत होते. या सिंहस्थाच्या अमृत स्नानाच्या तारखा निश्चित होत नव्हत्या. या सर्व प्रकारामुळे आखाडा परिषद, साधू-महंत आणि पुरोहित संघ यांच्यात वरीच खडाजंगी झाल्याचे वृत्त कानी आले होते. खरे म्हणजे अमृत स्नानाच्या तारखा निश्चित करण्याचे पुरोहित संघ आणि साधू-महंत यांचाच पुढाकार असतो. या सिंहस्थात किंवा कुंभमेळ्यात एकूण सहा वेळा अमृतस्नान होत असते. त्यातील तीन शैवांची व तीन वैष्णवांची अशी स्नानांची विभागणी असते. सिंहस्थ पर्वासाठी सरकार, पोलीस प्रशासन, त्यासह इतर यंत्रणाही सज्ज होणे गरजेचे असते. मुख्यमंत्र्यांनी अमृतस्नानाच्या तारखा जाहीर करणे. म्हणजे आखाड्यातील सुंदोपसुंदी चालू असल्याचे हे लक्षण आहे. आपल्या देशात हा कुंभमेळा नाशिकच्या नावाने प्रसिद्ध आहे. पण यावेळी त्र्यंबकेश्वर - नाशिक असे या सिंहस्थाचे नाव राहणार आहे. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी नाशिकपेक्षा त्र्यंबकेश्वरला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून आले असे म्हणता येईल. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे इतर ठिकाणच्या कुंभमेळ्याचे कार्य कितीतरी आधी सुरु होत असते. कुंभमेळ्याचे सर्व जगाला आकर्षण आहे. यासाठी मोठ्या नियोजनाची गरज असते. अनेक विकासकामे करावी लागतात. सध्या केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकाच पक्षाचे असल्यामुळे कुठेही अडचण येण्याची शक्यता नाही. कुंभ मेळ्यासाठी जवळजवळ २५ हजार कोटी रुपयांचे आराखडे तयार झाले. परंतु त्यावरही सरकारकडून अद्याप निर्णय झालेला नाही असे म्हणतात. आम्ही दहा ते बारा दिवसांपूर्वी नाशिक मध्ये होतो तोपर्यंत सरकारकडून दमडीही आली नव्हती. जवळजवळ सहा हजार कोटी रुपयांच्या सुरुवातीच्या कामांचा प्रारंभ ही न झाल्याचे सांगण्यात येते. गोदावरीच्या स्वच्छतेसाठी १५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची निविदा निघाल्याचे सांगतात. त्याला स्थानिक शिवसेनेने आक्षेप घेतलेला आहे, असे म्हणतात. तिकडे साधू - महंतांच्या निवासासाठी जी जमीन पाहिजे. त्या नियोजनाची अजून सुरुवातही झालेली दिसत नाही. प्रयागराजा प्रमाणे नाशिक राजाचे ही जबरदस्त आकर्षक व्यवस्थापन होइल, अशी अपेक्षा होती. परंतु उत्तर प्रदेश पेक्षा कित्येक पटीने श्रीमंत असलेल्या आणि पुढारलेल्या महाराष्ट्रात अजून सिंहस्थाच्या कार्यासाठी नियोजन समितीची घोषणाही करता आलेली नाही. त्या नियोजन समितीत साधु-संतांचा समावेश करावा. यासाठी जोरदार प्रयत्न चालू आहेत. पण तिथेही आलबेल आहे असे दिसत नाही. ज्या नाशिक क्षेत्री हा भव्य सोहळा होणार आहे. त्या जिल्ह्यासाठी प्रचंड बहुमत असलेल्या सरकारला अजून तरी साधा पालकमंत्री देता आलेला नाही. सिंहस्थ मेळ्याचा मेळ साधण्यासाठी सध्या गिरीश महाजन यांच्याकडे एकूण कारभार सोपवण्यात आलेला दिसतो. पण या जिल्ह्यातील बाकीचेही महत्त्वाचे लोकप्रतिनिधी या सिंहस्थ पर्वासाठी तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे, त्यांच्याकडेही महत्त्वाची कामगिरी सोपविणे गरजेचे आहे. या सिंहस्थाची धर्मध्वजा मतभेदांच्या आणि परस्पर अविश्वासाच्या ओझ्याखाली कशी फडकवली जाइल, हाच खूप महत्त्वाचा प्रश्न आहे. या सिंहस्थासाठी दहा ते पंधरा कोटी भाविक अत्यंत श्रद्धेने येणार आहेत. प्रयागक्षेत्री झालेल्या चेंगराचेंगरीत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली होती. तसा प्रकार शिस्तप्रिय आणि सर्वाधिक प्रगतीशील त्यासोबतच नियोजनवीर असलेल्या महाराष्ट्रात घडू नये किंवा तसा डाग लागू नये. अशी आमच्यासारख्या शुभ चिंतणाऱ्या आणि श्रद्धाळू माणसांची अपेक्षा आहे. प्रयागराज येथे ज्या प्रकारची महागडी व्यवस्था करण्यात आली होती. तशी व्यवस्था झाली नाही. तरी निदान पाहुणे क्रमांक- एक म्हणजे व्हीव्हीआयपी, पाहुणे क्रमांक- दोन म्हणजे व्हीआयपी, पाहुणे क्रमांक- तीन म्हणजे आयपी आणि पाहुणे क्रमांक- चार म्हणजे पी म्हणजेच सर्वसामान्य जनता या सर्वांनाच सोयी सवलतीने कुंभ पर्वाचे स्नान करता येइल. अशी व्यवस्था होणे गरजेचे आहे. नाशिकमधील मागील कुंभमेळ्यामध्ये अतिसुरक्षेमुळे सर्वत्रच अतिनाराजी झाली होती. त्यामुळे यावेळी सुद्धा नाशिक शहरात स्थानिक जनतेत अतिशय उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या राज्यातील कुंभमेळ्याला जागतिक प्रसिद्धी मिळवून दिली होती. कोणे एकेकाळी संपूर्ण देशातील अनेक भागांवर मराठी ध्वजा उंचावणाऱ्या महाराष्ट्राला आपल्या महाराष्ट्राचा झेंडा निर्वेधपणे फडकावून दाखवण्याची या सिंहस्थाच्या निमित्ताने संधी आहे. अशा या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कुंभात नियोजनाची गंगा ओतून, गोदावरीच्या तटावरील हा कुंभमेळा यशस्वी करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जनतेने करावा. तो निर्धार निर्विघ्नपणे सफल व्हावा. सर्वांनी कुंभोत्सव साजरा करावा, एवढीच आमची मनोकामना आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# कुंडमळा येथील इंद्रायणीवरील पूल कोसळला

## चौघांचा मृत्यू, ३८ जणांना वाचवण्यात यश



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवर संपर्क करून येथील परिस्थितीबाबत माहिती घेतली.

**मावळ, दि. १५ प्रतिनिधी**

रविवार सुट्टीचा दिवस, पर्यटकांसाठी घातवार ठरला. मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील साकव पूल कोसळल्याने अनेक पर्यटक बुडाले. ही घटना साडेतीनच्या सुमारास घडल्याचं सांगण्यात येत आहे. घटनास्थळी पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तळेगाव दाभाडे पोलीस दाखल झाले. या घटनेत चौघांचा मृत्यू झाला असून नदीपात्रात अडकलेल्या ३८ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात पोलीस प्रशासन, अग्निशमन दल आणि एनडीआरएफच्या टीमला यश आले आहे. चार जण या दुर्घटनेत ठार झाले असून सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. पुलाच्या सांगाळ्याखाली दो ते तीन अडकले असल्याची शक्यता आहे.

कुंडमळा ओलांडण्यासाठी इंद्रायणी नदीवर हा पूल आहे. मोठ्या संख्येने पर्यटक या परिसरात आले असतांना, पूलावरुन पर्यटकांची ये-जा सुरू असताना हा पूल कोसळला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मावळातील तळेगाव दाभाडे आणि देहू गावच्या मध्ये कुंडमळा आहे. इंद्रायणी नदीवर कुंडमळा येथे वर्षाविहारासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असते. त्या ठिकाणी असणारा साकवपूल हा जुना झालेला आहे. आज दुपारी ही या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी झाली होती. हा पूल अत्यंत अरुंद आहे. तसेच या ठिकाणी मोठी वाहने जाऊ शकत नाही. पुलावर दुचाकी गेल्यानंतर हादरे बसतात. पुलावर दुपारच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर पर्यटक उभे राहून नदीतून वाहणारे पाणी पाहत होते. त्यावेळी अचानक लोखंडे आणि काँक्रीटमध्ये असणारा पूल कोसळला. आणि काही क्षणात पुलावरील सर्वजण नदीपात्रात कोसळले.

अचानक घडलेल्या या घटनेने या ठिकाणी तारांबळ उडाली. काही तरुणांनी पाण्यातून वाहून जाणाऱ्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला. आणि पुलावर असणारे अनेक जण नदीच्या पाण्यात वाहून गेले. अपघात झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी बघ्याची गर्दी झाली होती.

त्यानंतर काही वेळातच पोलीस आणि अग्निशामक दलाचे पथक दाखल झाले आहे व पाण्यात वाहून गेलेल्या पर्यटकांचा शोध घेतला जात आहे.

इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पूल अत्यंत जुना झाला आहे या संदर्भातील फलक या ठिकाणी लावला होता. या पुलाची दुरुस्ती ही अनेक वेळा केली आहे. तरीही त्या ठिकाणाहून वाहने नेण्यात येत होती. तसेच या परिसरात वाहतूक नियंत्रणासाठी कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती.

# अखेर विजय रुपाणींच्या मृतदेहाची ओळख पटली

**अहमदाबाद, दि. १५ वृत्तसंस्था**

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या विमानाचा १२ जून रोजी भीषण अपघात झाला. या अपघातात २४२ पैकी २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर या सगळ्यांचा मृत्यू झाला. याच विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणीही बसले होते. त्यांच्या मृतदेहाची ओळख पटत नव्हती. ही ओळख आता डीएनए चाचणीमुळे पटली आहे अशी माहिती समोर आली आहे. विजय रुपाणींचा डीएनए जुळला असल्याची माहिती रुग्णालयाने ११ वाजून १० मिनिटांनी दिली. त्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या कुटुंबाला देण्यात आले.

गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दिलेल्या माहितीनुसार विजय रुपाणी यांच्या पार्थिवावर राजकोट या ठिकाणी अंत्यसंस्कार केले जातील. पटेल यांनी दिलेल्या माहितीनुसार आत्तापर्यंत ४२ जणांचे डीएनए जुळले आहेत. तर १४ कुटुंबीयांना त्यांच्या कुटुंबातील सदस्याचं पार्थिव दिलं आहे. अनेक मृतदेह भीषण जळालेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे डीएनए चाचणी करुनच ते त्यांच्या नातेवाईकांना दिले जात आहेत असंही पटेल यांनी स्पष्ट केलं. एअर इंडियाच्या एआय १७१ या विमानाच्या अपघाताने देशभरात खळबळ उडाली आहे. या विमान दुर्घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. अहमदाबादहून लंडन गॅटविकला जाणारे हे एआय १७१ विमान होते. प्रवाशांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचादेखील समावेश होता. या



अपघातात त्यांचादेखील मृत्यू झाला आहे. विजय रुपाणी हे लंडनला त्यांच्या मुलाला आणि पत्नीला भेटण्यासाठी जात होते. त्यांनी सीटचा लकी नंबर घेतला होता. मात्र हा लकी नंबरही त्यांना वाचवू शकला नाही.

### अपघाताची चौकशी करण्यासाठी बोईंगची टीम अहमदाबादला दाखल

अहमदाबादमध्ये घडलेल्या एअर इंडियाच्या फ्लाईट AI-१७१ च्या विमान अपघाताची चौकशी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. या अपघातानंतर त्वरित भारतातील फॉरेन्सिक, एफएसएल, एटीएस (अँटी-टेररिस्ट स्क्वॉड) आणि एएआयबी (एअरक्राफ्ट ॲक्सिडंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो) अशा एजन्सींनी सखोल चौकशी सुरू केली होती. आता या चौकशीत अनेक आंतरराष्ट्रीय संस्था देखील सहभागी होत आहेत. या अपघाताच्या चौकशीत अमेरिकेच्या फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन (FAA), नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्ड (NTSB) यांसारख्या प्रतिष्ठित संस्था सहभागी होणार आहेत. याशिवाय, अपघातग्रस्त विमान तयार करणाऱ्या 'बोईंग' कंपनीची एक टीम आज अहमदाबादला दाखल झाली आहे. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची ही टीम भारतीय चौकशी संस्थांसोबत मिळून अपघातामागील मूळ कारणांचा सखोल तपास करेल. या संयुक्त चौकशीतून तांत्रिक बाबींसह इतर पैलूंवरही स्पष्टता येण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# तेल प्रकल्पांवरील हल्ल्यानंतर इराणचा इस्रायलवर मिसाईल्सने हल्ला

**तेल अव्हिव, दि. १५ वृत्तसंस्था**

शनिवारी रात्री उशिरा इराण आणि इस्रायलने पुन्हा एकदा एकमेकांवर अनेक क्षेपणास्त्र डागले. दोन्ही देशांमधील संघर्ष गेल्या अनेक तासांपासून सुरू आहे. इस्रायलने तेहरानमधील संरक्षण मंत्रालयाला लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. याशिवाय तेहरान आणि बुशहरमधील तेल डेपो आणि गॅस रिफायनरीसह १५० हून अधिक लक्ष्यांवर हल्ला करण्यात आला आहे. दोन दिवस चाललेल्या युद्धात आतापर्यंत १३८ इराणी मारले गेले आहेत, ज्यात ९ अणुशास्त्रज्ञ आणि २० हून अधिक इराणी कमांडर आहेत. याशिवाय ३५० हून अधिक जखमी झाले आहेत.

इराणची राजधानी तेहरानसह ७ राज्यांमध्ये हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आली आहे. इराणनेही इस्रायलवर १५० हून अधिक क्षेपणास्त्र डागून प्रत्युत्तर दिले आहे. हल्ल्यात ११ इस्रायली मारले गेले आहेत आणि ३०० हून अधिक जखमी झाले आहेत. इराणने ३ इस्रायली एफ-३५ विमाने पाडल्याचा दावाही केला आहे.

इराणने इस्रायलवर प्रगत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली

दरम्यान, इराणने इस्रायलवर



हल्ला करण्यासाठी एका नवीन आणि प्रगत बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर केला आहे. शनिवार-रविवार रात्री पहिल्यांदाच ते डागण्यात आले. फार्स न्यूजनुसार, या क्षेपणास्त्राचे नाव "हज कासिम" आहे, जे माजी कुद्स फोर्स कमांडर कासिम सुलेमानी यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. इराकमध्ये झालेल्या अमेरिकेच्या हल्ल्यात सुलेमानी मारले गेले होते. हज कासिम हे १२०० किलोमीटरच्या पल्ल्याचे घन इंधन मार्गदर्शित बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. त्यात एक वॉरहेड आहे, जे इस्रायलमध्ये तैनात असलेल्या पॅट्रियट आणि अमेरिकन THAAD सारख्या संरक्षण प्रणालींमध्ये प्रवेश करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. ते हायपरसोनिक वेगाने म्हणजेच सुमारे१४८०० किलोमीटर प्रति तास वेगाने हल्ला करते. रविवारी सकाळी इराणने केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इस्रायली नागरिकांची संख्या ८ झाली आहे. यामध्ये दोन मुले आणि ६ महिलांचा समावेश आहे. तर २०० लोक जखमी झाले आहेत. इराणी हल्ल्यात आतापर्यंत ११ इस्रायली नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, जखमींची संख्या ३०० च्या पुढे गेली आहे.

# बालाघाटमध्ये चार नक्षलवादी ठार

**बालाघाट, दि. १५ वृत्तसंस्था**

मध्यप्रदेश राज्यातील नक्षलग्रस्त बालाघाट जिल्ह्यातील सुरक्षा यंत्रणांना शनिवारी मोठे यश मिळाले आहे. रूपझर पोलीस ठाण्याच्या बिथली पोलीस चौकीच्या हद्दीत असलेल्या पचामा दादर भागात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत चार नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले आहे. त्यामध्ये तीन महिला नक्षलवादी आणि एक पुरुष नक्षलवादी यांचा समावेश आहे.

ही चकमक शनिवारी दुपारी सुरू झाली होती आणि रात्रीपर्यंत ही चकमक सुरू राहिली. सुरक्षा दलांकडून परिसरात शोध मोहीम



देखील राबविण्यात आली. यामध्ये ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले असून त्यांच्याकडून हँड ग्रेनेड, एसएलआर (सेल्फ लोडिंग रायफल), आणि इतर महत्त्वाचे शस्त्रास्त्र तसेच दैनंदिन वापरातील वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

ही कारवाई हॉक फोर्स आणि मध्यप्रदेश पोलिसांच्या संयुक्त पथकाने राबवली. ही मोहीम नक्षल निर्मूलनासाठी राबवण्यात आलेल्या नियोजनाचा एक भाग होती. बालाघाट जिल्हा गेल्या काही काळापासून नक्षल चळवळीच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. अशा परिस्थितीत पोलीस आणि हॉक फोर्स यांच्या संयुक्त कारवाईला मोठे यश मिळाले आहे. याबाबत बालाघाट जिल्ह्यात झालेल्या चकमकीत ४ नक्षलवादी ठार करण्यात आले आहेत. याबाबत मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी म्हटले आहे की, नक्षलवाद्यांमध्ये तीन महिला आणि 1 पुरुषाचा समावेश आहे. त्यांच्याकडून अनेक शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. या यशस्वी कारवाईसाठी राज्य सरकार पोलिसांना निश्चितच बक्षीस देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# आमच्यावर हल्ला केला तर अमेरिकन सैन्य पूर्ण ताकदीने उत्तर देईल - डोनाल्ड ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. १५ वृत्तसंस्था**

इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेला संघर्ष आता आणखी तीव्र होताना दिसत आहे. या संघर्षामुळे गेल्या दोन दिवसांत इराणमध्ये १३८ लोकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान आज पहाटे इस्रायलने इराणच्या अणु प्रकल्पाशी संबंधित ठिकाणांवर लढाऊ विमानांनी हल्ला केला आहे.



इस्रायली सैन्याने रविवारी सांगितले की त्यांनी तेहरानमधील इराणच्या संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयाला लक्ष्य केले. यासह इस्रायली सैन्याने तेहरानभोवती इराणच्या अणु प्रकल्पाशी संबंधित ठिकाणांनाही लक्ष्य केले आहे. दरम्यान रविवारी इराणवर झालेल्या हल्ल्यांशी अमेरिकेचा कोणताही संबंध नसल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. याचबरोबर डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला की, जर इराणने अमेरिकेवर कोणत्याही प्रकारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकन सैन्य त्याला पूर्ण ताकदीने उत्तर देईल.

याचबरोबर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, ते इराण आणि इस्रायलमध्ये सहजपणे करार करू शकतात आणि हा रक्तरंजित संघर्ष थांबवू शकतात. सोशल ट्रुथवर केलेल्या एका पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले की, "इराणवरील हल्ल्याशी अमेरिकेचा काहीही संबंध नाही. जर इराणने आमच्यावर कोणत्याही प्रकारे हल्ला केला तर अमेरिकन सैन्य त्याला पूर्ण ताकदीने उत्तर देईल, तसेच इतिहासात यापूर्वी कधीही पाहिली नाही अशी कारवाई करेल." या पोस्टमध्ये पुढे, त्यांनी इराण आणि इस्रायलमध्ये करार करण्याचा प्रस्तावही दिला आहे. ते म्हणाले "आपण इराण आणि इस्रायलमध्ये सहजपणे करार करू शकतो आणि हा रक्तरंजित संघर्ष संपवू शकतो!"

# शिवसेना फुटीमागे रश्मी ठाकरे?

## मंत्री गोगावले यांचा खळबळजनक दावा

**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे यांच्या कामाची जी पद्धत होती तशी उद्धव ठाकरेंची नव्हती. बाळासाहेब आपुलकीने वागवत होते. मात्र त्यांच्यानंतर जो काही कारभार सुरू झाला तो आम्हाला पटला नाही. महिलांनी किती हस्तक्षेप करायचा याला मर्यादा असतात. जर आघाडीवेळी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद दिले असते तर फार वेगळे चित्र असते. त्यात आदित्य ठाकरेंना मंत्रिपद दिले हे कुठल्याच शिवसैनिकाला पटले नाही. एकनाथ शिंदे श्रीकांत शिंदे यांना मंत्रिपद देऊ शकले असते परंतु त्यांनी प्रतापराव जाधवांना ते पद दिले. याला मोठेपणा म्हणतात. शिवसेनेत असताना ज्या काही घडामोडी घडत होत्या, त्यात वहिनी आणि त्यांच्या नातेवाईकांचा हस्तक्षेप असायचा. त्यात बऱ्याचदा इच्छा असतानाही उद्धव ठाकरेंना निर्णय घेता येत नव्हते असा खळबळजनक दावा मंत्री भरत गोगावले यांनी करत शिवसेना फुटीमागे रश्मी ठाकरेंचा हात असल्याचं थेट बोलले आहेत.

मंत्री भरत गोगावले म्हणाले की, त्या काळात जो काही प्रकार सुरू होता त्यावर आमचा आक्षेप होता. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात उठाव करून आम्ही ही भूमिका घेतली. पडद्यामागे वहिनींचा हस्तक्षेप बराच होता. उद्धव ठाकरेंच्या मनात काही गोष्टी असायच्या त्यात बदल व्हायचे. कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी होत नव्हत्या. वर्षावरून आम्हाला माघारी परतावं लागायचे. शिवसेना फुटीची अनेक कारणे आहेत. नेतृत्वाने सगळ्यांना सोबत घेऊन जायचे असते. कानात चुकीचे सांगणाऱ्यांना जवळ केल्याने हे प्रकार घडतात. संघटनेसाठी प्रामाणिक काम करणाऱ्याला फाट्यावर मारले तर हे घडते असं त्यांनी म्हटले.

# केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर अपघातात ७ ठार

**केदारनाथ, दि. १५ वृत्तसंस्था**

अहमदाबादमध्ये नुकत्याच झालेल्या विमान दुर्घटनेला अवघे काही दिवस झाले असताना, आता उत्तराखंडमधील केदारनाथधामजवळ मोठा हेलिकॉप्टर अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आर्यन एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायण दरम्यानच्या जंगलात कोसळले, आणि या भीषण अपघातात पायलटसह ७ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हेलिकॉप्टर डेहराडूनहून केदारनाथच्या दिशेने निघाले होते, मात्र काही वेळातच गौरीकुंडमध्ये ते बेपत्ता झाल्याची माहिती उत्तराखंडचे एडीजी लॉ अँड ऑर्डर डॉ. वी. मुरुगेशन यांनी दिली आहे. अपघाताचे कारण खराब हवामान असल्याचे





सांगण्यात येत आहे. दाट धुके आणि कमी दृश्यतेमुळे हेलिकॉप्टरने नियंत्रण गमावले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आर्यन एव्हिएशन कंपनीचे हेलिकॉप्टर यात्रेच्या हंगामात भाविकांना केदारनाथपर्यंत पोहोचवण्याची सेवा देत होते. या अपघातामुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर अवघ्या तीन दिवसांत झालेली ही दुसरी हवाई दुर्घटना असल्याने हवाई सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

आर्यन एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर केदारनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर सेवा देत होते. यात्रेच्या हंगामात हजारो भाविक हेलिकॉप्टरद्वारे केदारनाथ धाम गाठत असतात. दरम्यान, स्थानिक प्रशासन, पोलीस आणि एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल होत असून जखमी प्रवाशांना तातडीने रुग्णालयात हलवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अधिकृत मृतांची संख्या आणि इतर तपशील लवकरच प्रशासनाकडून जाहीर केला जाणार आहे. उत्तराखंडचे एडीजी कायदा आणि सुव्यवस्था डॉ. व्ही. मुरुगेशन यांनी घटनेबाबत माहिती देताना सांगितलं की, गौरीकुंडमध्ये बेपत्ता झालेले हेलिकॉप्टर कोसळले आहे. अपघातग्रस्त हेलिकॉप्टरमध्ये ७ जण होते. अधिक माहितीची प्रतीक्षा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी ५.१७ वाजता आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर केदारनाथ हेलिपॅडवरून गुप्तकाशी हेलिपॅडकडे ७ भाविकांना घेऊन निघाले. वाटेत खराब हवामानामुळे, हेलिकॉप्टर दुसऱ्या ठिकाणी कठीण लँडिंगला गेले त्यामुळे दुर्घटना झाली आहे.

मृतांमध्ये २ मुलांचाही समावेश आहे. हे हेलिकॉप्टर आर्यन एव्हिएशनचे होते. गौरीकुंडमध्ये हा अपघात झाला आहे, केदारनाथ धामहून फाटा येथे येणारे हेलिकॉप्टर कोसळले आहे. उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथील गौरीकुंड परिसरात एक मोठा अपघात झाला आहे. रविवारी सकाळी केदारनाथ मार्गावर एक हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये एकूण सात जण होते. या दुर्दैवी अपघातात सर्व जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथके घटनास्थळी रवाना करण्यात आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर रविवारी सकाळी कोसळले. गौरीकुंड परिसरात हा अपघात झाला.

### एक महिन्यातील चौथी घटना

- ८ मे: उत्तरकाशीमध्ये हेलिकॉप्टर कोसळले, 6 जणांचा मृत्यू
- १७ मे: केदारनाथमध्ये एअर ॲम्ब्युलन्स अपघात
- ७ जून: हेलिकॉप्टरचे चक्क रस्त्यावर आपत्कालीन लँडिंग

अहमदाबाद जवळ एअर इंडियाचं विमान तांत्रिक बिघाडानंतर कोसळलं. विमानात तांत्रिक अडचण आल्यावर, पायलट सुमित यांच्यासमोर होता फक्त एकच पर्याय. आपण मरणारच आहोत, पण इतरांना वाचवू शकतो का? जवळ होते फक्त ४० सेकंद. काय निर्णय घेणार? हजारो तास विमान चालवले असतील, शेकडो वेळा आणीबाणी अनुभवली असेल. पण ती खरी परीक्षा होती त्या ४० सेकंदांची. विमान खाली कोसळत असताना, सुमित यांनी ते विमान क्षणात दाट लोकवस्तीतून वळवलं व जिथे कमी हानी, कमी मृत्यू होईल अशी जागा निवडली. ते विमान वस्तीवर नव्हे, तर मोकळ्या मैदानात घेऊन गेलात आणि वस्ती वाचली. त्यांचं स्वतःचं जीवन संपलं, पण दुसऱ्यांसाठी ते मात्र अमर झाले. एवढेच काय तर स्वतःचा जीव वाचवायचा ठरविले असते तर त्यांनी विमानातून उडी देखील मारली असती. कदाचित पायलट म्हणून ट्रेनिंग घेताना त्यांना काही शिकवण दिलेली असेल, त्यानुसार ते वागले. परंतु आता वाचलेल्या व मृतांबद्दल वेगवेगळी विधाने करून जनतेत चुकीचे संदेश पोहोचविले जात आहेत. त्यात अंधश्रद्धेचा भाग मोठा दिसून येतो. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांचा १२०६ हा आकडा लकी असल्याचे समजते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील दुचाकी असो किंवा चार चाकी, प्रत्येक गाडीला १२०६ हा नंबर ठरलेला असायचा. परंतु तो नंबर लकी होता की अनलकी होता, याच्या खोलात जायचे नाही. कारण त्यांचा मृत्यू देखील १२०६ याच तारखेला झाला. खरे तर अपघात झाल्यानंतर आता जे अपघातातून वाचले ते आणि श्रद्धाळू लोक देवाच्या कृपेमुळे वाचले असे म्हणून मोकळे होतात. पण जे अपघातात गेले ते देवाच्या अवकृपेमुळे गेले असा त्याचा अर्थ होतो असे वाटत नाही का? अपघातात जे गेले त्यांना मृत्यू योग होता असे आता कोणीही ज्योतिषी म्हणू लागला तर ती थाप आहे असे समजावे. अपघात याचा अर्थ तो कुणीतरी घडवून आणलेला नसतो किंवा तो पूर्वीच कोणीतरी नक्की केलेला नसतो. अपघात घडण्यामागे अनेक प्रकारची विविध भौतिक व मानसिक कारणे असतात आणि ही कारणे आपणाला लक्षात न आल्याने अपघात घडतात. प्रारब्ध, संचित, नशीब वगैरे अपघात झाल्यानंतरच्या तयार झालेल्या संकल्पना असतात. एखाद्याला रोगाचे निदान होणे हे प्रारब्ध नसते. तसेच अपघात घडणे म्हणजे संचित नशीब वगैरे काही नसते. ती एक विश्वात घडणारी नेहमीची अपघाती घटना असते. मात्र अशा घटनांचे भांडवल करणारे दैव, भविष्य, देव वगैरे गोष्टींशी जोडून लोकांना आणखी आंधळे बनवतात आणि गंमत अशी असते की, अपघात झाल्यानंतरच हे सगळे जागे होतात. अपघात होण्यापूर्वी ते कधीही पूर्वसूचना देत नाहीत. तसे केले तर अपघात तरी टाळता येईल. वैचारिक क्षेत्रात असलेली ही सगळी भोंदूगिरी आहे एवढे लक्षात ठेवले तरी पुरेसे ठरेल!

# विमान अपघातामुळे वैचारिक भोंदूगिरी उघड!





अनेकजण देवाची करणी म्हणून या घटनेकडे पाहू लागले आहेत. देव एवढा सिलेक्टिव्ह कसा होतो? ज्यांना तो वाचवतो ते कोणी थोर व्यक्ती असतात की काय ? पुण्यवान वगैरे? आणि ज्यांना तो मारतो त्या व्यक्ती कनिष्ठ असतात की ? पापी वगैरे? एवढा साधा विचार सुद्धा न करता अमुक स्तोत्र म्हटले, अमुक मंत्र जप केला, अमुक दैवाचा धावा केला म्हणून वाचलो म्हणणारे जे त्या अपघातात गेले त्यांना ते हिणवतात असा अर्थ होतो. पण याबाबतची जाणीव त्यांना अशावेळी कोण करून देणार? या भीषण विमान अपघातात अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला. यात हरियाणातील कुरुक्षेत्र येथील रहिवासी अंजू शर्मा यांचाही समावेश आहे. लंडनला आपल्या मुलीला भेटायला जाण्याची त्यांची इच्छा अपूर्णच राहिली. या हृदयद्रावक घटनेमुळे अंजू यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघातापूर्वी अंजू यांनी सोशल मीडियावर 'आदमी खिलौना है' अशी एक पोस्ट केली होती, जी पाहून शोकाकुल कुटुंबियांना असे वाटत आहे की, त्यांना कदाचित आपल्या मृत्यूची पूर्वकल्पना आली असावी. त्यावर सर्वत्र चर्चा सुरू झाली की अंजू यांना मृत्यूची चाहूल लागली होती. याला काही अर्थ आहे का? महाराष्ट्रातील अकोल्याची एक विद्यार्थिनी गुजरात मधील अहमदाबाद येथे वैद्यकीय शिक्षण घेत होती. ज्या हॉस्टेलवर विमान कोसळलं त्या हॉस्टेलवर ती पाचव्या मजल्यावर झोपलेली होती. ऐश्वर्या तोष्णीवाल असे तिचे नाव असून २२ वर्षीय ऐश्वर्याला अचानक मोठा आवाज ऐकू आला आणि धुराचे आणि आगीचे लोळ संपूर्ण इमारतीत दिसून आले. त्यावेळी समय सुचकता दाखवत जवळ पडलेल्या चादरीमध्ये तिने स्वतःला गुंडाळून घेत पाचव्या मजल्यावरून ती खाली उतरली. ती या अपघातातून बालंबाल बचावली आहे. याला अचूक अशी समयसूचकता या शिवाय दुसरे काय विशेषण लावणार? पायल खटिक नावाची प्रवासी तर खूप आनंदी होती. ती प्रथमच विमानात बसली होती आणि लंडनला जात होती. खासगी कंपनीत पायल चांगल्या नोकरीवर होती. कंपनीच्या कामातून तिला लंडनला पाठवले जात होते. पण अहमदाबाद अपघातातही पायल हिचेही निधन झाले. पायलच्या वडिलांचे नाव सुरेशभाई खटिक आहे. ते लोडिंग रिक्षा म्हणून काम करतात. असेच करून त्याने आपल्या मुलीला पायलला खूप शिकवले. पायलनेही त्यांना कधीही निराश केले नाही. पायलने खूप चांगला अभ्यास केला आणि चांगली नोकरी मिळवली. काही क्षणातच पायलच्या कुटूंबाची सर्व स्वप्ने नष्ट झाली आहेत, जी त्यांनी आपल्या मुलीबरोबर पाहिली असावी. जेव्हा विमान अपघाताची बातमी आली तेव्हा पायलच्या कुटुंबातच नव्हे तर सर्वत्र शोक व्यक्त केला जात होता. याला दुर्दैव याशिवाय अन्य काय विशेषण लावणार? अपघात झाल्यानंतर विमानाचा अपघात झाला की, एका व्यवस्थेचा अपमान झाला, हा प्रश्न




नक्कीच चर्चेत आला आहे. एका विमानाचा अपघात झाला. प्रवासी गेले, पायलट गेले. आकाशात भराऱ्या मारणाऱ्या त्या यंत्रमानवाचा जमिनीवर चुराडा झाला. त्याहीपेक्षा अधिक भयानक गोष्ट म्हणजे त्यावर सुरू झालेली भंपक चर्चा होय. सरकार दुःख व्यक्त करेल. चौकशी सुरू होईल. ब्लॅक बॉक्स सापडेल आणि काही आठवड्यांत सत्याचा आवाज ब्लॅक बॉक्समध्येच बंद होईल. पायलटचे शेवटचे शब्द महत्वाचे असतात. आता इथे एअरपोर्ट कोणाचा? हा पण प्रश्न आहे. माहितीनुसार हा अपघात अदाणी ग्रुपच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या विमानतळावर झाला. साध्या गोष्टींची तपासणी झालेली होती का? रनवेवर अडथळे होते का? रनवेचा टेक्सचर घसरट तर नव्हता ना? इमर्जन्सी प्रोटोकॉल प्रभावी होता का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं कधीच दिली जाणार नाहीत. कारण एअरपोर्ट खासगी गटाकडे आहे आणि त्या गटाला प्रश्न विचारणं म्हणजे 'देशद्रोह' ठरवलं जाईल.

ज्या देशात हजारो लोकं अजूनही रेल्वेच्या दारात लटकून प्रवास करतात, तिथं एखाद्या विमान अपघातावर टीका करणं हे म्हणजे राजकारण करणं ठरतं. पण मग हेच सरकार उद्या एखाद्या प्रचारसभेत हेच म्हणणार की, शेजारी देशाच्या कटामुळे आपलं विमान कोसळलं. आपण किती धोके पत्करतो, तरीही जिंकतो. हे सरकार जनतेसाठी जीव धोक्यात घालून लढतं. त्यावर कोणालाच प्रश्न विचारायचा नाही. नाहीतर ट्रोल, देशद्रोही, राजकीय प्रेरित अशा शब्दांनी तुम्हाला सजविले जाईल. काल परवाचा विमान अपघात फक्त एक यंत्र अपयशी ठरलं म्हणून झाला, असं मानणं भयंकर भोळेपणा ठरेल. तो अपघात होता, संकुचित व्यवस्था विचारांचा व प्रश्न न विचारणाऱ्या समाजाचा आणि अपारदर्शक खासगीकरणाच्या राजकारणाचा. आपण या मृत्यूंचं स्मरण करत आहोत. पण त्याहून अधिक, आपण या व्यवस्थेला आरसा दाखवतोय. ही फक्त दुर्घटना नव्हती. तो एक इशारा होता. आपल्याला पुन्हा विचार करायला लावणारा आणि कृती करायला प्रवृत्त करणारा. दुर्घटना कितीही भयानक असली तरी इथला बहुसंख्य आणि सर्वधर्मीय समाज हा दैववादी असल्यामुळे याची जबाबदारी प्रारब्ध, नशीबाला देणारा असल्यामुळे इथल्या सत्ताधाऱ्यांना काही काळजी करायचं कारण नाही. त्यांचा कुणी राजीनामा मागणार नाही. मागणाऱ्याला उलट अशा घटनेचं राजकारण केल्याबद्दल नालायक ठरवतील. सर्वात निर्लज्जपणाचा कळस ते लोक करतात जे योगायोगाने या घटनेतून वाचतात आणि आपल्या वाचण्याचं श्रेय देवाला देतात. त्या मेलेल्या २६५ लोकांनी काय घोडं मारलं होत? विमानातील चिमुरड्यांनी त्यांच्या वयात काय पाप केलं असेल? जर ती बालकं निरागस असतील तर देवाने त्यांनाही वाचवायला काय हरकत होती? असो, अपघातात गेलेले व वाचलेले आपापल्या परीने दैवाला दोष कींवा श्रेय देत असतील तर तुम्ही आम्ही काहीच करू शकणार नाही!

### विमानात भगवद्गीता जळालीच नाही?

असे म्हटले जात आहे की, जर त्या विमानात भगवद्गीता होती तर त्या विमानाचा अपघात होऊन माणसे मृत्युमुखी पडलीच कशी? पण काही लोकांच्या लक्षात शास्त्र येत नाही. आगीत जाड पुस्तक, जसे की भगवद्गीता, पूर्णपणे जळणे कठीण असते, याची काही वैज्ञानिक आणि तांत्रिक कारणे आहेत. याचा अर्थ असा नाही की पुस्तक जादुईरित्या जळत नाही, तर त्याच्या भौतिक रचनेमुळे आणि आगीच्या स्वरूपामुळे काही अंशी संरक्षण मिळते. जाड पुस्तकांमध्ये अनेक पाने एकत्र दाबलेली असतात, ज्यामुळे हवेचा प्रवाह (ऑक्सिजन) पुस्तकाच्या आतल्या भागापर्यंत पोहोचणे कठीण होते. आग लागण्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात: इंधन (कागद), उष्णता आणि ऑक्सिजन. जाड पुस्तकात ऑक्सिजनचा पुरवठा मर्यादित असतो, त्यामुळे आतले पान जळत नाहीत, फक्त बाहेरील पृष्ठे किंवा कव्हर जळते. कागद प्रामुख्याने सेल्युलोजपासून बनलेला असतो, जो उच्च तापमानात जळतो. परंतु, जाड पुस्तकात कागदाच्या अनेक थरांमुळे उष्णता आतल्या भागापर्यंत पोहोचण्यास वेळ लागतो. यामुळे पुस्तकाचा बाहेरील भाग जरी जळाला तरी आतला भाग अर्धवट जळलेला किंवा काहीसा सुरक्षित राहू शकतो. जेव्हा पुस्तकाच्या बाहेरील पृष्ठांना आग लागते, तेव्हा कागद कार्बनाइज होऊन कोळशासारखा थर तयार होतो. हा थर उष्णता आणि ऑक्सिजनला आत जाण्यापासून अंशतः रोखतो, ज्यामुळे आतली पाने जळण्यापासून वाचू शकतात. पुस्तकाचा आकार आणि रचना जाड पुस्तके, विशेषतः हार्डकव्हर किंवा घट्ट बांधलेली पुस्तके, आगीच्या संपर्कात असताना पूर्णपणे जळण्यास जास्त वेळ लागतो. जर आग लवकर विझवली गेली किंवा तीव्रता कमी असेल, तर पुस्तकाचा मध्य भाग जळत नाही. काही लोककथांमध्ये असे सांगितले जाते की, पवित्र ग्रंथांना आध्यात्मिक शक्तीमुळे आग लागत नाही. परंतु, वैज्ञानिकदृष्ट्या यामागे वरील भौतिककारणेच असतात.

# महाराष्ट्र राज्य समाज कल्याण न्यासच्या प्रदेशाध्यक्षपदी म्हात्रे; उपाध्यक्षपदी आरोटे

**शिर्डी ।** महाराष्ट्र राज्य समाज कल्याण न्यास या संस्थेच्या प्रदेशाध्यक्षपदी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे नेते माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची तर प्रदेश उपाध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वास आरोटे यांची निवड करण्यात आली.

शिर्डी येथे समाज कल्याण न्यास संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी हास्य प्रबोधनकार संस्थेचे प्रवक्ते संजीवन म्हात्रे होते. तर व्यासपीठावर समाज कल्याण न्यास या संस्थेचे संस्थापक थोर धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी स्वप्निल भोईर, प्रदेश संपर्कप्रमुख योगेश बेनके, प्रदेश प्रवक्ता संजीवन म्हात्रे, प्रदेश कार्याध्यक्ष नारायण



पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. किशोर पाटील, प्रदेश अध्यक्ष शिक्षक सेना सुधीर जावळे, सचिव संजय फुलसुंदर, प्रदेश संपर्कप्रमुखडॉ.मनिलाल शिंपी, प्रदेश कोकण विभाग अध्यक्ष शंकर खारीक, ठाणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, ठाणे जिल्हा सचिव विलास भोईर, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देवळीकर, नाशिक जिल्हा अध्यक्ष मूलचंद भगत, कार्याध्यक्ष अजित गायधनी, बीड जिल्हाध्यक्ष फारुख शेख, धुळे जिल्हाध्यक्ष समाधान पाटील, ठाणे जिल्हा महिलाध्यक्षा नलिनी चौधरी, नाशिक जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष गायत्री पगार, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र काबाडी, ठाणे महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष ॲड शुभांगी निचिते, भिवंडी शहर जिल्हाध्यक्षा स्वाती कांबळे, पालघर जिल्हाध्यक्ष प्रकाश देवळीकर, ठाणे जिल्हा महिलाध्यक्ष नलिनीताई घरत, पालघर जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा अंजलीताई चौधरी आदींची राज्यातील जम्बो कार्यकारणी जाहीर करून पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. भिवंडी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुरेश म्हात्रे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीने नवचैतन्य प्राप्त झाले असून अनेक वर्षांपासून त्यांनी या संस्थेचे कामकाज पाहिले. समाज कल्याण या संस्थेचे संस्थापक सोन्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने उत्तर देताना हार तुरेसह अनाठाई खर्चाला फाटा देऊन सर्वांनी पेन, वही विद्यार्थ्यांना देऊन वाढदिवस साजरा करण्यासाठी प्रत्येकाने आपल्याकडे येण्यापेक्षा आपल्या मतदारसंघांमध्ये सामाजिक उपक्रम घेऊन गोरगरिबांना जेवणासह साहित्य वितरण करण्याचा संकल्प करा, असे सांगितले. आभार प्रदर्शन संस्थेचे प्रवर्तक जे.के.पाटील यांनी केले.

# निफाड तालुक्यातील प्रमुख नद्या प्रदूषण, पानवेली मुक्त करा : मनसेची मागणी

**पिंपळगाव बसवंत ।** निफाड तालुक्यातील प्रमुख नद्या या प्रदूषण व पानवेली मुक्त करा, अशी मागणी निफाड तालुका मनसेच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली आहेत. राज ठाकरे यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम मार्गदर्शनाखाली याविषयी नायब तहसीलदार सविता पठारे यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, निफाड तालुक्यातील प्रमुख असणाऱ्या गोदावरी, कादवा, बाणगंगा, पाराशरी व शिव नद्यांचे पाणी दूषित होत चालले आहे. याच नद्यांच्या पाण्याने लाखो शेतकऱ्यांचे व जीवितांची तहान भागवली जाते. ह्याच नद्यांच्या पवित्र पाण्यावर अनेकांच्या उपजीविका, उद्योग व्यवसाय अवलंबून आहेत. सद्यस्थितीत नद्या प्रचंड प्रदूषित होत आहेत. सर्व नद्यांची अवस्था अंत्यय बिकट होत आहे. ह्याच नद्यांचे पाणी आज पिण्यासाठी चिंताजनक व त्रासदायक ठरत आहे. नदीचे प्रदूषण वाढल्यामुळे या पाण्याने जीवितास व शेती व्यवसायात मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात. संपूर्ण नद्यांचे पाणी दूषित दुर्गंधीयुक्त झाले आहेत. येत्या आठ दिवसात नद्या साफसफाई कामास प्रत्यक्ष सुरुवात करावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेनावर उपजिल्हाध्यक्ष प्रकाश गोसावी, वाड तालुकाध्यक्ष संजय मोरे, राजेंद्र भवर, तुषार गांगुर्डे, दादा शेलार, निलेश सोनवणे, ज्योती बागल, सुयोग गायकवाड, जयेश ढिकले, गणेश कदम, मिलिंद कांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'जॉगर्स क्लब ऑफ नाशिक' फलकाचे अनावरण

**नाशिक ।** जॉगर्स क्लबच्या बोर्डाचे व नाशिक क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांचा सत्कार नाशिक मध्यच्या आमदार देवयानी फरांदे यांच्या हस्ते झाला. यावेळी सर्वात प्रथम गुजरात मध्ये विमान अपघातात मृत्यू पावलेली सर्व प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून सर्वांजण दोन मिनिट उभे राहिले. नाशिक मधील सर्वात जुना जॉगर्स क्लब ३५ वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. त्यामुळे मैदानावर कायापालट आमदार देवयानी फरांदे यांच्या निधीतून १५ कोटी रुपये खर्च करून ग्राउंड व क्रिकेट मैदानाचा वास्तु उभी केली. त्यामुळे जॉगर्सचा बोर्ड, टॉवर वॉचचे अनावरण



करण्यात आले. तसेच नाशिक क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष व पदाधिकारी यांची निवडणूक होऊन सर्व पॅनल बहुमताने निवडून आल्याबद्दल त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश कुटे यांनी केले. स्वागत कृष्णा नागरे यांनी केले. आमदार देवयानी फरांदे यांचा सत्कार अध्यक्ष दीपक भोसले यांनी केला. यावेळी जॉगर्सचे अशोक सावंत, विनोद शहा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार फरांदे यांनी अजून मैदानावर नवीन नवीन सुविधा करायची आहे असे सांगितले. कार्यक्रमासाठी जॉगर्सचे सभासद शेखर निकुंभ, विनय बिरारी, उदय कोठावदे, दीपक काळे, जगदीश गडकरी, अजय गुप्ता, अजय गुप्ता, भरत गुरव, विक्रांत मते, जगदीश पोद्दार, हेमंत गोसावी, बाळू मंडलिक, राजा भांडारकर आदी सर्व उपस्थित होते.

# प्रहारच्या बच्चू कडूंच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा

## देवळ्यात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे आंदोलन

**देवळा ।** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू हे विविध मागण्यांसाठी गेल्या आठ दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन करत असून त्यांच्या या आंदोलनाला देवळा तालुका प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने आंदोलन करीत पाठिंबा दिला. यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात आंदोलन होऊन देवळा पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनाचा आशय असा की, बच्चू कडू यांच्या मागण्यांचा शासनाने तात्काळ सकारात्मक विचार करावा. अन्यथा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यांना जर काही नुकसान झाले तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठेल, असा इशारा प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी



दिला. प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने स्पष्ट केले की, बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली मागास, वंचित, दिव्यांग, शेतकरी, बेरोजगार यांच्यासाठी सुरू असलेला लढा न्याय्य असून त्यास व्यापक पाठिंबा मिळत आहे. शासनाने त्यांच्या मागण्या त्वरीत मान्य करून आंदोलन शांततेत मार्गी लावावे, अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली. या आंदोलनात उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख चंद्रभान गांगुर्डे, तालुकाध्यक्ष माधव शिरसाठ, उपाध्यक्ष दीपक देवरे, प्रकाश सावंत, बापू अहिरे, आकाश सावंत,कुबेर जाधव , शशिकांत पवार, भाऊसाहेब मोरे, पोपट मोरे, केदा चव्हाण, रंजना शिरसाठ, कविता सावंत, सुपडू चव्हाण, ज्ञानेश्वर शेवाळे, तुकाराम सोनवणे, दिलीप बच्छाव, शितल सोनवणे, विलास भदाणे आदींसह प्रहार संघटनेचे कार्यकर्ते व मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.

# सिव्हीलमधील ठेकेदाराच्या कारनाम्यांचा पर्दाफाश!

## वृत्त मालिका थांबवण्यासाठी दबाव तंत्र

**नाशिक ।** सिव्हिल हॉस्पिटल मधील विविध कामांच्या आडून होत असलेला कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराला दै. महासागरने वाचा फोडल्यानंतर संबंधित ब्लॅकलिस्टेड गेटवेल डिस्ट्रीब्युटर कंपनीच्या ठेकेदाराचे धाबे दणाणले आहे. संबंधित ठेकेदाराचे काळे कारणामे उघड झाल्यामुळे तो अक्षरशः सैरभैर झाला असून आपले उद्योग झाकण्यासाठी त्याच्याकडून विविध प्रकारे दै.महासागरवर अप्रत्यक्षरीत्या दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र सर्वसामान्य जनतेच्या पैशांची अशा पद्धतीने लूट करणाऱ्या व्हाईट कॉलर माफियांचा बुरखा फाडण्यासाठी महासागर देखील दबाव झुगारून सज्ज झाला आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या सिव्हिल हॉस्पिटललाच आता भ्रष्टाचाराचा दुर्धर रोग झाल्याने सिव्हिल हॉस्पिटलला आता खऱ्या अर्थाने उपचाराची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सुरू असल्या ऑपरेशन थिएटरचे आधुनिकीकरण आणि आधुनिक प्रस्तुतिगृहाचे काम २० टक्के देखील झालेले नसताना काम पूर्ण झाल्याचे दाखवून संबंधित ब्लॅकलिस्टेड गेटवेल डिस्ट्रीब्यूटर




कंपनीच्या ठेकेदाराने मार्च महिन्याच्या आडून तब्बल ४ कोटी ७४ लाख रुपयांचे देयक काढून घेतले आहे. त्याच्या सत्यतेसाठी 'महासागर'ने अपूर्ण असल्याचे कामाचे जीपीएस फोटो यापूर्वीच जनतेसमोर आणले आहेत. या कामांचे कंत्राट मिळण्यासाठी ठेकेदाराने चक्क निविदेमध्ये खोटी माहिती भरून शासनाच्या डोळ्यात अक्षरशः धूळफेक केली आहे.

संबंधित ठेकेदाराने सिव्हिल सर्जन शिंदे यांच्या आशीर्वादाने कंत्राट पदरी पाडून




**सिव्हील हॉस्पिटलमधील गैरकारभाराचा... पंचनामा**

घेतल्याचे आता जगजाहीर झाले आहे. सर्वात महत्त्वाची बाब कुठलाही अनुभव नसलेल्या ठेकेदारास थेट सहा कोटी रुपयांचे तांत्रिक काम दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या कंपनीच्या अडून कोणी भलताच ठेकेदार काम करीत आहेत याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्याची मागणी होत आहे. या ठेकेदाराला कामाचा खरोखर अनुभव आहे का? की याच्या अडून भलताच कुणी काम करतो आहे. याची वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. या ठेकेदाराचे अनेक कारणाने यापूर्वी दैनिक महासागरने वृत्त मालिकेच्या स्वरूपात जनतेसमोर मांडले असून त्यामुळे हा ठेकेदार सैरभैर झाला असून वेगवेगळ्या पद्धतीने दै. 'महासागर'वर अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सिव्हिल हॉस्पिटल मधील

> सरकार सामान्य माणसाच्या खिशातून वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्स घेते आणि व्हाईट कॉलर माफिया वेगवेगळ्या मार्गाने त्या पैशांवर डल्ला मारत आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार कधी थांबेल आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता कधी येणार असा उद्विग्न सवाल आता सर्वसामान्य करदात्याकडून विचारला जात आहे.

कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर शासकीय यंत्रणेला भ्रष्टाचाराची अक्षरशा कीड लागल्याने सर्वसामान्यांच्या करांच्या पैशांची अशा पद्धतीने व्हाईट कॉलर माफीयांकडून लूट केली जात आहे. याबाबत कुणी जाब विचारणार आहे का ? सर्वसामान्य जनतेसाठी मिळणाऱ्या औषधांमध्ये देखील या भस्मासुरांनी भ्रष्टाचार केला आहे. याच्या सत्यतेचे दै 'महासागर'ने यापूर्वीच या प्रकरणाचे ही पुरावे उघड केले आहेत. ब्लॅक लिस्टेड ठेकेदार हा संदर्भ रुग्णालयाला वेगळ्या दराने औषधे पुरवतो आणि सिव्हिल हॉस्पिटलला मात्र तिच औषधे चढ्या दराने विकतो. दोन्ही ठिकाणी औषधे पुरविण्याचा ठेका गेटवेल डिस्ट्रीब्यूटर या ब्लॅकलिस्टेड कंपनीकडेच असून तरीही एकीकडे दुसरा दर आणि दुसरीकडे वेगळा दर इतकी मोठी तफावत का? असाही सवाल उपस्थित केला जात आहे. यामध्ये शासकीय यंत्रणा दोषी आहे की ठेकेदार याचाही तपास करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अद्याप कुठलीही प्रतिक्रिया न आल्याने किंबहुना याबाबत कारवाई साठी कुठलीही वरिष्ठ यंत्रणा पुढाकार घेत नसल्याने संपूर्ण यंत्रणाच भ्रष्ट झाल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे.त्यामुळे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये होत असलेला भ्रष्टाचार देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच होत असल्याचे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे आरोग्याच्या मंदिराला आता भ्रष्टाचाराची कीड लागली असून सिव्हिल हॉस्पिटललाच आता खऱ्या अर्थाने उपचाराची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

**जिल्हा शासकीय रुग्णालया-संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास दै. महासागर, 0253- 4513384 यावर संपर्क साधावा.**

# भाऊलाल शेळकेंना दोष मुक्ततेच्या नावाखाली अभय?

## अग्रीम न मिळाल्याने कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड

**नाशिक ।** सिंचन विभागाच्या लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक भाऊलाल शेळके यांच्या विरोधात पुन्हा एकदा गंभीर आरोपांनी वादळ उठले आहे. अलीकडेच एका गंभीर प्रकरणात त्यांना कोणतीही चौकशी न करता केवळ एका खुलाशाच्या आधारे दोषमुक्त करण्यात आल्याने, ही प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या निर्णयावर सध्या जोरदार चर्चा सुरू असून, शेळके यांना पुन्हा एकदा चौकशीत ओढण्याची मागणी जोर धरत आहे.

एका गंभीर प्रकरणात तत्कालीन अधीक्षक अभियंता यांनी कोणतीही स्वतंत्र चौकशी न करता शेळके यांचा खुलासा ग्राह्य धरून त्यांना दोषमुक्त केल्याने, या निर्णयाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात शासनाचे थेट नुकसान झाले नसल्याचा दावा असला तरी, सामान्य कर्मचाऱ्यांचे मात्र आर्थिक कंबरडे मोडले आहे. शेळके यांनी २०१९-२० दरम्यान घरबांधणी अग्रीम प्रस्तावाची ज्येष्ठता यादी अधीक्षक अभियंता व प्रशासकी यांची स्वाक्षरी न घेता परस्पर शासनास सादर केल्याचा आरोप होता. या प्रकरणी तत्कालीन अधीक्षक अभियंता व प्रशासक अलका अहिरराव यांनी शेळके यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करत चौकशी लावली होती. मात्र, शेळके यांनी दिलेल्या खुलाशावर विश्वास ठेवून चौकशी थांबवण्यात आली. हे करताना संबंधित अधिकाऱ्यांनी ना तपास केला, ना इतर पुरावे मागवले, हेच सध्या चर्चेचे प्रमुख कारण बनले आहे. शेळके यांच्याविरोधातील आरोप केवळ याच प्रकरणापुरते मर्यादित नसून, कर्मचारी बदल्या व भरतीत त्यांनी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी आधीपासूनच आहे. या सर्व प्रकरणांमध्ये त्यांच्या भूमिका नेहमीच संशयास्पद राहिलेली आहे.




- शेळके यांना दोषमुक्त करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही संशय
- कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान, शासनाकडे भरपाईची मागणी
- चौकशी न करता केवळ खुलाशावर निर्णय; भ्रष्टाचारास पोषक?
- त्रयस्थ यंत्रणेमार्फत फेरचौकशीची गरज

### कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान; कोण देणार भरपाई?

या प्रकारात शासनाचे नुकसान झाले नाही असा दावा करण्यात आला असला, तरी कर्मचाऱ्यांचे नुकसान मात्र प्रचंड झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी अग्रीम मिळेल या आशेवर घराचे बुकिंग केले होते. त्यासाठी बिल्डरला काही रक्कम आगाऊ दिली होती. पण निधी मिळाला नाही, अग्रीम रक्कम मिळाली नाही त्यामुळे बिल्डर लॉबीने कर्मचाऱ्यांना आगाऊ रक्कम देण्यास नकार दिला. परिणामी, कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. या गंभीर प्रकरणात संबंधित दोषी अधिकारी आणि शेळके यांच्यावर कारवाई करण्याऐवजी चौकशी थांबवणे, हे स्पष्टपणे भ्रष्ट प्रवृत्तींना अभय देण्यासारखेच असल्याचे मत कर्मचारी व्यक्त करत आहेत. शासनाची प्रतिमा मलीन करणाऱ्या अशा प्रकारांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाची चौकशी कोणत्याही प्रभावाखाली न होता, त्रयस्थ यंत्रणेकडून व्हावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. शेळके यांना मोकळे रान देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही कसून चौकशी होणे आवश्यक ठरते.

# त्र्यंबक नगरपरिषदेच्या अडचणी वाढणार

## माझी वसुंधरा योजनेबाबत सर्वाधिक तक्रारी

**नाशिक ।** गेल्याच आठवड्यात त्र्यंबक नगरपालिकेतील भ्रष्ट कारभारची चौकशी करण्याचे आदेश मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्यानंतर प्रांताधिकार्यांकडे नगरपालिकेच्या संदर्भातील तक्रारींचा ओघ वाढला आहे. सर्वाधिक तक्रारी माझी वसुंधरा योजने संदर्भात असून तब्बल १ कोटी रुपये खर्च करून राबविलेल्या योजनेतील झाडांची वर्षभरातच दुर्दशा झाल्याने शासनाचे १ कोटी रुपये नेमके कुणाच्या घशात गेले याची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या बेताल कारभाराचा पाढा मंत्री गिरीश महाजन यांच्या समोर उघड झाल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना नगर परिषदेच्या कारभाराची चौकशी करण्याचे आदेश देताच इगतपुरी त्रंबक चे प्रांताधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. गेल्या आठवड्याच्या शनिवारी सुट्टी असतानाही चौकशी अधिकारी यांनी नगरपालिकेतील कामांची सर्व कागदपत्रे मागून चौकशीला सुरुवात केली. त्यानंतर नागरिकांना देखील तक्रारी करण्याचे आवाहन करण्यात आले. यामध्ये सर्वाधिक तक्रारी माझी वसुंधरा योजनेअंतर्गत केल्या वृक्षारोपणा संदर्भात आल्याचे सूत्रांनी सांगितले. माझी वसुंधरा योजनेत मोठ्या प्रमाणावर







भ्रष्टाचार झाल्याची त्र्यंबकेश्वर मध्ये दबक्या आवाजात चर्चा असताना दै 'महासागर' ने या गंभीर प्रकाराला वाचा फोडली. माझी वसुंधरा योजनेसाठी नगरपालिकेने आतापर्यंत तब्बल १ कोटी रुपयांचे कंत्राट दिले होते.मात्र सद्यस्थितीत योजनेचा अक्षरशः फज्जा उडाला असून १ कोटी रुपयांचे काम दिसून येत नसल्याने या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्र्यंबक नगर परिषदेकडून कामाच्या अडून ठेकेदार पोसले जात असल्याचा आरोप करण्यात येत असून त्याचे प्रत्यक्षातील अनुभव त्रंबकवासियांना येत आहेत. निसर्गाचा वरदहस्त असलेल्या त्र्यंबक शहराला पूर्वीपासूनच वृक्ष संपदा लाभली आहे. असे असताना नगरपालिकेकडून माझी





वसुंधरा योजनेअंतर्गत झाडे लावण्याचा दिखावा केला गेला. काही ठिकाणी झाडांची उद्याने देखील तयार करण्यात आली. त्यात फळ झाडांपासून, फुलझाडे ,औषधी आणि शोभेची झाडे लावण्यात आल्याचे दर्शविण्यात आले. मोठा गाजावाजा करीत वृक्षारोपण केले गेले फोटोसेशनही केले. मात्र त्यानंतर या झाडांकडे कुणीही ढुंकून पाहिले नाही. या झाडांना नियमित पाणीपुरवठा झाला नाही त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा खर्च करून लावलेली झाडे आज नामशेष झाली आहेत. झाडांच्या संरक्षणासाठी लावलेल्या जाळ्या देखील दुरावस्थेत आहेत. अशा पद्धतीने माझी वसुंधरा योजनेचा फज्जा उडाल्याने संतप्त त्र्यंबककरांनी याबाबत सर्वाधिक तक्रारी केल्या असून याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# भुजबळांच्या दणक्यानंतर मनपा, पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर

## द्वारकावरील अतिक्रमणे हटवण्याची मोहीम








**नाशिक ।** शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि त्यामागील प्रशासनाची उदासीनता यावर राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. द्वारका परिसरात पाहणी करताना त्यांनी महापालिका व पोलीस विभाग यांच्यावर थेट घणाघाती टीका केली. त्यानंतर प्रशासनाला जाग आल्यानंतर काल मनपातर्फे द्वारका येथील अतिक्रमण हटविण्याची मोहीम प्रारंभ झाली. काल सकाळी मंत्री छगन भुजबळ यांनी स्वतः द्वारका परिसरात जाऊन जवळपास अर्धा तास प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शहरातील वाहतूक कोंडी, रस्त्यावरील अतिक्रमण, नादुरुस्त व बेवारस वाहने, तसेच नियम तोडणाऱ्या वाहन चालकांविरोधात प्रशासनाने पुरेशा कारवाईचा अभाव दाखविल्याचे नमूद केले. 'मनपा व पोलीस विभाग जर आपली जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडतील, तर या समस्या सहज मार्गी लागू शकतात,' असे भुजबळांनी ठामपणे सांगितले.

### गॅरेजमधील वाहने, अतिक्रमणामुळे वाहतूक विस्कळीत

द्वारका परिसरातील मुख्य चौकांपासून सुरू होणारी वाहतूक कोंडी महामार्गावरही जाणवते. अनेक ठिकाणी गॅरेजमधील नादुरुस्त वाहने, सार्वजनिक ठिकाणी उभ्या असलेल्या टपऱ्या, आणि रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृतपणे उभे असलेले फेरीवाले यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. भुजबळ यांच्या पाहणीनंतर आज सकाळपासून महापालिका आणि पोलीस प्रशासनाने एकत्रितपणे कारवाईला सुरुवात केली. सकाळी साडेसात वाजेपासून द्वारका परिसरातील अतिक्रमण हटवण्याचे काम हाती घेण्यात आले. अनेक दुकानांवरील अनधिकृत शेड काढण्यात आले असून काही ठिकाणी अनधिकृत टपऱ्यांची देखील तोडफोड करण्यात आली. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये काहीसा गोंधळ निर्माण झाला असला, तरी वाहतूक सुलभतेच्या दृष्टीने ही पावले आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले. पुढील काही दिवस ही मोहिम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेतही दिले गेले आहेत. या कारवाईबाबत नागरिकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया आहेत. काही नागरिकांनी प्रशासनाच्या उशिरा का होईना पण सुरू झालेल्या कारवाईचे स्वागत केले, तर काहींनी आपली उपजीविका अडचणीत आल्याबाबत नाराजी व्यक्त केली.

# गाव देवी, नरसिह अन् रक्तादेवीच्या लिलावाने गाठला उच्चांक

## धार्मिक उत्सवांमध्ये प्रमुख मानल्या जाणाऱ्या पारंपारिक आखाडी उत्सवाचे वावी ग्रामस्थांकडून आयोजन



**वावी ।** ऐतिहासिक ओळख असलेल्या सिन्नर तालुक्यातील वावी गावाने धार्मिक उत्सवांची परंपरा कायम ठेवत लोकसंस्कृती जोपासली आहे.आखाडी उत्सवानिमित्त गाव व परिसरातील सर्व लोक एकत्र येत असतात.सुमारे एक महिना अगोदर या उत्सवाची तयारी सुरू असते. आखाडी उत्सवात पसंतीचे सोंग मिळावे म्हणून उत्सव समितीच्या वतीने लिलाव पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यांना सोंगे नाचविण्याचा मान मिळतो.

वावी येथील धार्मिक उत्सवांमध्ये प्रमुख मानल्या जाणाऱ्या पारंपारिक आखाडी उत्सवाचे वावी ग्रामस्तांकडून आयोजन करण्यात आले आहे. वरुण राजाला खुश करण्यासाठी पूर्वापार चालत आलेली परंपरा वावीकरांनी जोपासत दशावतार अर्थात आखाडी हा महोत्सव दि ३०जुन ते ०४ जुलै पर्यंत संपन्न होणार आहे. पर्जन्यमान सुखकर व्हावे म्हणून वावी गावच्या वतीने देवी देवतांना आमंत्रित करण्याची परंपरा यादरम्यान पहावयास मिळते. याच पार्श्वभूमीवर आज दि.१४ रोजी गावची सामुहिक बैठक तथा देवी देवतांचा मुखवटयांचा लिलाव संपन्न झाला यात गाव देवी व नरसिंह च्या लिलावाने उचांक गाठल्याचे दिसून आले. कैन्हया अँक्वाचे व्यवस्थापक शंकर राजेभोसले व योगेश ताजणे यांनी गाव देवीचा लिलाव १७५५५५/-रुपये बोली बोलून घेतला तर नरसिंहचा लिलाव अभिजित ताजणे यांनी ३६१००/-रुपयांस घेऊन लिलावाचा उचांक पार केला तर रक्तादेवी लिलाव गणेश काळोखे यांनी २१०००/- बोली बोलून घेतला. बैठकित लिलावाची चढाओढ पहावयास मिळाली. कैलास जाजू यांनी रावणाची भूमिका स्वीकारली भैया काटे याने हेडूंबा चा लिलाव घेतला बजरंगबलीच्या भूमिकेत दत्तात्रय पठाडे, चंद्र-सूर्य साठी अक्षय खर्डे व दर्शन सोमाणी, इंद्रजीत- गणेश दत्तात्रय पठाडे, राम लक्ष्मण- गणेश थोरात, तीळसंक्रांत- राजुनाना काटे, नारदमुनी- अमोल काटे भैरवनाथ साठी शुभम काटे ,वेताळ- विशाल साळुंखे ,वीरभद्र- मनोज सापते, महादेव- संदीप गायकवाड, प्रभावळ- भारत वेलजाळी ,खंडेराव महाराजांसाठी-प्रवीण वाजे, एकादशी- नवनाथ काटे , भीम- बकासुर च्या भूमिकेत चंदूनाना पठाडे व राजू नाना काटे दिसणार आहे.वराह- संदीप गायकवाड, मच्छ साठी प्रवीण वाजे, तसेच सलग पाच दिवस शारजा च्या भूमिकेत ज्ञानेश्वर काळोखे, राजू मंडलिक, सुनिल शेळके, मयूर आनप, वसंत आनप तर सलग पाच दिवस गणपतीच्या भूमिकेत साई कपिले, गणेश काटे, गणेश थोरात , संदीप ताजणे, भास्कर जाधव आदि व्यक्तीनी यावेळी वेगवेगळ्या देवी देवतांचा लिलाव घेऊन प्रत्यक्ष भूमिका साकारणार असल्याची माहिती दशावतार समितीचे अध्यक्ष अशोक ताजने यांनी दिली तर या कार्यक्रमाची दांडी २६ जून रोजी रोवण्यात येणार असल्याची माहिती समितीचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोराणे व सचिव गणेश वैराळ व दिपक वेलजाळी यांनी दिली आहे. समितीच्या वतीने या उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. ग्रामस्थांमध्ये आखाडी उत्सव होत असल्याने उत्साहाचे वातावरण आहे.

# एम.डी. ड्रग्जसह २.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त

## नाशिक गुन्हे शाखेची कारवाई

**नाशिक ।** नाशिक शहरात एम.डी. विक्री करणाऱ्या इसमाला अटक करत गुन्हे शाखा युनिट क्र. २ ने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २.२२ लाख रुपये किमतीचा एम.डी. ड्रग्ज व रोख रक्कम जप्त करण्यात आली. आरोपीविरोधात अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि.१४ जून रोजी युनिट क्र. २ च्या पथकाने अंबड परिसरातील एका पेट्रोल पंपाजवळ सापळा रचून संशयित इसम सुफेज उर्फ गुलाल सोळंके (रा. इंदिरानगर, नाशिक) याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ९.७१ ग्रॅम एम.डी. ड्रग्ज (कींमत ₹७,०००/-), मोबाईल (₹०,०००/-), रोख रक्कम (₹,०००/-) असा एकूण ₹,२२,१००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा एम.डी. ड्रग्ज विक्री करून तरुणांमध्ये व्यसनाधीनता पसरवत असल्याची माहिती मिळाल्यावर ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्र. २ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनुमंत तोरडमल यांच्या नेतृत्वात सपोनि डॉ. रमाकांत हिरवे, सपोनि पाटील, अंमलदार सोनावणे, काळे, गायकवाड आदींच्या पथकाने केली.

# वीज जाते आणि येते... मध्ये काय घडते ?

*** योगेश विटनकर ***
**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर**

पावसाळा आणि वीजपुरवठा यांचे नाते सर्वांनीच गृहित धरलेले असते. अर्थात, विजेशिवाय जगण्याची कल्पनाच करणे शक्य नाही, इतके तिचे महत्त्व वाढलेले आहे. त्यामुळे वीज गेली की, आपल्या संतापाचा पारा चढतो. परंतु वीज जाते, हे वास्तव आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. दुसऱ्या दिवशी त्याची बातमीही होते. परंतु, वीज का गेली, का जाते, याचे उत्तर बहुतेकांना माहीत नसते.

यंत्रणा जोखमीची रात्री-अपरात्री वीज गेल्यानंतर काही वेळातच ती परत येते. विजेची यंत्रणा अशी आहे की, ती चालू अथवा बंद करण्यासाठी व्यक्तीची गरज लागते. शिवाय या यंत्रणेत जिवाचा धोका असतो. मोबाईल किंचा टेलिफोनचे तसे नाही. त्याचे एकदा कनेक्शन घेतले की, त्याची सेवा संबंधित कंपनीला एका ठिकाणी बसून चालू विंधा बंद करता येते. तीही कोणत्या जोखमीशिवाय, वीज यंत्रणा त्याला अपवाद आहे. रात्री-अपरात्री गेलेली वीज काही वेळात परत येते, तेव्हा कोणीतरी त्या पावसात अंधारात स्वतःचा जीव धोक्यात घालून खांबावर चढलेला असतो. तेव्हा कुठे वीज येते. त्यामुळे वीज यंत्रणेवर दोषारोप करण्यापेक्षा त्याच्यातील गुंतागुंत समजून घेतली पाहिजे. सारा पसारा उघड्यावर पारंपरिक अथवा अपारंपरिक स्रोतांपासून देशाच्या कानाकोपऱ्यातून निर्माण झालेली चीज ग्राहकांच्या दारात आणणे तेवढे सोपे नाही. त्यासाठी लाखो किलोमीटर वीजवाहिन्यांचे जाळे देशात सर्वदूर पसरलेले आहे. त्याला 'ग्रीड' म्हणतात. हा सारा पसारा उघड्यावर आहे. नैसर्गिक विंचा मानवनिर्मित आपत्तींचा या यंत्रणेवर परिणाम होऊन त्यात बिघाड होण्याची शक्यता असते. चक्रीवादळ, पूर, रस्ते अपघात यामुळे यंत्रणा कधी कधी ठप्प होते. एखादी उच्चदाब वाहिनी कोसळली तर कधी एखादा जिल्हा विधा काही तालुके अंधारात जातात, तर कधी हा बिघाड गाव विधा काही भागापुरता मर्यादित असतो. पावसाळ्याच्या सुरुवातीला वादळवारे व आकाशाच्या विजेतील कडकडाट सर्वांनी अनुभवलेला आहे.

तारेच्या जाळ्यांमधून घरात आलेली वीज असो की आकाशात लखलखणारी वीज, दोन्हींमध्ये प्रचंड ऊर्जा असते. आकाशात विजेचा कडकडाट सुरू झाला की, घरातील वडीलधारी माणसे वीज उपकरणे बंद करतात. कारण, उच्च दाबामुळे ती जळण्याची शक्यता असते. दोन विद्युत चुंबकीय क्षेत्र एकत्र आल्याने दाब वाढतो व यंत्रणा बंद पडते. नव्हे, तशी सोयच यंत्रणा वाचविण्यासाठी केलेली असते.

हानी टाळण्यासाठी यंत्रणा : दुसरी बाब म्हणजे वीज खांबात विद्युतप्रवाह उतरू नये यासाठी चॉकलेटी रंगाचे चिनी मातीचे इन्सुलेटर खांबावर बसविले जातात. बहुधा ते उन्हामुळे विचा विद्युतप्रवाहामुळे गरम होतात व त्यावर पावसाचे थेंब पडताच त्याला तडे जातात, ज्यामुळे वीजप्रवाह खांबातून जमिनीत उतरतो आणि लगेचच आपात्कालिन यंत्रणा कार्यान्वित होऊन फीडर (वीजवाहिनी) बंद पडतो. जर हा फीडर बंद पडला नाही तर जीवित वा वित्तहानी होण्याचा धोका असतो.


बिघाड शोधणे जिकिरीचे जेव्हा वीजपुरवठा अचानक खंडित होतो, तेव्हा बीज उपकेंद्रातील कर्मचारी जवळच्या उपकेंद्राशी संपर्क साधून त्यांच्याकडे वीजपुरवठा आहे की नाही, याची खात्री करत असतात. वीजपुरवठा असल्याची खातरजमा झाल्यानंतर फीडर चालू केला जातो. जर फीडर पुन्हा ट्रीप झाला (बंद पडला) तर मात्र बिघाड झाल्याचे घोषित करण्यात येते. तथापि, बिघाड शोधणे जिकिरीचे असते. ऊन-वाऱ्याची, पावसाची अथवा अंधाराची तमा न करता ही शोध मोहीम हाती घेतली जाते. कधी बंद पडलेल्या वाहिनीवरील सर्व खांब तपासावे लागतात, तर कधी हा बिघाड काही खांबांदरम्यान सापडतो.

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग लष्करातील जवानाला युद्धाचा सराव दररोज करावा लागतो. परंतु, युद्ध करण्याची वेळ सहसा येत नाही. इथे मात्र वीज कर्मचारी रोज युद्धभूमीवर असतात. चूक झाली की जीव जाणार, याची खूणगाठ बांधूनच त्यांना खांबावर चढावे लागते. सर्व प्रकारची काळजी घेऊनही वीज कर्मचाऱ्यांना प्राणांतिक अपघात होण्याच्या घटना अधूनमधून घडत असतात. परंतु, मानवी संवेदना इतक्या क्षीण झाल्या आहेत की, एखाद्याच्या जिवाचे मोलही आपण ध्यानात घेत नाही. वीज जाते आणि येते, यादरम्यान काय होते, याचा विचार आपण जेव्हा करू त्यावेळी आपण महावितरण किंवा कोणत्याही वीज कर्मचाऱ्याला दोष देणार नाही.

**वीज गेल्यास काय करावे आणि काय करू नये ?**

१. आपल्या घरात आरसीसीबी (रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर) असणे गरजेचे आहे, जेणेकरून घरातील वीज यंत्रणेत बिघाड झाला तर वीजपुरवठा बंद होऊन जीवितहानी टाळता येईल.
२. अर्थिंग सुस्थितीत असली पाहिजे. गरजेनुसार त्याची तपासणी करावी. ३. वीज उपकरणे विधा वायरिंग ओलाव्यापासून किंवा पत्र्यापासून सुरक्षित असावी.
४. वीज उपकरणे हाताळताना पायात स्लिपर घालावी व वीजपुरवठा बंद झाल्याची खात्री करावी. ५. विद्युत खांबाला व ताणाला जनावरे बांधू नयेत. ६. वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे थांबूनच वीज वैपनीला संपर्क करावा. ७. बिघाड नेमका कोठे झाला याची माहिती असल्यास वीज वैमनीला संपर्क करावा.
८. विजेच्या तारा तुटल्यास त्याला हात लावू नये. तातडीने महावितरणला माहिती द्यावी.

खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी विविध पर्याय वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे वाट पाहूनच महावितरणला माहिती द्यावी. त्यासाठी महावितरणच्या १९१२, १८००-१०२-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर द्यावी. तसेच आपल्या रजिस्टर्ड मोबाईल क्रमांकावरून ०२२-४१०७८५०० या क्रमांकावर मिसकॉल द्यावा अथवा NOPOWER ग्राहक क्रमांक हा एसएमएस ९९३०३९९३०३ या क्रमांकावर पाठवावा. महावितरणच्या मोबाईल अँप आणि



संकेतस्थळावरूनही ग्राहक वीजपुरवठ्याबाबरची तक्रार नोंदवू शकतात.

पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. वीज का गेली, का जाते, या प्रश्नाचे उत्तर आपल्याला माहीत नसते. तसेच वीज जाते आणि येते, या मधल्या काळात काय घडते, हे जाणून घेण्याची गरज आहे.

# 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी फुगवलेला 'फुगा' !

एप्रिल महिन्याचा पहिल्या आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसे नेते राज ठाकरे यांची, त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. बराच वेळ दोन्ही नेत्यांमध्ये नेहमीप्रमाणे 'बंद दाराआड' चर्चा झाली. नंतर 'डीनर डिप्लोमसी'ही झाली. सदरची भेट राजकीय नव्हती, असे दोन्ही कडूनही त्यावेळी सांगितले गेले. पण, महानगरपालिका निवडणुका जवळ आल्याने ही भेट योग्य रणनीती ठरवण्यासाठीच होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. नंतर 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'शिवसेना-मनसे' युती होणार, अशा बातम्या देण्यास सुरुवात केली. याचा धुरळा खाली बसतो ना बसतो तोच, ३ दिवसांनंतर एका पॉडस्काटवर प्रसिद्ध अभिनेते, निर्माते महेश मांजरेकर यांनी मनसे नेते राज ठाकरे यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा काही भाग वृत्तवाहिन्यांवर दाखवण्यात आला. त्यात उध्दव ठाकरे आणि आपण एकत्र येणार का ? या प्रश्नाला उत्तर देताना, राज ठाकरे म्हणाले की, ' महाराष्ट्र खुप मोठा आहे. त्याच्या पुढे आमची भांडणे किरकोळ आहेत'. यात राज ठाकरे यांनी स्पष्टपणे युती करू किंवा तयार आहे, असे म्हटले नाही. काही तासांतच कामगार सेनेच्या एका कार्यक्रमात बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले की, 'मीही सर्व विसरायला तयार आहे. पण, राज यांनी गद्दारांशी आणि भाजपशी संबंध ठेवणार नाही. कोणालाही घरी बोलवणार नाही. कोणालाही पाठिंबा देणार नाही, अशी शिवरायांपुढे शपथ घ्यावी', असा 'अटी' आणि 'शर्थी'चा गतिरोधक उभा करुन मनसेबरोबर जाण्याचे संकेत दिले. खरेच मराठी माणसासाठी एकत्र यायचे असेल तर, मंत्रिपद नको, लाल दिव्याची गाडी नको, सत्ता नको. फक्त मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येत आहोत, अशी जाहीरपणे उध्दव ठाकरे शपथ घेतील का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. त्यानंतर अजित पवार आणि शरद पवार एका बैठकीसाठी एकत्र आले. पुन्हा वृत्तवाहिन्यांच्या हाती कोलीत मिळाले; आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार, असा सूर आळवण्यास सुरुवात केली. तेव्हापासून ते आजपर्यंत झाडून सर्व वृत्तवाहिन्यांवर 'उबाठा-मनसे' आणि 'शरद पवार-अजित पवार' एकत्र येणार याच विषयाचे रवंथ चालू आहे. वृत्तच नव्हे तर, निरर्थक चर्चांच्या फैरीही झडत आहेत. संजय राऊत यांनीही राज यांच्या भूमिकेचे समर्थन केले. परंतु, 'मनसे' आणि 'उबाठा' गटाच्या काही नेत्यांनी मात्र नाराजी व्यक्त केली. मात्र, अंधभक्त असलेले कार्यकर्ते मात्र सुखावले. काहींनी तर 'युती होणारच' या विश्वासाने राज आणि उद्धवचे एकत्र बॅनरही झळकावले. डोंबिवली आणि नाशकात एकमेकांच्या कार्यक्रमातही सामील झाले. गमतीची गोष्ट म्हणजे, राज ठाकरे हे बाली या देशात गेलेले होते. त्या पाठोपाठ उध्दव ठाकरेही सहकुटुंब सहपरिवार नित्यनियमाप्रमाणे लंडनमधील 'मातोश्री-३' कडे रवाना झाले. नेते, प्रवक्ते, कार्यकर्त्यांत मात्र 'वाक युध्द' रंगले.

राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो. तसेच, राजकारणात केव्हाही काहीही घडू शकते, हे जरी खरे असले तरी 'उध्दव आणि राज' एकत्र येणे हे कदापिही शक्य नाही. दोघांमधून विस्तवही जात नाही, त्यामुळे ३६ चा आकडा ६३ होणे अशक्यप्राय गोष्ट आहे. थोडक्यात, हा प्रकार म्हणजे वृत्तवाहिन्यांनी पुन्हा एकदा 'शिळ्या कढीला ऊत' आणण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. यापूर्वीही २०१७ आणि २०१९ मध्ये असे प्रयोग झाले होते. आपल्या मराठी समाजाला 'भाऊबंदकी' ही सर्वात मोठी लागलेली 'कीड' आहे. पूर्वापार ती चालत आलेली आहे. प्रसंगी एकमेकांचे मुडदेही पडल्याचे अनेक उदाहरणे आहेत. राज हे स्वाभिमानी आहेत. त्यांचा वक्तृत्वावर पगडा आहे. त्यांच्यात कमालीचा दूरदृष्टीपणा आहे. त्यांचं प्रत्येक भाषण, मुलाखत, प्रतिक्रिया ही मुद्देसूद आणि अभ्यासू असते. म्हणूनच त्यांची भाषणे ऐकण्यासाठी गर्दी तर होतेच पण, ती शांतपणे आणि लक्षपूर्वक ऐकली जातात. त्यांचा स्वभाव संयमी आणि मैत्रीपूर्ण असा आहे. तर, याच्या उलट परिस्थिती उध्दव ठाकरेंची आहे. त्यांच्या स्वभावात अहंकार, मग्रुरपणा ठायी ठायी जाणवतो. राजकारणाच्या परिपक्वतेचा तर पूर्णपणे अभाव आहे. यांच्या प्रत्येक भाषणात गद्दार, बाप चोरला, पक्ष चोरला, चिन्ह चोरले, निरर्थक शब्दांच्या कोट्या, मी मुख्यमंत्री होतो तेव्हा, थापा मारणे आणि न पेलणारी आव्हाने देणे या पलीकडे काहीच नसते. दूरदृष्टीपणा म्हणजे काय ? हेच यांना माहित नाही. यांची, आदित्य आणि संजय राऊतची भाषणे 'करमणूक' आणि 'टाईमपास' म्हणून ऐकली जातात. जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून व वडिलांच्या विचारांना तिलांजली देऊन मुख्यमंत्रिपद मिळवले. पण, तेही सांभाळता आले नाही. पद तर घालवलेच पण, पक्ष, चिन्ह, आमदार, खासदार, नगरसेवक, कार्यकर्ते स्वतःची अपरिपक्वता आणि अहंकारी स्वभावामुळे घालवले. पण, खापर मात्र फडणवीस आणि अमित शहांवर फोडत आहेत.

राज हे उध्दवच्या हाताखाली काम करण्यास कधीच तयार होणार नाहीत. तेच जर करायचे होते तर, त्यांनी शिवसेना सोडून 'मनसे'ला जन्म देण्याचा आटापिटाच केला नसता. आज दोघांचेही पाय खोलात आहेत. भाजपने तगडे आव्हान त्यांच्यापुढे उभे केले आहे. शिंदे आणि अजितदादा येऊन मिळाल्यामुळे अजूनच अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे. दोघांच्याही अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे क्षणभर असे जरी मानले, की दोघांची युती झाली. पण, नेतृत्व, जागावाटप याचे काय ? उध्दव ठाकरेंना तर सत्तेची किती चटक लागली आहे ? हे मागील विधानसभा निवडणुकीवेळी सर्वांनी बघितलेच आहे. त्यामुळेच 'उघड्यापाशी नागडा गेला अन रात्रभर थंडीने कुडकुडत मेला' अशी परिस्थिती होऊ नये, याची राज ठाकरे नक्कीच दखल घेतील, यात शंका नाही. त्याहीपेक्षा महत्वाची आणि मोठी गोष्ट म्हणजे, संजय राऊत, सुषमा अंधारे या वाचाळविरांचे आणि राज ठाकरेंचे पटेल का ? हा खरा कळीचा मुद्दा आहे.

आता सर्वात महत्वाचे म्हणजे, हे कारभारी 'युती', 'आघाडी'च्या नावाखाली जनतेच्या डोळ्यात कशी 'धूळफेक' करतात ? युत्या आणि आघाड्या या जनतेच्या नव्हे तर, केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी केल्या जातात, हे काही दिवसांतच समोर आले. काश्मीरमध्ये हिंदू आणि मराठी माणसांना दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार मारले. संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. इतर देशांनीही या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून मायदेशी परतले. गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्वरित काश्मीरला रवाना झाले. पण, २ दिवस आधीच 'महाराष्ट्राच्या' आणि 'मराठी' माणसाच्या हितासाठी युतीची भाषा करणारे अतिविद्वान संपादक आणि विश्वप्रवक्त्यांनी आपला पुळका किती बेगडी आहे, हे दाखवून सर्व महाराष्ट्राची इज्जत धुळीत मिळवली. मोदी, शहा, शिंदे आणि फडणविसांच्या द्वेषाची काविळ झालेल्या या महाशयांनी नेहमीप्रमाणेच गरळ ओकली. दहशतवादी हल्ल्याचा निषेध, मृतांना श्रध्दांजली वाहणे तर सोडा. या हल्ल्याला मोदी, शहा जबाबदार आहेत. तिकडे गेले म्हणजे उपकार नाही केले, शिंदेंचे तिकडे काय काम ? अशी मुक्ताफळे उधळली. हे कमी की काय म्हणून, फक्त हिंदूच नव्हे तर, मुस्लिमही मारले गेले, असे म्हणत प्रत्यक्षदर्शी आणि पीडितांना खोटे पाडण्याचा करंटेपणाही या संपादक( ?) म्हणवून घेणाऱ्या वाचाळविराने केला. पण, दोनच दिवसांपूर्वी 'महाराष्ट्र' आणि 'मराठी' माणसाच्या हिताच्या गोष्टी करणारे दोन्ही नेते मात्र, देश दुःखसागरात बुडाला असताना, परदेशी सहकुटुंब सहपरिवार 'थंडा थंडा, कुल कुल' करण्यात मश्गुल होते, ते आले तर नाहीच. पण, साधं ट्वीटही केले नाही, याचा यांना विसर पडला. मागच्यावेळी फडणविसांनी मोठे मन केले, म्हणून मुंबई महानगरपालिका उध्दव ठाकरेंच्या हातात राहिली. आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे आता तसे होणार नाही. वक्फ बोर्ड आणि काश्मीर हल्ल्याबाबत केलेले वक्तव्य 'उबाठा' ला चांगलेच भोवणार आहे. मराठी मतदार नक्कीच दुखावला गेला आहे. मुंबई मनपा हातातून गेली तर, कायमचे 'लंडनवासी' व्हावे लागेल, या भीतीने युतीची खटपट चालू आहे, हे शेंबडे पोरगंही सांगेल.

दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना दोन्ही भाऊ एकत्र यावे किंवा युती व्हावी, असे कितीही वाटत असले तरी ते शक्य वाटत नाही. दोन भाऊ एकत्र येणे म्हणजे एखाद्या पक्षाचे विलिनकरण करावे लागेल. ते होणे नाही. युती म्हटले तर, नेतृत्वाचा प्रश्न उभा राहिल. आदित्य ठाकरेंनी 'संपलेल्या पक्षाविषयी काय बोलायचे' ? अशी केलेली हेटाळणी; आणि राज यांनी बाळासाहेबांच्या अखेरच्या दिवसांत 'सूप आणि वडापाव'ची वाच्यता करून उध्दवाची काढलेली इज्जत; आणि २०१७ मध्ये मुंबई महानगरपालिकेत 'किंगमेकर'च्या भूमिकेत मनसे असताना, सत्तेसाठी एका रात्रीत उध्दव ठाकरे यांनी मनसेचे फोडलेले ६ नगरसेवक, माहीम विधानसभा मतदार संघात अमित ठाकरे यांना न दिलेला पाठिंबा या आणि अशा इतर टीका-टीपण्ण्या, घटना दोघे इतक्या सहजासहजी विसरतील का? हाही मोठा प्रश्न आहे. अतिविद्वान (?) विश्वप्रवक्ते यांनी 'शिवतीर्था'ला 'कॅफे हाऊस'ची उपमा दिली होती. पण, आज सरड्यापेक्षाही वेगाने रंग बदलत; आणि नाकाने कांदे सोलत रोज 'बेगडी' बोलत असले तरी लवकरच ते नित्यनियमाप्रमाणे तोंडावर आपटतील, यात तिळमात्र शंका नाही. कारण, मनोमिलन होण्यात ते स्वतःच मोठा अडसर आहेत. उध्दव पूर्ण पक्ष संपेपर्यंत काही त्यांना सोडणार नाही.

मागच्या आठवड्यात उध्दव ठाकरे म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या मनात जे आहे तेच घडेल'. ते अगदी बरोबर बोलले. स्वतःच्या बापाच्या विचाराला तिलांजली; आणि महाराष्ट्राच्या जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून आपला आणि मुलाचा स्वार्थ साधला. त्याची काही प्रमाणात परतफेड महाराष्ट्राने विधानसभा निवडणुकीत केलीच आहे. आता उरलेली परतफेड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत करून महाराष्ट्र आपला बदला नक्कीच पूर्ण करेल; आणि हेच महाराष्ट्राच्या मनात आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. थोडक्यात, उध्दवांच्या मनात जे आहे, ते कदापिही होणे शक्य नाही, असो.

'राज ठाकरेंच्या सभांना गर्दी होते पण, मते मिळत नाहीत' असे विधान करत शरद पवार यांनी 'मनोमिलना'त खोडा घातलाच आहे. राज आणि उद्धव यांच्यात अजूनही युतीसंदर्भात बैठक झाली नाही. युतीच्या टीका-टीपण्णीवरून प्रकाश महाजन आणि नारायण राणे यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. त्याचा फायदा 'उबाठा'ला होऊ नये म्हणून, योग्य वेळ साधत राजकारणातील 'खरे चाणक्य' फडणवीस यांनी राज यांची भेट घेऊन उध्दव ठाकरे यांना चांगलीच धोबीपछाड दिली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. राज ठाकरे आणि भाजप यांची जवळीक बघता ही बैठक राजकारणाला वेगळे वळण देईल, असे वाटणे चुकीचे ठरणार नाही. नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रवादीच्या (शरद पवार) वर्धापनदिनाच्या मेळाव्यात दस्तुरखुद्द शरद पवारांनीच दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीला पूर्णविराम दिला आहे. त्याचप्रमाणे आज 'उबाठा-मनसे'च्या 'मनोमिलना'च्या कितीही चर्चा होत असल्या तरी, या दोघांत युती होणार नाही, ही 'काळ्या दगडावरची पांढरी रेघ' आहे. 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'फुगवलेला हा फुगा' चाणक्य देवाभाऊंनी योग्य वेळ साधून राज यांची भेट घेऊन फोडला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. देवाभाऊंनी मारलेल्या 'मास्टर स्ट्रोक' मुळे शेवटी हे 'पेल्यातील वादळ'च ठरले, हे मात्र नक्की. कदाचित, उद्या उध्दव ठाकरेंना एकटे पाडण्यासाठी चाणक्य देवाभाऊंनीच ही खेळी खेळल्याचे उघड झाल्यास, आश्चर्य वाटायला नको.

*** प्रदीप व्ही. खोलमकर ***
**नाशिक. मोबाईल ८७६७५९२९८०**

# दुर्दैव कि जीवनमृत्युतील काळाचा अंतरपाट

अहमदाबाद विमान दुर्घटनेनं देशभरात हळहळ व्यक्त केली जात असून मृत्युमुखी पडलेल्या २४१ प्रवाशांसह नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या दुर्घटनेत आप्तेष्ट गमावलेल्या नातेवाईकांचा आक्रोश पाहून देवा ! अशी वेळ कुणाच्याही वाटेला येऊ देऊ नको रे बाबा... अशी आर्त हाक अनेकांच्या हृदयातून येत आहे. तर, या दुर्घटनेनंतर काही जणांकडून आपणासोबत घडलेल्या विमान प्रसंगातील अशाच आठवणी जागवल्या जात आहेत.

गुजरातच्या अहमदाबाद येथील विमानतळावर विमान अपघाताची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेमध्ये अपघातग्रस्त विमानातील एक प्रवासी नशिब बलवत्तर म्हणून बचावला, इतर सर्वच्या सर्व प्रवाशांचा जीव गेला. एअर इंडियाच्या बोईंग विमानातील तब्बल २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याने देश शोक सागरात बुडाला असून अनेकांनी यापूर्वीच्या विमान दुर्घटनांच्या आठवणी जागवल्या आहेत. या अपघातामागील अनेक कारणांचा मागोवा घेतल्या जात असला तरी नेमकं कारण येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल.

यातील एक प्रवासी प्रतीक जोशी गेल्या सहा वर्षांपासून लंडनमध्ये राहत होते. एक सॉफ्टवेअर प्रोफेशनल, त्यांनी आपल्या पत्नी आणि भारतात राहणाऱ्या त्यांच्या तीन लहान मुलांसाठी परदेशात उज्ज्वल भविष्य घडवण्याचे स्वप्न पाहिले होते. वर्षानुवर्षे नियोजन, कागदपत्रे आणि संयमाने ते स्वप्न अखेरीस साकार होत होते. फक्त दोन दिवसांपूर्वी, त्यांची पत्नी डॉ.कोमी व्यास एक वैद्यकीय व्यावसायिक यांनी भारतातील नोकरीचा राजीनामा दिला. बॅगा पॅक झाल्या, निरोप घेतले गेले आणि भविष्य वाट पाहत होते. सकाळी, सर्व पाच जण आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फ्लाईट १७१ मध्ये चढले. सेल्फी काढला नि नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास. पण ते स्वप्नांच्या नगरीत पोहोचलेच नाहीत. विमान कोसळले आणि कुणीही वाचले नाही. काही क्षणात, आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. आई, वडील आणि त्यांच्या ३ मुलांची विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी... हा आनंद त्यांच्या ५ जणांच्या सुखी परिवारावर कधी दुःखाचा डोंगर घेऊन आला त्यांनाही समजले नाही.


विमान धावपट्टीवर सरकत होतं खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेले कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती. पोहोचल्यावर फोन करतो वाट पाहू नकोस. कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला शेवटचा फोटो पाठवला, कुणी ऑफिसच्या ग्रुपवर टेक ऑफ असा मॅसेज टाकला आणि कुणीतरी मनातल्या मनात एक प्रार्थना केली, सगळं नीट होऊ दे रे देवा. पण त्याच क्षणात काळाने आपली योजना आखली होती. एक मोठा आवाज, आगीचे ज्वाळा आणि एका क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळ असं सारं काही जागेवर होतं. फक्त माणसं नव्हती. उरली फक्त धूर, राख आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर फोनवरचे शेवटचे मॅसेज अजूनही वाचले गेले नाहीत. कॉल मी व्हेन यु लँड..., मिस यु... आणि टेक केअर...

यातच कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं, तर कुठे फोन कट झाल्यावर अजूनही हॅलो...हॅलो? म्हणणारं कुणी तरी. कुणीच ठरवत नाही की, शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल आणि शेवटचा शब्द कोणता असेल आज जे गेले, त्यांच्या हसण्याच्या प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहेत. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगते, आयुष्य क्षणभंगुर आहे त्यामुळे प्रत्येक क्षण प्रेमाने जगा आणि अगदी मनापासून माफ करा. मृत्यू अटळ आहे पण तो येईपर्यंत मृत्युशिवाय जगणं, हेच खरं आयुष्य आहे.

विमान दुर्घटनेत अचानक काळाच्या प्रवाहात हरवलेल्या त्या सर्व निष्पाप आत्म्यांना नम्र श्रध्दांजली !

**शब्दस्पर्शी**
**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

मुंबई उपनगरी रेल्वे वाहतूक अर्थात मुंबईची लोकलसेवा ही मुंबईची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज पाऊण कोटीहून अधिक मुंबईकर लोकल सेवेने प्रवास करतात. मात्र आज हीच मुंबईकरांची जीवनवाहिनी मुंबईकरांसाठी मृत्युवाहिनी ठरत आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. नुकतीच मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर मुंबईतील लोकल वाहतूक करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थात लोकल दुर्घटनेत मुंबईकरांचा जीव जाण्याची ही पहिली वेळ नाही. या आधीही अनेकांनी अशा दुर्घटनेत आपला जीव गमवला आहे. रेल्वे अपघातात दररोज पाच ते सात जणांचा मृत्यू होतो असा एक अहवाल सांगतो याचाच अर्थ रेल्वेचा प्रवास आता पूर्वी इतका सुरक्षित राहिला नाही. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. रेल्वे मंत्रालयाने या दुर्घटनेनंतर सर्व लोकलना स्वंयचलीत दरवाजे बसवण्याचे घोषित केले तर मुख्यमंत्र्यांनी सर्व लोकल वातानुकूलित करून लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची घोषणा केली. लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्यास अनेकांनी विरोध केला. लोकलमधील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित दरवाजे हा उपाय योग्य ठरणार नाही. स्वयंचलित दरवाज्यामुळे घुसमट होऊन लोकलमधील प्रवाशांचा जीव गुदमरणार नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि तो योग्यही आहे. सर्वच लोकल वातानुकूलित करण्यास ही विरोध होतोय कारण लोकल वातानुकूलित केल्यावर तिकिटांचा दर वाढेल पर्यायाने सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा येऊ शकते. मुंब्रा दुर्घटनेनंतर अशी दुर्घटना घडू नये यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जात आहेत त्याचे स्वागतच व्हायला हवे मात्र मूळ प्रश्न हा मुंबईतील वाढत्या लोकसंख्येचा आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे सर्वच साधनसामुग्री अपुरी पडत आहे. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत केवळ परप्रांतीयच नाही तर खेड्यातूनही हजारो लोक मुंबईत रोजगारासाठी स्थलांतर करत असतात त्यामुळे मुंबईची सूज वाढत चालली आहे. कितीही आणि कोणत्याही उपाययोजना केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येपुढे अपुऱ्याच ठरणार आहे. त्यामुळेच शहरांचा नव्याने पुनर्विकास करण्याची गरज आहे मी माझ्या ' शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा ! ' या लेखातच हे लिहिले आहे. जोवर शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणार नाही तोवर अशा घटना घडतच राहणार आणि त्यात मुंबईकरांचा जीव जातच राहणार आहे.

## आजचा विनोद

वेडा : बेकारीचा प्रश्न मी चुटकीसरसा सोडवू शकेन. सर्व स्त्रियांना एका बेटावर व पुरुषांना दुसऱ्या बेटावर.
डॉक्टर : पण त्यामुळे बेकारी कशी नष्ट होणार ?
वेडा : सगळेजण नौका बांधण्याच्या उद्योगात मग्न होतील ना ?

-----------------

## SMS

Aapki Nayi Subah itni Sayani ho jaye,
Dukhon ki sari batein aapki purani ho jaye,
De jaye Itni khushiya ye din,
Ki Khushi bhi aapki diwaani ho jaye.

वाचक लिहितात

## लॉस एंजलिस मधील हिंसाचार

अमेरिका एक जागतिक महासत्ता आहे. एक विकसित, संपन्न आणि स्वातंत्र्य प्रिय देश अशी अमेरिकेची ख्याती आहे. त्यामुळे सगळ्या जगाचा ओघ अमेरिकेकडे वाहतो आहे. अमेरिकन नागरिकही स्वतःला श्रेष्ठ ,शिस्तबद्ध ,आधुनिक आणि श्रीमंत म्हणून शेखी मिरवत असतात. पण प्रत्यक्षात काही काळापासून तसे दिसत नाही.

सध्या कॅलिफोर्नियातील, लॉस एंजलिस येथे हिंसाचार सुरू आहे. तो काही थांबायचं नाव घेत नाही. ट्रम्प सरकारने सत्तेत आल्यापासून अमेरिकेतील बेकायदेशीर नागरिकांना बाहेर काढायचा सपाटा सुरू केला आहे. भारतीय सहिष्णू असल्याने शांतपणे परतले .पण बहुसंख्येने अमेरिकेत बेकायदेशीर असलेले मेक्सिकन लोक हे गुन्हेगारी मानसिकतेचे असल्याने त्यांनी ह्या कारवाईच्या विरोधात हिंसाचार चालू केला. ट्रम्प च्या विरोधी पक्षाचे सरकार कॅलिफोर्निया राज्यात आहे. त्यामुळे स्थिती अधिक बिघडली. लॉस एंजलिस हे हॉलीवुड आणि आयटी कंपन्यांसाठी प्रसिद्ध आहे. तसेच डिज्नेलैंड्साठीही प्रसिद्ध आहे .त्यामुळे जगभरातून कामासाठी आणि पर्यटनासाठी लोक इथे येतात. आणि ह्या हिंसाचारामुळे सध्या सर्व व्यवहार ठप्प झाले आहे. दोन दिवसानंतरही सरकारला हिंसाचार थांबवता आला नाही, त्यामुळे ट्रम्प यांनी तिथे थेट सैन्याला पाठवले. कारण ही आग जर लवकर विझवली नाही तर तिचा वणवा संपूर्ण अमेरिकेत पसरेल याची जाणीव ट्रंप यांना निश्चितच झाली असणार. परंतु त्यामुळे आणखी एक वेगळा वाद निर्माण झाला. महासत्ता म्हणून जगातील देशांचे युद्ध थांबवण्याचा दावा करणारी अमेरिका ,स्वतःच्या देशातील, एका राज्यातील, एका शहरातील हिंसाचार थांबवू शकत नाही. या हिंसाचारामुळे अमेरिकेची जगभर नाचक्की होत आहे.

तसेच प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. प्रत्येकच देशाला घुसखोर नको असतात. कारण 'ते' त्या देशातील अर्थकारण, रोजगार, संस्कृती यावर आक्रमण करतात .भारतातही घुसखोरीचा प्रश्न ऐरणीवर आहे. भारत सरकारने सुद्धा आता बांगलादेशी घुसखोरांच्या बाबतीत कडक धोरण अवलंबिले पाहिजे. हीच ती वेळ आहे .कारण आता अमेरिकेच्या तोंडालाच पट्टी लागलेली आहे .

**सौ. माधवी पत्की**
**नागपूर**

## स्त्रीसन्मान : संस्कृतीची खरी ओळख !

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः ! जेथे नारीची पूजा केली जाते, तेथे देवतांचा वास असतो, अशी हिंदू धर्माची शिकवण आहे. हिंदू संस्कृतीत स्त्रीला 'शक्ती'चे रूप मानले गेले आहे. प्राचीन काळात स्त्रीला केवळ एक सामाजिक घटक नव्हे, तर हिंदू 'संस्कृतीचा कणा' या दृष्टीने सन्मानाने पाहिले जात होते. आजच्या आधुनिक समाजात स्त्रियांना कायदेशीर अधिकार, समानता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळत आहेत. मात्र, प्राचीन भारतात स्त्रियांना मिळणारा मान आणि सन्मान आजच्या २१व्या शतकात हरवलेला दिसतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे ! केवळ हुंडाबळीच नव्हे, तर स्त्रियांवरील मानसिक व शारीरिक शोषण, बलात्काराच्या वाढत्या घटना या सर्वांवरून समाजाची स्त्रीकडे बघण्याची विकृत मानसिकता स्पष्ट होते.

म्हणूनच, केवळ कायद्याच्या आधारे नव्हे, तर समाजाची मानसिकता बदलल्यावरच खऱ्या अर्थाने स्त्रीसन्मानाची परंपरा जोपासली जाऊ शकते. यासाठी प्रत्येक घरात साधनेचा संस्कार होणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्राचीन हिंदु संस्कृतीतील स्त्री सन्मानाची मूल्ये जोपासण्यास मदत मिळेल आणि समाजातील मानसिक विकृतींवर आळा बसेल.

**सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

## अशोकायन...

### जागतिक पितृ दिन

प्रेम आणि धाक
एकाच नाण्याच्या बाजू
लेकराला मिळायलाच हवं
'माणुसकीचं 'बाळकडू ..

अव्यक्त प्रेम बापाचं
दिसत नाही डोळ्यानं
खुणा मात्र प्रेमाच्या
जाणवतात अनुभवानं ..

कोण म्हणते आई इतकी
बापाला नसते माया
आंधळं प्रेम केलं तर
औलाद जाते ना वाया ...



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# एसएमएचआरसीमध्ये प्रदेशातील पहिले एकात्मिक (इंटिग्रेटेड) डिमेन्शिया केअर सेंटर कार्यान्वित

**नागपूर, १५ जून :** भारताच्या वृद्ध होत चाललेल्या लोकसंख्येच्या वाढत्या आरोग्य गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, डीएमआयएचईआर (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी) चे १०२० खाटांचे प्रमुख शैक्षणिक रुग्णालय शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) यांनी एक विशेष एकात्मिक डिमेन्शिया केअर सेंटर सुरू केले आहे. हे पाऊल अशा वेळी उचलले गेले आहे, जेव्हा डिमेन्शिया ही एक सायलेंट महामारी म्हणून विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागांतील वृद्धांमध्ये झपाट्याने वाढत आहे.

हे सेंटर सुरू करण्यामागे एसएमएचआरसीची समावेशक, नैतिक आणि सर्वांना सहजरित्या आरोग्यसेवा मिळावी, याबद्दलची ठाम बांधिलकी आहे. डिमेन्शियाने ग्रस्त आपल्या प्रिय व्यक्तींची काळजी घेत असलेल्या कुटुंबांवरील ताण कमी करणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. डिमेन्शिया हा स्मृती हरवणे, मेंदूच्या कार्यक्षमतेत घट आणि भावनिक अस्थिरता यांसारख्या लक्षणांनी ओळखला जातो.

डीएमआयएचईआर (डीयू)चे मुख्य सल्लागार सागर मेघे यांच्या वैयक्तिक पुढाकारातून हे सेंटर सुरू करण्यात आले आहे. डॉ. प्रदीप पाटील, डॉ. प्रशांत भारबत, डॉ. अभिजीत फाये, डॉ. मोना राय, डॉ. अपूर्वा जोशी, डॉ. अमिता कामडी आणि डॉ. सीता वर्मा या वरिष्ठ तज्ज्ञांच्या सहकार्याने हे सेंटर कार्यरत झाले असून पेशंट सेंट्रिक, मल्टिडिसीप्लिनरी मॉडेल तयार करण्यात आले आहे, जे सन्मानपूर्वक आणि सातत्यपूर्ण उपचारांची हमी देणार.

डिमेन्शिया केअर सेंटरची मुख्य वैशिष्ट्ये:
कोणतेही बेड, डॉक्टर वा नर्सिंग शुल्क नाही
औषधे, तपासण्या आणि उपचार अत्यल्प दरात
मानसोपचार, मनोविज्ञान, सर्वसाधारण औषधोपचार, होमिओपॅथी, योग थेरपी आणि सामाजिक कार्य यांचा एकत्रित दृष्टीकोन
कुटुंबासाठी समर्पित समुपदेशन आणि मानसिक पुनर्वसन(सायकोलॉजिकल रिहॅबिलिटेशन)
वृद्धांच्या काळजीसाठी राष्ट्रीय मोहिमांना बळकटी

Dementia Aware
Helping Raise Awareness Around the World

हा उपक्रम भारत सरकारच्या पुढील प्रमुख योजनांना बळकटी देतो:
ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय कृती योजना
अटल वयो अभ्युदय योजना
वृद्धांसाठी आरोग्यसेवेची राष्ट्रीय योजना
टर्शरी लेव्हलवर संपूर्ण वृद्ध सेवा प्रदान करत आणि दीर्घकालीन काळजीच्या पर्यायांद्वारे कुटुंबांना आधार देत, एसएमएचआरसी हे राष्ट्रीय मिशन्स स्थानिक पातळीवर भक्कम करत आहे.

कुटुंबांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी पूर्ण करणारा आधार

हा उपक्रम पालक व ज्येष्ठ नागरिकांचा देखभाल आणि कल्याण अधिनियम, २००७ च्या हेतूला पूरक आहे, जो मुलांनी व नातेवाईकांनी आपल्या वृद्ध पालकांची आर्थिक व भावनिक जबाबदारी स्वीकारावी असे सांगतो. एसएमएचआरसीचे डिमेन्शिया केअर सेंटर हे कुटुंबांसाठी एक सन्मानजनक, विश्वासार्ह उपचार पर्याय उपलब्ध करून देतो, जेणेकरून ते योग्य पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय सहाय्याच्या मदतीने आपली कायदेशीर आणि नैतिक बांधिलकी पूर्ण करू शकतील.

वृद्ध व पॅलियेटिव्ह केअर क्षेत्रातील विभागीय अग्रणी संस्था

एसएमएचआरसीने आधीपासूनच आपल्या दीर्घकालीन विशेष वॉर्ड्स आणि सामुदायिक सेवा कार्यक्रमांमुळे वृद्ध व पॅलियेटिव्ह केअर क्षेत्रात ठसा उमटवला आहे. डिमेन्शिया सेंटर हे त्या परंपरेचा विस्तार आहे. हे प्रदेशातील एकमेव, फुल टाइम, विशेष तज्ज्ञांद्वारे चालवलेले आणि सबसिडाइज्ड इनडोअर केअर सेंटर आहे.

कुटुंबांनी मदतीसाठी वा भरती होण्याकरिता खालील क्रमांकावर संपर्क साधावा: डॉ. शिवम गुप्ता ७२१८०८०१२७ याच क्रमांकावर आपण बेडची उपलब्धता देखील जाणून घेऊ शकता.

या समावेशक आणि धाडसी उपक्रमाद्वारे, एसएमएचआरसी पुन्हा एकदा वृद्धांना सन्मान देणारी, कुटुंबांना आधार देणारी आणि देशाच्या ज्येष्ठ नागरिक कल्याणाच्या उद्दिष्टांना पुढे नेणारी आरोग्य व्यवस्था उभारण्यात आपले नेतृत्व सिद्ध करत आहे.

# वोडाफोन आयडियाकडून सॅमसंगच्या वैविध्यपूर्ण सोल्यूशन्सच्या माध्यमातून बेंगळुरूमध्ये जी कमर्शियल सर्विस लाँच

**नागपूर, १५ जून :** आघाडीची टेलिकॉम ऑपरेटर वोडाफोन आयडिया (व्हीआय) ने आज सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कं. लि. (सॅमसंग) सोबत सहयोगाने बेंगळुरूमध्ये जी सर्विसेसच्या कमर्शियल लाँचची घोषणा केली. बेंगळुरू भारतातील प्रमुख टेलिकॉम बाजारपेठ आहे आणि 'सिलिकॉन व्हॅली ऑफ इंडिया' म्हणून प्रसिद्ध असलेले जागतिक आयटी हब आहे. पासून कंपन्या सहयोगाने काम करत न्यू जनरेशन, जी नेटवर्क देत आहे, तसेच भारतातील बिहार, कर्नाटक व पंजाब या प्रमुख टेलिकॉम शहरांमध्ये सॅमसंगच्या उद्योग-अग्रणी सोल्यूशन्सच्या माध्यमातून व्हीआय च्या वारसायुक्त जी व जी नेटवर्क्सचे आधुनिकीकरण करत आहे.

या सहयोगाचा भाग म्हणून व्हीआय ने आधीच एप्रिल मध्ये चंदिगड व पटणा येथे जी कमर्शियल सर्विसेस लाँच केल्या. व्हीआय ने तिन्ही शहरांमध्ये विनासायास जी अनुभव सक्षम करण्यासाठी सॅमसंगचे लहान फॉर्म-फॅक्टर, ऊर्जा-कार्यक्षम आणि उच्च ट्रान्समिट पॉवर रेडिओज यशस्वीरित्या सादर केले आहेत. हे सोल्यूशन्स अधिक सेल क्षमता व ऊर्जाबचत वैशिष्ट्ये देतात, ज्यामधून ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव मिळण्यासोबत व्हीआय च्या ग्राहकांना पर्यावरणपूरक व अधिक शाश्वत दृष्टिकोन मिळतो.

या वितरणासाठी सॅमसंगने विविध स्पेक्ट्रम बँड्सला सपोर्ट करणाऱ्या रेडिओंची व्यापक श्रेणी दिली, जसे टीआर मॅसिव्ह एमआयएमओ रेडिओ, तसेच रेडिओ अ‍ॅक्सेस नेटवर्क (आरएएन) सोल्यूशन्स, ज्यामध्ये बेसबँड व सॉफ्टवेअर फंक्शन्सचा समावेश आहे, जे व्हर्च्युअलाइज्ड सेंट्रल युनिट (व्हीसीयू) म्हणून ओळखले जातात.

कंपन्यांनी जी सर्विसेससाठी प्रमुख नेटवर्क घटक देशातील पहिल्या व्हर्च्युअलाइज्ड बेस स्टेशन कंट्रोलर (व्हीबीएससी)ची देखील अंमलबजावणी केली आहे, ज्याद्वारे अत्याधुनिक सॉफ्टवेअर सोल्यूशन्सच्या माध्यमातून त्यांच्या नेटवर्कचे आधुनिकीकरण करत आहे आणि वारसायुक्त तंत्रज्ञान व सर्विसेसना पाठिंबा मिळण्याची खात्री घेत आहे.

नेटवर्क फंक्शनालिटीजचे व्हर्च्युअलायझेशन व्हीआय ला नेटवर्क अंमलबजावणी सुव्यवस्थित करण्यास आणि व्यवस्थापन सोपे करण्यास सक्षम करते, ज्यामधून अधिक कार्यक्षमता, कमी कार्यचालन खर्च, सर्वोत्तम संसाधन वाटप नियंत्रण आणि अधिक ग्राहक समाधानाची खात्री मिळते. या व्हर्च्युअलायझेशन अवलंबनासह ऑपरेटर्स अधिक सहजपणे सॉफ्टवेअर-आधारित व स्थिर नेटवर्क्स निर्माण करू शकतात, पुढे देखील नेटवर्क्स सादर करण्यातील स्पर्धेमध्ये अग्रस्थानी राहू शकतात.

व्होडाफोन आयडियाचे चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर जगबीर सिंग म्हणाले, ''बेंगळुरूमध्ये, तसेच चंदिगड व पटणामध्ये व्हीआय च्या जी सर्विसेसचे लाँच आमच्या इकोसिस्टममध्ये सॅमसंगला नवीन सहयोगी म्हणून सादर करण्यामधील आणि ग्राहकांना विनासायास, अत्यंत विश्वसनीय नेक्स्ट-जनरेशन सर्विसेस देण्यामधील प्रमुख पाऊल आहे. सॅमसंगसोबत सहयोग करत आमचा ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव देण्याचा, तसेच आजच्या डिजिटली कनेक्टेड विश्वामध्ये आवश्यक असलेल्या सुधारित मोबाइल ब्रॉडबँड सेवा व उच्च क्षमता देण्याचा मनसुबा आहे.''

सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या नेटवर्क्स बिझनेसचे अध्यक्ष व प्रमुख वूजुन किम म्हणाले, ''भारत, विशेषतः बेंगळुरू जागतिक डिजिटल परिवर्तनामध्ये अग्रस्थानी आहे आणि आम्हाला जगातील सर्वात डायनॅमिक व प्रगत आयटी बाजारपेठेतील ग्राहकांना नेक्स्ट-जनरेशन कनेक्टीव्हीटी देण्यासाठी व्हीआय च्या नाविन्यपूर्ण प्रवासामध्ये सामील होण्याचा अभिमान वाटतो. सॅमसंग नेहमी एक पाऊल पुढचा विचार करते, मोबाइल ऑपरेटर्सच्या भावी गरजांचा अंदाज घेते. या सहयोगाच्या माध्यमातून सॅमसंग नाविन्यपूर्ण पैलूंच्या माध्यमातून मोबाइल युजर्सच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आणि उद्योग विकासाला चालना देण्यासाठी व्हीआय ला पाठिंबा देण्याप्रती कटिबद्ध आहे.''

# बाजीगर : शुद्ध कौशल्यावर आधारित कार्ड गेमचा उदय



**नागपूर, १५ जून :** पत्त्यांचा खेळ म्हटलं की नशीब किंवा सट्टा डोळ्यांसमोर येतो. पण आता ही धारणा बदलण्याची वेळ आली आहे! नागपूरस्थित अपस्पोर्ट्स विज़न प्राइवेट लिमिटेड कंपनीने सादर केलेला बाजीगर हा एक वेगळ्या प्रकारचा १२ पत्त्यांचा ऑनलाइन स्किल-बेस्ड गेम आहे, जो तुमच्या विचारशक्ती, रणनीती आणि निर्णयक्षमतेची खरी कसोटी घेतो.

बाजीगर हा पूर्णपणे कौशल्यावर आधारित गेम असून यात कुठलाही सट्टा किंवा नशिबाचा भाग नाही. खेळाडू इथे विचारपूर्वक चाल खेळतात, प्रतिस्पर्ध्यांशी डोक्याने स्पर्धा करतात आणि गेमिंगचा एक नवाच अनुभव घेतात. हा गेम ट्रेडमार्क असून, याच्या गेम फॉर्मसाठी पेटंट अर्ज देखील करण्यात आलेला आहे. भारतात अशा प्रकारच्या गेमचा जन्मदाता असल्याचा कंपनीला अभिमान आहे. बाजीगर हा गेम दररोज सकाळी १० ते रात्री १० या वेळेत डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बाज़ीगर.इन या वेबसाइटवर डिजिटल स्वरूपात खेळता येतो. खेळात सर्व सरकारी नियम, गोपनीयतेचे धोरण आणि वयोमर्यादा (१८+) यांचे काटेकोर पालन केले जाते. प्रतिबंधित राज्यांतील खेळाडूंना प्रवेश नसणार आहे. प्रार्थना बेहेरे यांचा आत्मविश्वासपूर्ण सहभाग,प्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे या या गेमच्या ब्रँड अ‍ॅम्बेसडर आहेत. त्यांचा आत्मविश्वास, लोकप्रियता आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व बाजीगर ला घराघरात पोहोचवण्यास हातभार लावत आहे. अधिकृत वितरक तिरुपती एजन्सी, नागपूर बाजीगर चा अधिकृत वितरक नागपूरमधील तिरुपती एजन्सी असून, कंपनी महाराष्ट्रभर विस्तारासाठी सज्ज झाली आहे.का खास आहे बाजीगर? फक्त कौशल्यावर आधारित नशिबाचा शून्य संबंध.हुशार खेळी विजयाचे दार उघडणारी चावी. सुरक्षित आणि सोपा ऑनलाइन अनुभव. मर्यादित वेळ जबाबदारीने खेळण्याची संधी. आजच सामील व्हा कौशल्याच्या या नव्या क्रांतीत!

# सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत पुनर्विकास योजनेत अनपेक्षित वळण आल्याने साई दर्शन सोसायटी अडचणीत



**मुंबई, १५ जून :** सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत मध्यमवर्गीय व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील हृदयस्पर्शी गोष्टी आणि त्यांचे संघर्ष यांचे हलके-फुलके चित्रण केलेले असते. अलीकडच्या भागांमध्ये, लवकरच पुनर्विकास होण्याच्या शक्यतेमुळे मालमत्तेच्या किंमती वाढल्या आहेत. आणि साई दर्शन सोसायटीत आनंदीआनंद आहे. पण संतुरी (तर्जनी भादला)च्या पतीला अशी शंका येत आहे की, काही तरी अघटित होणार आहे.

आगामी भागांमध्ये, साई दर्शन सोसायटीचे रहिवासी आनंदले आहेत कारण सोसायटीच्या इमारतीची जीर्ण अवस्था असल्याने पुनर्विकासासाठी या इमारतीची निवड करण्यात आली आहे. वंदना (परिवा प्रणती) त्यांच्यासाठी तात्पुरते राहण्यासाठीची जागा शोधत आहे, तर दक्खू (दीपक परीक) सोसायटीच्या संरक्षणार्थ सत्यनारायण पूजेचे आयोजन करतो. पण, त्या रात्री अचानक एका हादऱ्याने इमारत हादरते आणि काही मुले- अथर्व (शीहान कपाही), कृष्ण (व्योम ठक्कर) आणि किट्टू (माही सोनी) गायब होतात. राजेश (सुमित राघवन), धर्मेश (खंजन ठुंबर) आणि दक्खू मुलांचा शोध घेऊ लागतात. आणि त्यांना मुले सुरक्षित सापडतात देखील.

दुसऱ्या दिवशी सकाळी, हादऱ्यामुळे बऱ्याच घरांना तडा गेलेल्या दिसतात. सोसायटीचे सदस्य नुकसान भरपाई विषयी आणि पुनर्विकास प्रक्रियेसाठी कोणाला नेमावे याबाबत चर्चा करून अखेर नेमकी त्या बिल्डरची निवड करतात, ज्याला निर्माणाधीन इमारतींशी छेडछाड केल्याबद्दल लवकरच अटक होते. सगळ्या योजना फसतात, पाऊस थांबायचे नाव घेत नसतो, अशा वेळी रहिवासी काही तात्पुरते इलाज करतात.

वागले की दुनिया मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, अनेक लोकांसाठी या कथानकाचे वेगळेच महत्त्व आहे. खास करून, मुंबईसारख्या शहरात, जेथे अनेक घरांना पुनर्विकासासाठी प्रस्ताव मिळत असतात. पुनर्विकास म्हणजे केवळ आधीची इमारत पाडून नवी इमारत बांधणे नसते. हा लोकांच्या आयुष्याचा, आठवणींचा आणि भावनांचा प्रश्न असतो. ही प्रक्रिया ज्या पद्धतीने दाखवली आहे ती तर मला आवडलीच, पण या सगळ्यात कुटुंबांवर जो ताण असतो, तो देखील यात छान दाखवला आहे. विनोद, सामुदायिक भावना आणि शहरी जीवनातील संघर्ष दाखवणारी ही कथा मला खूप आवडली. मनोरंजन करता करता पुनर्विकास प्रत्यक्षात कसा असतो याची एक गंभीर बाजू देखील या कथानकातून दाखवली आहे.

# मला अशा व्यक्तिरेखा साकारायला आवडतात ज्या एकसुरी नसतात आणि अनिका अगदी तशीच आहे, सांगत आहे अनुष्का मर्चंडे सरू या मालिकेतल्या आपल्या भूमिकेबद्दल

**मुंबई, १५ जून :** शक्तिशाली कथांची परंपरा पुढे नेत झी टीव्ही घेऊन आली आहे सरू एका गावातील मुलीची मनाला भिडणारी आणि प्रेरणादायी गोष्ट, जी मोठ्या शहरात आपल्या स्वप्नांसाठी संघर्ष करते. सरूच्या भावनिक प्रवासाच्या पार्श्वभूमीवर, अनिका हे पात्रही प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवते, जिची भूमिका ऊर्जावान अनुष्का मर्चंडेने साकारली आहे. धाडसी, स्वतःच्या प्रतिमेविषयी जागरूक आणि विलक्षण महत्त्वाकांक्षा असलेली अनिका ही एक अशी व्यक्तिरेखा आहे जी नेहमीच लक्ष वेधून घेते. एक प्रतिस्पर्धी म्हणून, ती कथेत संघर्ष आणि अनपेक्षित वळण घेऊन येते, जी कथा अधिक रंगतदार बनवते. सरूप्रति असलेली तिची नाराजी तिला प्रत्येक टप्प्यावर प्रेरणा देते आणि ती सरूला कमी दाखवण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाही. मालिकेमधील अनिकाच्या भूमिकेसंबंधीचा अनुभव, तिच्या सहकलाकारांबरोबरच नातेसंबंध आणि तिच्या व्यक्तिरेखेच्या विकासासाठी घेतलेला दृष्टिकोन याबद्दल अनुष्का मर्चंडे खुलून बोलत आहे.

१) हा शो राजस्थानच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे, जी तिच्या समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी ओळखली जाते. शहरात शूटिंगचा अनुभव कसा होता आणि प्रत्यक्ष लोकेशन्सवर शूट केल्यामुळे अनिकाची भूमिका अधिक चांगली साकारता आली का?

राजस्थानमधील खारेस गावात शूटिंग करणे ही एक अविस्मरणीय गोष्ट होती. तिथली नैसर्गिक सुंदरता, रंगांची भुरळ घालणारी शैली आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी यांनी कथेला अधिक सखोलता आणि खरेपणा दिला. त्या जागेची एक वेगळीच ऊर्जा होती, जी सरूच्या मूळाशी जुळणारी होती, आणि त्या वातावरणात राहिल्यामुळे आम्हा सर्वांना आमच्या व्यक्तिरेखा अधिक प्रभावीपणे साकारता आल्या.

२) अनिकामध्ये आत्मविश्वास, भावनिक चढ-उतार आणि गर्व यांचे एक अनोखे मिश्रण आहे. या सगळ्या भावना तू कशा साकारल्यास?

अनिका ही मी साकारलेल्या बहुआयामी व्यक्तिरेखांपैकी एक आहे. ती आत्मविश्वासू आहे, पण तिचा आत्मविश्वास अनेकदा तिच्या भावनिक अस्थैर्यामुळे आणि नेहमी सर्वोच्च राहण्याच्या गरजेने झाकोळला जातो. हे सगळं दाखवण्यासाठी मला ती का अशा प्रकारे वागते हे खोलवर समजून घ्यावे लागले. मी तिला फक्त एक वाईट मुलगी म्हणून दाखवू इच्छित नव्हते मला तिच्या कमकुवत बाजूही दाखवायच्या होत्या. ती वरून जरी नियंत्रित वाटत असली तरी एखाद्या क्षुल्लक गोष्टीवर ती भावनिक प्रतिक्रिया देते आणि ही अनपेक्षितता साकारणे हे एक आव्हान आणि आनंद दोन्ही होतं. कथा जसजशी पुढे जाते, तसतशी मीही तिच्याबरोबर शिकत आहे.

३) या भूमिकेसाठी तू कशी तयारी केलीस आणि तुला असे का वाटते की अनिकाचे पात्र सरूच्या कथेला परिणामकारक बनवते?

अनिकामध्ये मला सर्वाधिक आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे ती फक्त एक विरोधी व्यक्तिरेखा नाही, तर अशी व्यक्ती आहे जी सरूला तिच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर आणते. मला एकसुरी भूमिका आवडत नाहीत आणि अनिका ही नक्कीच तशी नाही. ती धाडसी, भावनांनी भरलेली आणि लक्षवेधी आहे. तिच्या प्रत्येक हालचालीमागे असुरक्षितता आणि अहंकार लपलेला असतो. ती सरूच्या प्रवासातील एक महत्त्वाचा वळणबिंदू आहे. ती सतत सरूला आव्हान देते आणि त्यामुळे अनवधानानेच तिला अधिक मजबूत बनवते. अशा प्रकारची भूमिका जी त्रास देते, प्रवृत्त करते आणि तरीही कायम लक्षात राहते ती साकारायला खूप रोमांचक आहे. इथे तिला सुरक्षित वाटत नाही आणि मी तिला तशी राहूही देणार नाही हेच माझं पात्र आहे.

४) अनुष्कामधून अनिका बनण्याचा अनुभव कसा होता? या भूमिकेत शिरण्यासाठी तुम्ही कोणत्या प्रकारची तयारी केली?

अनुष्कामधून अनिकापर्यंतचा प्रवास अत्यंत आकर्षक, रूपांतरकारी आणि प्रामाणिकपणे सर्जनशील ठरला. अनिका ही खऱ्या आयुष्यात माझ्याशी अजिबात जुळणारी नाही ती उघडपणे बोलणारी, स्वतःच्या प्रतिमेबाबत जागरूक आणि नेहमीच सर्वकाही नियंत्रणात ठेवू पाहणारी आहे. त्यामुळे या भूमिकेत शिरण्यासाठी मला खूप काही बाजूला ठेवावं लागलं आणि अशा भावना व प्रतिक्रिया वापराव्या लागल्या ज्या मला नैसर्गिकपणे येत नाहीत. मी खूप वेळ तिचा भावनिक प्रवास समजून घेण्यात घालवला तिला प्रेरित काय करतं, काय गोष्टी तिला घाबरवतात, आणि तिच्या इच्छा काय आहेत. त्यामुळे मी तिच्या वर्तन, हालचाली आणि सूक्ष्म हावभावांवर काम केलं, जेणेकरून जेव्हा ती स्क्रीनवर असेल, तेव्हा तिची उपस्थिती जाणवावी. संवाद बोलणे हेही एक महत्त्वाचे क्षेत्र होतते, कारण अनिका ठामपणे आणि एका विशिष्ट वृत्तीने बोलते. ही व्यक्तिरेखा मला सतत निरीक्षण, अंतर्मुखता आणि स्वतःला पुढे नेण्याची प्रक्रिया देत राहते आणि मला ते खूप आवडत आहे.

५) सरूमधील सहकलाकारांसोबत तुझे संबंध कसे आहेत?

हा खूपच छान अनुभव ठरला! आम्ही एकत्रितपणे अनेक सीन साकारले आणि प्रत्येकाने खूप उत्तम काम केले. याशिवाय, आम्ही जेव्हा एकत्र होतो, तेव्हा एकमेकांना ओळखण्याचा आणि जवळ येण्याचा संधी मिळाली, ज्यामुळे सगळं हळूहळू नैसर्गिक वाटू लागलं. ही एक सुंदर गोष्ट आहे की आम्ही सेटवर एक मोठं कुटुंबच तयार केलं आहे. शगुन आणि सरूसारखे माझे सहकारी कलाकार, तसेच आई, आजोबा आणि इतर वरिष्ठ कलाकार देखील खूप छान आहेत. सगळ्यांशी भेटणं आणि गप्पा मारणं खूप मजेदार असतं. मला वाटतं, आमच्यातले संबंध अधिकच मजबूत झाले आहेत.



६) सरूच्या गोष्टीतून आणि प्रवासातून प्रेक्षक काय शिकू शकतील?

माझी आशा आहे की प्रेक्षकांना प्रेरणा मिळेल की, जर तुमच्यात धैर्य असेल, तर कोणतंही स्वप्न मोठं नसतं. सरू ही आपल्या संस्कृतीशी आणि मूल्यांशी जोडलेली व्यक्ती आहे आणि आजचे प्रेक्षक अशा व्यक्तिरेखांशी सहज जोडले जातात. दुसऱ्या बाजूला, अनिका देखील आपल्या पद्धतीने प्रेक्षकांना आपलीशी वाटते. ती मुद्दाम वाईट नाही बनली तिचं बालपण, तिचं वाढणं तिला अशी बनवून गेलं आहे. तिच्या आई आणि आजीने तिला इतकं लाडावलं आहे की ती थोडी बिघडली आहे. मला असं वाटतं की, या गोष्टीतून पालकांनाही काही विचार करायला भाग पाडणारे मुद्दे मिळतील.


## आज का अंदाज

सोमवार १६ जून २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 0 | 1 | 4 | 7 |
| 370 | 380 | 347 | 340 |
| 460 | 470 | 446 | 250 |
| 550 | 560 | 248 | 160 |
| 02 | 12 | 46 | 76 |
| 05 | 15 | 49 | 79 |
| 08 | 18 | 43 | 73 |

मुंबई बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 5 | 6 | 9 |
| 346 | 456 | 600 | 199 |
| 490 | 357 | 367 | 289 |
| 580 | 258 | 268 | 379 |
| 31 | 51 | 62 | 92 |
| 30 | 50 | 67 | 97 |
| 38 | 58 | 64 | 94 |

१६ जून २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | 51 | 60 | 90 |
| 24 | 54 | 63 | 93 |
| 27 | 57 | 68 | 98 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने पारंपरिक पॉलिसींवर ९०० कोटींपेक्षा अधिक कर्ज वितरित

**अमरावती, १५ जून :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये पारंपरिक अर्थात ट्रॅडिशनल पॉलिसींवर ग्राहकांना ९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज वितरित केले आहे. पॉलिसीवर कर्ज हे उपयुक्त सुविधा असून, यामुळे ग्राहकांना त्वरित निधी मिळतो आणि त्यांच्या दीर्घकालीन बचत योजनेवर कोणताही परिणाम होत नाही. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीने ४२,७०० पेक्षा अधिक ग्राहकांना कर्ज दिले.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सचे चीफ ऑपरेशन्स ऑफिसर श्री. अमीश बँकर यांनी सांगितले, लाईफ इन्शुरन्स हे दीर्घकालीन उत्पादन आहे आणि पॉलिसी सुरु असताना ग्राहकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात. पॉलिसीवर कर्ज ही सुविधा ग्राहकांची बचत योजना योग्य ट्रॅकवर ठेवण्यास मदत करू शकते. विशेष म्हणजे, ग्राहकांना त्यांच्या पॉलिसीच्या सरेंडर व्हॅल्यूच्या ८०% पर्यंत कर्ज घेता येते. पॉलिसीवर कर्ज घेण्याची प्रक्रिया पेपरलेस आणि जलद आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९८% पेक्षा अधिक कर्ज २४ तासांच्या आत वितरित करण्यात आले. ग्राहक कंपनीच्या वेबसाइटवर किंवा मोबाईल अ‍ॅपवर कर्जासाठी अर्ज करू शकतात.

आमच्या ग्राहकांनी पॉलिसीवर कर्ज या सुविधेचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कर्ज वितरणामध्ये ६०% वाढ झाली आहे. आमचे ग्राहक दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वचनबद्ध आहेत आणि त्यांनी हे उत्पादन ज्या आर्थिक उद्दिष्टांसाठी घेतले, ते साध्य करू इच्छितात हे यातून दिसून येते.

विशेष म्हणजे, हे कर्ज प्रीमियम भरण्यासाठीही वापरता येते, ज्यामुळे पॉलिसी चालू राहते आणि तिचे फायदे ग्राहकांना मिळत राहतात.

## राशीभविष्य

**मेष :** कुटुंबात परस्पर जवळीक वाढेल.उदरनिवार्हाचा शोध पूर्ण होईल. जवळच्या मित्राचे सहकार्य मिळेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागेल.

**वृषभ :** आज तुमचे मन उत्साही असेल. काम करावेसे वाटणार नाही. कामाच्या ठिकाणी आळस आणि आनंद टाळा. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कमी वेळ देऊ शकाल.

**मिथुन :** आज तुम्हाला खूप दिवसांपूर्वी जवळच्या मित्राला उधार दिलेले पैसे परत मिळतील. व्यवसायात उत्पन्न चांगले असू शकते. इतर स्रोत देखील उघडू शकतात. तुमच्या नोकरीत तुम्हाला फायदा होईल.

**कर्क :** आज आध्यात्मिक कार्यात रुची राहील. काही महत्त्वाच्या कामात नोकरी मिळाल्यास यश मिळेल. राजकारणात उच्च पदावर असलेल्या व्यक्तीशी तुमची भेट होईल. नोकरीत महत्त्वाची जबाबदारी मिळेल.

**सिंह :** आज तुमचे आरोग्य सुधारेल. तुम्हाला काही गंभीर आजारांपासून आराम मिळेल. मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना विशेष काळजी घ्यावी लागेल. अन्यथा समस्या वाढू शकतात.

**कन्या :** अनावश्यक कामासाठी इकडे तिकडे धावपळ करावी लागेल. आर्थिक स्थिती थोडी खराब राहील. पैशाअभावी कोणतेही महत्त्वाचे काम खोळंबू शकते. तुमची बचत काढून पैसे खर्च करावे लागतील.

**तूळ :** आज बचत वाढेल. जवळच्या मित्राकडून न मागताही तुम्हाला आर्थिक मदत मिळू शकेल. तुमच्या वडिलांकडून तुम्हाला पैसे आणि भेटवस्तू मिळतील. व्यवसायात तुम्हाला भरपूर आर्थिक फायदा होईल.

**वृश्चिक :** आज प्रतिकूल हवामानामुळे होणाजया आरोग्य समस्या टाळा. तुमचे आरोग्य सुधारेल. कोणत्याही गंभीर समस्येपासून तुम्हाला आराम मिळेल. प्रवास करताना तुमच्या आहाराची विशेष काळजी घ्या.

**धनु :** महत्त्वाच्या मोहिमेचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या रागावर आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रभाव वाढेल. नवीन रोजगार मिळेल.

**मकर :** आध्यात्मिक कार्यांमध्ये रुची वाढेल. कौटुंबिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. व्यवसायात मालमत्ता विक्रीतून चांगला धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** जुन्या गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल. आरोग्यासाठी योग आणि ध्यानाला महत्त्व द्या. जोडीदारासोबत वेळ घालवाल. कामाच्या ठिकाणी बॉससोबत अनावश्यक वाद होऊ शकतात.

**मीन :** अनोळखी लोकांशी बोलणं टाळा. तुम्हाला निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची संधी मिळेल. कुटुंबातील सदस्यांचे मत तुमच्या व्यक्तिमत्त्वात बदल घडवून आणेल.

# योग : महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटनाची नवी दिशा



योग ही केवळ आसन किंवा प्राणायाम यांची शारीरिक शिस्त नाही, तर तो भारताच्या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक आणि तात्त्विक परंपरेचा एक महत्वाचा भाग आहे. भारतीय परंपरेचा गाभा असलेला हा योग आज जगभरात भारतीय संस्कृतीचे प्रतिक बनला आहे. या परंपरेचा जागतिक स्तरावर विस्तार करणारा एक महत्त्वाचा दिवस म्हणजे आंतरराष्ट्रीय योग दिन होय.

दरवर्षी २१ जूनला जगभरातील लाखो लोक या दिवशी सामूहिकरित्या योगाभ्यास करतात, स्वतःचे आरोग्य राखण्याचा निर्धार करतात आणि भारताच्या सांस्कृतिक समृद्धीला मान्यता देतात. याचे श्रेय अर्थातच मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना जाते. त्यांनी २०१४ साली युनायटेड नेशन्समध्ये भाषण करताना आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना मांडली होती. त्याला जागतिक स्तरावर उचलून धरण्यात आले आणि १७७ देशांनी एकमताने त्याला मान्यता दिली आणि २१ जून २०१५ पासून दरवर्षी जगभरात योग दिन साजरा केला जाऊ लागला. यंदाच्या २०२५ सालच्या योग दिनाची मध्यवर्ती संकल्पना योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ अशी असून यातून पृथ्वी आणि मानवाच्या आरोग्याच्या परस्परसंबंधावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र हे राज्य ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक विविधतेने समृद्ध आहे. इथल्या पर्वतरांगा, गड-किल्ले, समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे आणि निसर्गरम्य ठिकाणे केवळ सौंदर्यदृष्ट्या आकर्षक नाहीत, तर तेथे योगाभ्यास करताना मन आणि निसर्ग यांच्यातील एकतानता अधिक ठळकपणे जाणवते. पश्चिम घाटांतील सह्याद्री पर्वत, नाशिकची त्र्यंबकेश्वर पंचक्रोशी, अजिंठा-वेरूळच्या प्राचीन लेण्या, सातारा-पंचगणीची पठारे, रायगड-राजगडाचे ऐतिहासिक किल्ले, कोकण किनारपट्टीचा शांत समुद्रकिनारा या सर्व ठिकाणी पर्यटकांना योगाभ्यासाद्वारे निसर्गाशी, वारशाशी व संस्कृतीशी नाते जोडण्याचा अलौकिक अनुभव मिळतो. ही ठिकाणे पर्यटकांना केवळ भटकंती नव्हे, तर भारतीय जीवनपद्धतीचा गाभा उलगडण्याची संधी देतात.

असे जरी असले तर आज पर्यटनाचा हेतू केवळ स्थळदर्शनापुरता मर्यादित राहिलेला नाही. पर्यटक आता अनुभवाधिष्ठित पर्यटनाचा शोध घेत आहेत जिथे त्यांना केवळ स्थळ पाहता येत नाही, तर त्या ठिकाणाशी नाते जोडण्याची संधी मिळते. आणि हे नाते अर्थातच योगाच्या माध्यमाजून जोडले जाते. पर्यटनामध्ये सांस्कृतिक शाश्वतता हा नव्याने उदयाला येणारा महत्त्वाचा घटक असून योग त्या दृष्टीने भारताची सर्वात प्रभावी देणगी आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील पर्यटनाला एक नवा, वैश्विक आणि अनुभवाधिष्ठित चेहरा देण्याचा प्रयत्न केला आहे. एमटीडीसीने योग पर्यटनाच्या संकल्पनेला सक्रिय चालना दिली असून या व्यापक संधीचा अत्यंत योग्यरित्या उपयोग करत महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवी दिशा दिली आहे. स्थानिक योगगुरू, ध्यानकेंद्रे, आयुर्वेदिक आणि वेलनेस रिसॉर्ट्स यांच्याशी भागीदारी करत विशेष योग पर्यटन पॅकेजेस/टूर तयार करण्यात येत आहेत. महाराष्ट्रातील काही रिसॉर्ट्समध्ये आता नियमित योग प्रशिक्षण, ध्यानधारणा सत्रे, सांस्कृतिक कार्यशाळा आणि स्थानिक कलांचा अनुभव देणारे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

सध्या एमटीडीसी आणि नागपूर येथील जनार्दन स्वामी योगाभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरमधील साउथ सेंट्रल कल्चरल हॉल, सिव्हिल लाईन्स येथे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांसाठी मोफत योग प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे स्थानिक युवक आणि नवीन पिढीमध्ये योगाविषयी जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न केला जात असून त्यांना भारतीय परंपरेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी देण्यात येत आहे.



**मनोजकुमार सूर्यवंशी,**
**भा.प्र.से.,**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,**
**मुंबई.**

याशिवाय, एमटीडीसीने यावर्षी २ मे ते ४ मे दरम्यान महाबळेश्वर येथे भव्य महा पर्यटन उत्सव आयोजित केला होता. या तीन दिवसीय महोत्सवात विल्सन पॉइंट, महाबळेश्वर येथे दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत पर्यटक आणि स्थानिक नागरिकांसाठी विशेष योग सत्रांचे मोफत आयोजन करण्यात आले. या अनोख्या उपक्रमाला पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद लाभला व महाबळेश्वरच्या निसर्गरम्य वातावरणात योगसाधनेचा अनुभव घेण्याची अनोखी संधी मिळाली.

एमटीडीसीने आपल्या सर्व रिसॉर्ट्समध्ये येत्या, २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत. या कार्यक्रमांमध्ये स्थानिक नागरिक आणि पर्यटक यांना एकत्रितपणे योगाभ्यासात सहभागी होता येईल. हे कार्यक्रम महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांवर योग पर्यटनाची नवी ओळख निर्माण करतील.

योग पर्यटनाच्या या वाढत्या प्रवाहामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही पर्यटन व्यवसायाला चालना मिळू लागली आहे. स्थानिक कारागीर, हॉटेल व्यवसाय, वाहतूक, मार्गदर्शक व योग प्रशिक्षक यांना रोजगाराच्या संधी मिळू लागल्या आहेत. यामुळे ग्रामीण व शहरी महाराष्ट्रात पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्था अधिक बळकट होत आहे.

जगभरातील अनेक पर्यटन कंपन्या आता भारतातील योग पर्यटनाला मोठा प्रतिसाद देत आहेत. विशेषतः युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व आशियातील अनेक देशांतून पर्यटक फक्त योग शिबिरांमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रात येत आहेत. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन महाराष्ट्रातील पर्यटनस्थळी विशेष आकर्षण ठरत आहे. समुद्रकिनाऱ्यावर सूर्योदयाच्या साक्षीने घेण्यात येणारे सामूहिक योगसत्र, किल्ल्यांच्या पायथ्याशी गजर होणारे प्राणायामाचे ध्वनी, आणि जंगलाच्या गाभ्यात वाजणारे ध्यानधारणा मंत्र हे सर्व दृश्य जगभरातील पर्यटकांच्या मनावर गारुड करतात.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ योग पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा व शाश्वत जीवनशैली जगासमोर प्रभावीपणे मांडत आहे. योग दिन हा महाराष्ट्र पर्यटनासाठी केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून, हा महाराष्ट्राच्या दीर्घकालीन पर्यटन धोरणाचा महत्त्वाचा घटक ठरला आहे. महाराष्ट्र आज जगाच्या सांस्कृतिक नकाशावर योगाच्या माध्यमातून एक पृथ्वी, एक आरोग्य या विचारसरणीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे आदर्श पर्यटन केंद्र बनू पाहत आहे.

# सटाण्यातील बाह्य वळण रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार



**सटाणा ।** शहरातील वाहतूक कोंडीतून शहराला कायमस्वरूपी मुक्त करण्यासाठी वरदान ठरणाऱ्या शहर बाह्यवळण (बायपास) रस्त्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहर बाह्यवळण रस्त्याच्या डीपीआरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून यानंतर रस्त्याच्या सर्वेक्षणाचे काम तातडीने सुरू होणार आहे, अशी माहिती शहराचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील मोरे यांनी दिली.

सटाणा शहर बाह्यवळण रस्त्याप्रश्नी माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील मोरे व सामाजिक कार्यकर्ते पंडितराव अहिरे यांचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. त्याअंतर्गत श्री.मोरे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नॅशनल हायवेचे कार्यकारी अभियंता संजय शेवाळे यांची नुकतीच भेट घेऊन चर्चा केली. सटाणा शहरातून जाणाऱ्या साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने या महामार्गावर शहरात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. गेल्या काही वर्षात मोठे अपघात होऊन अनेक निष्पाप नागरिकांना या महामार्गावर आपला जीव गमवावा लागला आहे. यासाठी सटाणा शहराला बाह्य वळण रस्ता व्हावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून शहरवासीयांसह विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे. मात्र या प्रश्नाकडे शासन आणि प्रशासनाचे सोयीस्करित्या दुर्लक्ष होत होते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत शहर बाह्यवळण रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर असताना आमदार दिलीप बोरसे यांच्या प्रचारार्थ सटाण्यात झालेल्या जाहीर सभेत केंद्रीय महामार्ग रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी निवडणुकीनंतर तत्काळ हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र या आश्वासनाला सहा महिन्यांचा कालावधी लोटला. तरी कामाबाबत कोणतीही हालचाल होत नव्हती. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते पंडितराव अहिरे यांनी या बाह्यवळण रस्त्याप्रश्नी थेट दिल्ली गाठत केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट घेऊन याप्रश्नी दिल्ली येथील जंतरमंतरवर बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील मोरे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने बाह्यवळण रस्ता कामाच्या तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता संजय शेवाळे यांची भेट घेतली. भेटीत सुनील मोरे यांनी अभियंता संजय शेवाळे यांना सटाणा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी, अपघात आणि निष्पाप नागरिकांच्या बळींबाबत माहिती दिली. शेवाळे यांनी सटाणा शहर बाह्यवळण रस्त्याच्या तपशीलवार प्रकल्प अहवाल संदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून डीपीआर कन्सल्टंटची नियुक्ती झाल्यानंतर बाह्यवळण रस्त्याच्या सर्वेक्षणाचे काम तत्काळ सुरू होणार असल्याचे सांगितले. त्यात रस्त्याची लांबी, भूसंपादन, त्यात किती पूल, उपरस्ते येतील या बाबींचा समावेश होईल. या सर्व बाबींचा अंदाजीत खर्च डीपीआरमध्ये समाविष्ट असेल. सर्वेक्षण झाल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया होऊन प्रत्यक्ष बाह्यवळण रस्त्याच्या कामाची सुरुवातही होईल, असेही सुनील मोरे यांनी स्पष्ट केले. शिष्टमंडळात सामाजिक कार्यकर्ते पंडितराव अहिरे, श्यामकांत बगडाणे, दीपक पाकळे, हेमंत भदाणे, नाना मोरकर, मयूर सोनवणे आदी उपस्थित होते.

> डीपीआर आणि सर्वेक्षणानंतर सटाणा शहर बाह्यवळण रस्त्याचे प्रकरण केंद्र सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी जाणार आहे. बाह्यवळण रस्त्याचे काम कोणत्याही अडथळ्यांशिवाय विनाविलंब तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी बागलाणचे आमदार दिलीप बोरसे व सामाजिक कार्यकर्ते पंडितराव अहिरे यांच्यासह आपण केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांची भेट घेणार आहे. **– सुनील मोरे, माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष, सनपा**

> नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात सुनील मोरे यांनी पुनद धरण पाणी योजनेतून पाणी आणून सटाणा शहरवासीयांचा जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न योग्य रीतीने सोडवला, त्याच पद्धतीने सटाणा शहर बाह्यवळण रस्त्याचा महत्वाचा प्रश्नही ते निश्चितच सोडवतील, यात शंका नाही. बाह्यवळण रस्त्यामुळे व्यापारीकरण वाढणार असून अनेक बेरोजगारांचे जीवनमान उंचावणार आहे. हा रस्ता शेतकऱ्यांच्याही फायद्याचा ठेणरा आहे. **– श्याम बगडाणे, सामाजिक कार्यकर्ते**

# देवळा येथील शिवस्मारकाजवळ वसाका कामगारांचे मुंडण करत धरणे आंदोलन



**देवळा ।** कधी बंद तर कधी चालू अशा दुष्ट चक्रात सापडलेला वसाका गेल्या २१ महीन्यापासुन बंदच आहे. पाच वर्षांपूर्वी थकित कर्जापोटी शिखर बँकेच्या ताब्यात असलेल्या वसाका धाराशिव उद्योग समूहाने कामगार संघटनेशी करार करून २५ वर्षासाठी चालवण्यासाठी दिला होता. परंतु त्यांना वसाका धड चालवताच आला नाही. त्यामुळे कामगारांची रोजी रोटी बुडाल्याने उपासमारीची वेळ आली आहे.

२१ महिन्यापासून बंद असलेला कारखाना परत एकदा चालु व्हावा, कामगारांचे थकित वेतन मिळावे, प्राव्हीडंड फंड, पेंशन लागु करण्यात यावे, म्हणून कारखान्यातील आजी माजी कामगारांनी देवळा येथील शिवस्मारकाजवळ घोषणा देत, मुंडण करून दोन तास धरणे आंदोलन करून लोकप्रतिनिधी व शिखर बँकेच्या चुकीच्या धोरणाचा निषेध व्यक्त करण्यात आला. कसमादेचे वैभव असलेला वसाका वाचला पाहिजे, त्याची विक्री होता कामा नये, कारखाना सुरू झालाच पाहिजे, कर्मचाऱ्यांचे थकित वेतन मिळालेच पाहिजे, अशा घोषणा देत परीसर दणाणून सोडला होता. धाराशिवचे चेअरमन अभिजित पाटील यांच्यावर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे इत्यादी मागण्यांचे निवेदन तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक सार्थक नेहेते, आमदार डॉ. राहुल आहेर, खा. भास्कर भगरे, अवसायक यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी वसाका जमीन धारक कर्मचारी शशीकांत पवार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते कुबेर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. कुबेर जाधव यांनी कामगारांच्या होणाऱ्या उपासमारी संदर्भात जोरदार हल्ला केला.

धरणे आंदोलनात मनिषा पवार, उषा मोहिते, संगिता गुंजाळ, ललिता पवार आदी महीलांसह मुन्ना शिंदे, बापु देवरे, नाना पवार, समाधान निकम, सुनिल देवरे, आनंद गुंजाळ, त्र्यंबक पवार, रामा पवार, समाधान गायकवाड, रनदिर पगार, रमेश पवार आदींसह शेकडो आजी, माजी कामगार, कर्मचारी सामिल झाले होते.

# ब्रह्माकुमारी संस्थेतर्फे नाशिक पंचवटी पांजरापोळ येथे सहलीचे आयोजन



**नाशिक ।** येथील नाशिक पंचवटी पांजरापोळ, चुंचाळे शिवार येथे दि. ८ जून २०२५ रोजी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नाशिकरोड तर्फे ब्रम्हाकुमारी शक्ति दिदी व गोदावरी दिदी यांच्या अध्यक्षतेखाली सहलीचे आयोजन करण्यात आले.

गाईचे वृद्धाश्रम म्हणून सर्वश्रृत असलेल्या एसएनपीपीमध्ये साधारणतः ६५ राजयोगी बंधू भगिणींनी या सहलीचा आनंद लुटला. ८५० एकर मध्ये विस्तारलेल्या या वनपरिक्षेत्रात खास सफरसाठी बनवलेल्या ट्रॅक्टर मधून सगळ्यांनी वेगळाच आनंद लूटला. प्रवासात वेगवेगळ्या ठिकाणी मोर, बदक व अनेक जंगली पक्षांचे अवलोकन केले. या ठिकाणी बनवलेल्या लाकडी झोपडीत सर्वांनी ध्यानयोग करुन मेडीटेशनचा आनंद लूटला. शेणाने सावरलेली, निसर्ग संपदेने बहरलेली ही झोपडी विशेष आकर्षणाची केंद्रबिंदु ठरली. या ठिकाणी मेडीटेशन नंतर सर्वांनी गरबा नृत्याचा आनंद लूटला. सहलीच्या सुरुवातीला दत्तुभाऊ शिरसाठ, विठ्ठलभाऊ आगळे यानी आगळेवेगळे स्वागत केले. दत्तुभाऊ यांनी परिसराची माहिती सांगितली. सर्व कर्मचारी वृंदानी खुप चांगल्या पद्धतिने पाहूणचार केला. विश्वस्थ हितेशभाई झवेरी यांच्या परवानगीने साकारलेल्या या सहलीचा आनंद द्विगुणित झाला. या मागे राजूभाऊ सांगळे यांचा सूक्ष्म सहयोग कामी आला. एकंदरीत न भुतो न भविष्यती: अशा अलौकिक अनुभवांनी संपन्न अशा या सहलीचा सर्वांनी आनंद लुटला.

> एवढ्या चांगल्या कार्यात मिठाचा खडा काय डोंगरच आढळला ! ऐकून अतिशय वाईट वाटले की, सारुळ या शिवारात या परिसरातील डोंगराचा भाग अतिशय वाईट पद्धतीने व्यापारी दृष्टिने कापला जात आहे. दगड, खडी, मुरूम इ. बांधकाम व्यवसायासाठी लागणा-या मटेरीयल मिळवण्यासाठी डोंगरावर ब्लास्ट (स्फोट) केले जात आहेत. यातून तेथील वन व जैव विविधतेची हानी होत आहे. शासन स्तरावरुन या अराजक कार्याला पायबंध करणे गरजेचे आहे.
> **– ब्रह्माकुमार दिलीप बोरसे, माध्यम समन्वयक नाशिक**

# पोखरीत विकसित कृषी संकल्प अभियान संपन्न



**नांदगाव ।** कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार व भारतीय कृषी अनुसंधान यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने नांदगाव तालुका कृषी विभाग यांचेमार्फत मौजे पोखरी ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच किरण शामराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व संदीप मेढे उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रथम वक्ते यांचे शाल श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन पोखरी ग्रामपंचायत कार्यालयाद्वारे स्वागत करण्यात आले.

सदर अभियानात राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र पुणे डॉ. अजयकुमार उपाध्याय यांनी माती व पाणी तपासणी करून संतुलित खत व्यवस्थापन जैविक खते, सेंद्रिय खताचे शेती करिता महत्त्व पटवून देऊन जमीन सुपीक (जिवंत) करणे व पिका संजीवके महत्व व वापर या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच कृषी विज्ञान केंद्र वडल चे विषय विशेषज्ञ श्री संदीप नेरकर यांनी शेती व शेतीपूरक व्यवसाय करण्याबाबत व परिसरातील प्रमुख पिके लागवड तंत्रज्ञान, ट्रायकोडर्मा, गांडूळ खत निविष्ठांचा वाजवी वापर तसेच डाळिंब फळबाग लागवड व्यवस्थापन, भाजीपाला लागवड याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर सोनाली देसाई सहाय्यक कृषी अधिकारी यांनी कृषी विभागाच्या विविध योजना तसेच दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क तयार करण्याची पद्धत व वापर आणि महत्व याची माहिती दिली. एकात्मिक हुमणी नियंत्रण, लष्करी अळी नियंत्रण याविषयी माहिती दिली व बियाणे उघड क्षमता, चाचणी बीज प्रक्रिया याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. मका पिकावरील उशिरा येणारा मर या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी ट्रायकोर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीचे महत्त्व समजावून सांगितले. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना श्री अमोल थोरात कृषी अधिकारी यांनी केली. केंद्र सरकारच्या माध्यमातून व तालुका कृषी अधिकारी कार्यालय नांदगाव यांची द्वारे पोखरी गावात अभियान आयोजित करून सखोल मार्गदर्शन केल्यामुळे गावातील शेतकरी बांधवांना फायदा होईल, असे मत सरपंच गायकवाड यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य अरुण ढोकरे, विजय वाघमोडे, भूषण गायकवाड व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती सोनाली देसाई, श्रीमती प्रियंका पोटकुळे, श्रीमती जयश्री खलाटे, कृषी सेवक श्रीमती भक्ती भवरी, पोखरी ग्रामपंचायत कर्मचारी श्री रतन गायकवाड, दगू बागुल यांनी अथक परिश्रम घेतले.

# भाजपा मंडलातर्फे यतीन कदम यांची नाशिक ग्रामीण उत्तर जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार



**विंचूर ।** विंचूर -भारतीय जनता पक्षाच्या वतीने यतीन कदम यांची नाशिक ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भाजपा लासलगाव मंडलातर्फे व कृउबा समितीचे सभापती डी.के.जगताप व भाजपा. नाशिक जिल्हा ग्रामीण उत्तर महाराष्ट्र महामंत्री सुवर्णा जगताप,मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे यांच्या हस्ते लासलगाव येथील गणेश मंदीराचे प्रांगणात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी बाजार समितीचे सभापती डी.के. जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त करताना यतीन कदम यांना राजकीय वारसा लाभला आहे.यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे .त्यामुळे त्यांना जनसामान्यांच्या प्रश्नांची चांगली जाणीव आहे.लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती तथा संचालिका व भाजपा नाशिक जिल्हा ग्रामीण उत्तरच्या अध्यक्षा सुवर्णा जगताप यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. एक अभ्यासू व सामाजिक सामाजिकतेचे भान असलेले असे व्यक्तिमत्व आपल्याला लाभले आहे. नाशिक भागाचा सखोल अभ्यास असल्यामुळे ते जनसामान्याचे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव व कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्याची त्यांची तळमळ ही त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य आहेत. लासलगाव मंडळातील प्रत्येक पदाधिकारी,कार्यकर्ता आणि बुथ प्रमुख, हा यतीन कदमच्या मागे खंबीरपणे उभा राहील. भा.ज.पा. मंडल अध्यक्ष निलेश चालकाडे यांनी मंडलाचा आढावा मांडला.आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी यतीन कदम यांनी भाजपाच्या वतीने सत्कार केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.. भारतीय जनता पार्टीच्या वतीने माझा सत्कार सोहळा आयोजित करत भाजप लासलगाव मंडळ नी केलेला हा प्रेमपूर्वक सत्कार अत्यंत नम्रतेने स्वीकारला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना भारतीय जनता पार्टीचा मी एक सामान्य कार्यकर्ता आहे आणि माझ्यावर विश्वास ठेवलेल्या आणि साथ दिलेल्या भाजप कार्यकर्त्यांची आभार मानतो..येणाऱ्या पुढील स्वराज्य संस्थेच्या निवडणुका निवडणुकीमध्ये भाजपा च्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याचे आवाहन केले.पक्ष पूर्ण ताकद लावेलच तुम्हीही साथ द्या आणि जिल्ह्यात ताकद दाखवा. कार्यक्रमाचे निमित्ताने अध्यक्ष यतिन कदम यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला.भाजपा ज्येष्ठ नेते राजेंद्र चाफेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचांलन केले. या कार्यक्रमाप्रसंगी भाजपा चे बापूसाहेब पाटील, ॲड वाल्मीकराव गायकवाड, राजूशेठ राणा, संतोष पलोड,निलेश सालकाडे, रमेश पालवे,शेखर होळकर, दत्तोपंत डुकरे, सोमनाथ गांगुर्डे, तुकाराम गांगुर्डे, दत्तूलाल शर्मा, डॉ. सालगुडे, मनीष चोपडा, निलेश लचके, आयाज शेख, डॉ. योगेश डुंबरे,लक्ष्मण खालसे, सचिन लचके, निलेश जगताप, सुरेश बकरे, संतोष राजोळे, सागर शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, गणेश फड, राजू नागरे, संजय महाले, सुशील भोसले,सुनील नेवगे, नवनाथ जाधव, अनिल सोनवणे,अरुण भामरे, विजय कांकरिया, मामा खिलवाणी, ओम् चव्हाण,उषा कुमावत, रंजना शिंदे, ज्योती शिंदे, शैलजा भावसार, शीतल शिंदे, पूजा भावसार,सोनाली शिंदे,रश्मी माठा, नंदा शर्मा, मंजुषा केंगे,भारती महाले, सिंधू पल्हार,सर्व बूथ प्रमुख, मंडलातील सर्व भाजपा कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### मनपा शिक्षण विभागांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक वितरण

**एकलहरे ।** मनपा शिक्षण विभाग अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक वितरण रविवारपासून सुरू झाले



असून मा.प्रशासनाधिकारी मिता चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा शाळा क्रमांक ५३ चेहडी या ठिकाणावरून ७० मराठी शाळा १२ उर्दू शाळा तसेच एक इंग्रजी व हिंदी शाळेचे वाटप सुरू असून शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप केली जातील .वाटप वितरणासाठी पाठ्यपुस्तके वाटप प्रमुख प्रमुख श्री दशरथ बोराडे, किरण वाघ,प्रीतम भडांगे, विजय पगार, केदारनाथ कोकाटे, हेमंत गोसावी दत्तात्रय गायधनी तुकाराम कदम यांच्यामार्फत वाटप करण्यात आले.

# जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ‘वंचित’ कटिबद्ध!

## सुजाता आंबेडकर यांची कार्यकर्त्यांना साद





**नाशिक ।** ‘कोणतेही प्रश्न बेजबाबदारपणे मांडून जनतेच्या भावना भडकवण्याऐवजी, त्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी तुमच्याकडे यावं वाटलं पाहिजे’, असं मत वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजाता आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केलं. नाशिकमध्ये परशुराम साईखेडकर सभागृहात आयोजित वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलत होते.

या मेळाव्यात त्यांनी सांगितले की, ‘जनतेचे प्रश्न सोडविणे हेच आपले खरे उद्दिष्ट असले पाहिजे. सामाजिक परिवर्तनासाठी केवळ टीका करत बसण्याऐवजी लोकहितासाठी कार्यरत राहणं आवश्यक आहे.’ त्यांनी सांगितले की, सत्तेतील भ्रष्टाचार, गरीबांची पिळवणूक, अन्यायकारक प्रशासकीय निर्णय याविरुद्ध लढण्याची गरज आहे आणि त्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे. सुजाता आंबेडकर यांनी यावेळी सत्ताधाऱ्यांवर आणि विरोधकांवर सडकून टीका केली. विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी न दिल्याने काहींनी वंचितमधून बाहेर पडल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "ज्यांनी तुमच्यावर अन्याय केला, त्यांच्या घरी जाऊन तुम्ही बसलात, तर जनता तुम्हालाही घरात बसवेल," असा इशाराही त्यांनी दिला. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे महानगरप्रमुख अविनाश शिंदे, राजेंद्र पातोडे, दिशा पिंकी शेख, चेतन गांगुर्डे, अरुण जाधव, वामन गायकवाड, शमीना पाटील, महिला जिल्हाध्यक्ष उर्मिला गायकवाड, दामोदर पगारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत स्पष्ट भूमिका मांडली. ‘समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान राखून आम्ही लढणार आहोत. परिवर्तनासाठी तुम्ही प्रत्येक गल्लीत, प्रत्येक वॉर्डात उतरलात पाहिजे’, असं आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

# कॅलिडोस्कोप



# इथं चालतो ताऱ्यांचा खेळ!

हल्ली रात्रीच्या वेळी आकाशात पाहिलं तर लुकलुकणारे तारे, चांदण्या दिसण्याचं प्रमाण तुलनेनं बरंच कमी झालं आहे. यामागे शिश्रक कारणं आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे असं होऊ शकतं. पण अशा परिस्थितीतही भारतात निसर्गाचा एक कमाल आविष्कार प्रत्येकालाच आश्चर्यचकित करत आहे.

हा आविष्कार म्हणजे भारतातील अतिशय दुर्गम भागात असणारं एक लहानसं गाव. इथं बाहेरचं कोणी गेलं तर त्यांची दमछाक होते, थंडीनं दातखिळी बसते. इथं दूरदूरपर्यंत कोणीच नसल्यामुळं रात्रीच्या वेळी नुसतं बाहेर वावरणंही धडकी भरवतं. जगातील आणि भारतातील काळोख्या रात्रींसाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि आकाश अगदी सहजपणे दिसणाऱ्या या ठिकाणाचं, या गावाचं नाव आहे हानले.

**पर्यटकांचा ओघ सुरू**

लडाखच्या पूर्व भागात, चांगथांग पठारावर हे लहानसं गाव आहे. लेहपासून ते साधारण २५० किलोमीटर अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून हे गाव साधारण ४,५०० मीटर (१४,७६० फूट) उंचीवर वसलेलं आहे. ते आपल्या निसर्गरम्य सौंदर्यासह खगोलशास्त्रीय महत्त्वासाठीही प्रसिद्ध आहे. मागील काही वर्षांमध्ये हानलेमध्ये पर्यटकांचा ओघ वाढला असून, याला खगोलशास्त्रीय पर्यटन असंही नाव देण्यात येत आहे.

**जगातील सर्वात उंचावरील वेधशाळा**

हानले येथील वेधशाळा ही जगातील सर्वात उंचावरील वेधशाळांपैकी एक आहे. ही वेधशाळा आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संस्थांकडून विविध निरीक्षणपर कामांसाठी वापरली जाते. हानलेमध्ये फारच कमी वस्ती आणि कोणतेही शहरीकरण नसल्यामुळं इथं कृत्रिम प्रकाशाचा प्रचंड अभाव आहे. त्यामुळे येथील रात्री सर्वाधिक काळ्याकुट्ट आणि मनात धडकी भरवणाऱ्या असतात. २०२२ मध्ये हानले हे ठिकाण भारताचं पहिलं 'डार्क स्काय रिझर्व्ह' म्हणून घोषित करण्यात आलं आणि साऱ्या जगाचं लक्ष या ठिकाणानं वेधलं. खगोल अभ्यासक आणि ग्रहताऱ्यांमध्ये रमणाऱ्यांसाठी हानले म्हणजे एक पर्वणीच.


**आकाशगंगा दिसते अगदी सहज**

दिवस मावळतीला गेल्यानंतर आणि आकाश निरभ्र असेल तेव्हा हानलेमध्ये रात्रीच्या अंधारात काही अद्वितीय दृश्य आणि ग्रहतारे पाहता येतात. 'मिल्की वे' आणि इतर आकाशगंगा इथून अगदी सहजपणे आणि दुर्बिणीशिवाय पाहता येतात. उल्का वर्षाव, निखळणारे तारे, उल्कावर्षाव, चंद्र, ग्रह आणि उत्तरेकडील प्रकाशरेषा असा अद्भुत नजराणा हानले इथं येणाऱ्या प्रत्येकापुढं सादर करतं. लेहपासून इथं येण्यापर्यंतचा प्रवास तुलनेनं अधिक खडतर आहे. शिवाय हा भाग चीन सीमेनजीक येत असल्यानं अनेकदा इथं काही संवेदनशील भाग ओलांडून पोहोचावं लागतं. प्रवास कितीही मोठा असला तरी हानलेमध्ये येऊन आपल्याला नगण्य भासवणारी भव्य आकाशगंगा आकाशात दिसते तेव्हा इथं येण्याचं चीज झाल्याचीच एकमेव भावना मनात घर करते.

# थायलंडमध्ये मांजरीला अटक


बँकॉक पोलिसांनी अडकलेल्या एका मांजरीची सुटका केली आणि तिला परत अटक केली. प्रत्यक्षात, सुटका केल्यानंतर, मांजरीने पोलिस अधिकाऱ्यांना अनेक वेळा चावा घेतला. म्हणूनच तिला अटक करण्यात आली. आता मांजरीचा 'मगशॉट' व्हायरल होत आहे. पोलिसांनी मांजरीची काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. बँकॉक पोलिस अधिकारी दा परिंदा पाकिसुक यांनी हरवलेल्या अमेरिकन शॉर्टहेअर मांजरीची असामान्य कहाणी शेअर केली.

साउथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार त्यांनी मांजरीचे चांगले स्वागत केले आणि तिची काळजी घेण्यास सुरुवात केली. आम्हाला प्रेम देण्याऐवजी, गोंडस गुलाबी हार्नेस घातलेली मांजर अनेक पोलिस अधिकाऱ्यांना ओरबाडू लागली आणि चावू लागली. या मांजरीचे नाव नाब तांग आहे. त्याचा अर्थ 'पैसे मोजणे' असा होतो. एका अधिकाऱ्याने लिहिले, की या मांजरीवर पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे आणि तिला ताब्यात घेण्यात आले.



**पोलिस अधिकाऱ्याचा काल्पनिक अहवाल**

अधिकाऱ्याने सांगितले, ती सध्या सर्वोत्तम जीवन जगत आहे. पोलिसच खरे बळी आहेत. पोस्ट व्हायरल होताच अनेकांनी मांजरीला दत्तक घेण्यात रस दाखवला, परंतु आपली प्राथमिकता तिचा खरा मालक शोधणे असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मांजरीचा मालक दुसऱ्या दिवशी पोलिस ठाण्यात पोहोचला. कथेला एक मजेदार शेवट देण्यासाठी अधिकाऱ्याने मांजरीच्या दृष्टिकोनातून एक काल्पनिक पोलिस अहवाल लिहिला. मला फक्त भूक लागली होती. माझा कोणालाही चावण्याचा हेतू नव्हता, असे त्यात लिहीण्यात आले होते. त्यानंतर अधिकाऱ्याने मांजरीला तिच्या मालकाकडे एका मजेदार चिठ्ठीसह सुपूर्द केले.




# भारताचा बदलला भूगोल!

भारताची सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७ किलोमीटरने वाढली आहे. म्हणजेच भारताची एकूण सागरी किनारपट्टी आता ११०९८.८१ किलोमीटर इतकी झाली आहे. भारताच्या या वाढलेल्या किनारपट्टीमुळे संशोधक अंचबित झाले आहेत. भारताची सागरी किनारपट्टी वाढण्यामागे अनेक कारणे समोर आली आहेत.

भारताच्या सागरी किनारपट्टीची लांबी ७,५६१.६० किमी इतकी असल्याचे आपण आतापर्यंत शालेय पुस्तकांमधून शिकलो आहोत. तसेच अधिकृत कागदपत्रांमध्येदेखील असाच उल्लेख आढळतो, पण आता भारताच्या सागरी सीमांच्या नवीन गणनेनंतर देशाच्या सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७.२१ किलोमीटर म्हणजेच सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये ऑफशोअर बेटे आणि इतर लहान-मोठ्या बेटांचादेखील समावेश आहे.

**सुधारित किनारपट्टी मोजणीला मान्यता**

ही बेटे जुन्या गणनेत समाविष्ट नव्हती. किनारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या सुधारित आकृतीला एकमताने सहमती दर्शविली आहे. यामुळे भारताच्या भौगोलिक माहितीमध्ये हा मोठा बदल झाला आहे. केंद्रीय नौवहन मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नवीन पद्धत वापरून केलेल्या गणनेनंतर सुधारित किनारपट्टीच्या लांबीला अधिकृतपणे मान्यता देण्यात आली आहे. भारताच्या सागरी किनारपट्टीच्या मोजणीचा वाद २०१० पासून सुरू होता. गृह मंत्रालयाच्या मते, १९७० पासून भारताच्या किनारपट्टीची लांबी ७,५६१ किलोमीटर आहे. विविध सरकारी विभागांनी किनारपट्टीसाठी वेगवेगळे आकडे वापरले आहेत. २०१९ मध्ये या मुद्द्याची तपासणी करण्यात आली. किनारपट्टी संवर्धन आणि विकास सल्लागार समिती २०१० पासून या मुद्द्यावर विचारविनिमय करत होती.

**प्रमाण आणि गणना पद्धतीत बदल**

विद्यमान किनारपट्टीच्या लांबीमध्ये इतक्या मोठ्या फरकाचे मुख्य कारण म्हणजे प्रमाण आणि गणना पद्धतीतील झालेला बदल आहे. वेगवेगळ्या स्केलच्या नकाशांवरून किनारपट्टीची लांबी मोजली जाते, तेव्हा त्यात फरक असू शकतो. नकाशा जितका मोठा आणि स्पष्ट असेल तितका लांबीचा डेटा अधिक अचूक असेल. आता केलेल्या गणनेमध्ये खाडी, किनारी बेटे आणि बेटे यासारख्या विविध रचनांचा समावेश आहे. मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार, भारताच्या किनारपट्टीच्या लांबीमध्ये १,२९८ ऑफशोअर बेटे आणि बेटे समाविष्ट आहेत. यामध्ये १०५९ ऑफशोअर बेटे आणि २३९ बेटे आहेत. भारतातील मुख्य भूमीत समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये गुजरातच्या सागरी किनारपट्टीची लांबी सर्वाधिक आहे. गुजरातची किनारपट्टी २,३४०.६२ किलोमीटर आहे. त्याच वेळी पुद्दुचेरीच्या किनारपट्टीची लांबी सर्वात कमी म्हणजे ४२.६५ किलोमीटर आहे.



# भेदभाव पडला महागात


पेरु या देशातल्या एका रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. आता हा दंड का बरं ठोठावण्यात आला असावा? एखादा नियम मोडल्याबद्दल त्यांना दंड ठोठाण्यात आला असावा, असं तुम्हाला वाटत असेल तर ते चूक आहे. कारण महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केल्याप्रकरणी रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. पेरुची राजधानी लिमाच्या समुद्रकिनाऱ्यालगत ला रोजा नॉटिका नावाचं रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनाने महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळं मेनूकार्ड तयार केलं. महिलांसाठी तयार केलेल्या मेनूकार्डमध्ये किंमती छापण्यात आल्या नव्हत्या तर पुरुषांना देण्यात येणाऱ्या मेनूकार्डमध्ये पदार्थांच्या नावाशेजारी किंमती छापण्यात आल्या होत्या. मात्र अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. यासाठी रेस्टॉरंटच्या मालकांना ६२ हजार डॉलर म्हणजे जवळपास ४४ लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. महिलांना दिल्या जाणाऱ्या मेनूकार्डमध्ये किंमत न छापण्याबाबत रेस्टॉरंट प्रशासनाचा अजब तर्क आहे. मेनूकार्ड बघताना महिला पदार्थाऐवजी त्याच्या किंमतीकडे जास्त लक्ष देतात. किंमतीचा विचार मनात असल्यामुळे महिलांना जेवणाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे त्यांना किंमत नसलेलं मेनूकार्ड देण्यात येत असल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. हा तर्क योग्य की अयोग्य हे सांगता येत नसलं तरी अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं सांगत लिमामधल्या प्रशासनाने दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. १९८० मध्ये अमेरिकेतल्या लॉस एंजल्समधल्या एका रेस्टॉरंटनेही महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केला होता. याला विरोध झाल्यानंतर रेस्टॉरंट बंद करावं लागलं.

# ... म्हणून ही खिडकी वेगळी



आपण रेल्वेने प्रवास करतो. भारतीय रेल्वेचं जाळं संपूर्ण देशभर पसरलं आहे. दूरवरची अनेक राज्यं रेल्वेच्या या जाळ्यामुळे एकमेकांशी जोडली गेली आहेत. रेल्वेशी संबंधित बऱ्याच बाबी आहेत. पण सध्या आपण रेल्वेतल्या खिडक्यांबाबत जाणून घेऊ. ट्रेनमध्ये खिडकीची जागा पकडायला प्रत्येकालाच आवडतं. पण तुम्ही कधी दाराजवळच्या खिडकीत बसला आहात का? ही खिडकी इतर खिडक्यांपेक्षा थोडी वेगळी असते. डब्यातल्या इतर खिडक्यांना तीन सळ्या असतात. मात्र दाराजवळच्या या खिडकीला चार सळ्या बसवलेल्या असतात. याचं कारण काय, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. दरवाज्याजवळच्या खिडकीतून चोरी होण्याचा धोका बराच जास्त असतो. या खिडकीतून आत हात घालून चोरी होऊ शकते. रात्रीच्या वेळी प्रवासी झोपेत असताना या खिडकीतून चोरी होऊ शकते. चार सळ्या लावल्यामुळे हात आत जाऊ शकत नाही आणि चोरी टळू शकते. याच कारणामुळे या खिडकीला एक अतिरिक्त सळी बसवलेली असते.

# वरातीमुळे न्यू यॉर्कमध्ये वाहतूक कोंडी



भारतात लग्नाची चर्चा होत असताना त्यात वरातीचा उल्लेख नसेल, तर तो विषय अपूर्ण राहतो. खरंतर, आपल्या देशात वरातीशिवाय लग्न पूर्ण होत नाही. वरातीमुळे वाहतूक कोंडी होत नाही आणि नाच करणाऱ्यांना घड्याळात १२ वाजले आहे, हे दाखवत नाही, तोपर्यंत मजा येत नाही. न्यू यार्कमध्येही ४०० वऱ्हाडी मंडळींनी रस्त्यावर घातलेल्या गोंधळामुळे रस्ताच जाम झाला. न्यू यॉर्कमधील वॉल स्ट्रीवर वरातीमुळे वाहतूक बंद पडली होती. यावेळी तब्बल ४०० लोक डीजेच्या तालावर एकत्र नाचत होते.

न्यू यार्कमधील या वरातीत ढोलताशा, डीजेसह सर्व व्यवस्था होती. न्यू यार्कमधील वॉल स्ट्रीटमध्ये यापूर्वी कधीही असा रस्ता बंद झाला नव्हता. भारतीय वरातीमुळे असा चमत्कार घडला असून, वाद्यांच्या तालावर चारशे लोकांनी ठेका धरल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. त्यांच्या या आनंदावर विरजण टाकायला कुणीच तयार नव्हते. ही बतमी व्हयरल झाल्यावर एका यूजरने म्हटले, ४०० लोकांच्या मिरवणुकीसाठी वॉल स्ट्रीट बंद होऊ शकेल, असे कोणाला तरी वाटले असेल? ही निश्चितच आयुष्यात एकदाच अनुभवायला मिळू शकणारी जादू आहे. एका युजरने लिहिले, यांनी यासाठी काही विशेष परवानगी घेतली होती का? दुसऱ्याने लिहिले, हे निश्चितच उत्तर भारतातील लोकांचे वर्तन आहे. अन्य एका युजरच्या मते अशा कारणांसाठीच ट्रम्प या लोकांना हद्दपार करत आहे.

# सात फेऱ्यांपूर्वीच वधूचा लग्नाला नकार



लग्नाचा मंडप सजवला होता. पुजारी मंत्र म्हणत होते. नातेवाइकांच्या नजरा वधू-वरांवर खिळल्या होत्या. वातावरण आनंदाने भरून गेले होते. पण फक्त सात फेरे शिल्लक असताना वधूने लग्न करण्यास नकार दिला.

आपल्याला हे लग्न करायचे नव्हते, असे तिने स्पष्ट सांगितले. कुटुंब, समाज किंवा नातेवाइकांची पर्वा न करता तिने आपला मुद्दा मांडला. हा निर्णय वधूने इतका अचानक सांगितला की सर्वांनाच धक्का बसला. अनेकांना आश्चर्य वाटले, तर काहींनी तिच्या धाडसाचे कौतुकही केले.

**नेमकं काय घडलं?**

कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील बुवनहल्ली गावात ही घटना घडली. पल्लवी नावाच्या मुलीचे लग्न अलूर तालुक्यातील रहिवासी वेणुगोपालशी निश्चित झाले होते. सर्व नातेवाईक आनंदाने नाचत होते. वर हातात मंगळसूत्र घेऊन उभा होता आणि पुढच्याच क्षणी सात फेरे घ्यायचे होते तेव्हा पल्लवीने हा निर्णय घेतला आणि संपूर्ण वातावरणात शांतता पसरली.

**वधू तिच्या प्रियकरासह ...**

आपले प्रेम दुसऱ्या व्यक्तीवर आहे आणि आपले आयुष्य त्या व्यक्तीसोबतच घालवायचे आहे, असे तिने सांगितले. हे ऐकून मंडपात बसलेले लोक थक्क झाले. काही लोकांना सुरुवातीला काय घडत आहे यावर विश्वासच बसत नव्हता. मुलीच्या पालकांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. नातेवाइकांनीही आपापल्या परीने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, पण पल्लवी डगमगली नाही. नंतर पल्लवीचा प्रियकर पोलिसांसह तिथे पोहोचला आणि वधूला सोबत घेऊन गेला.

# चित्रविचित्र वस्तूसंग्रहालये

भारतात चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं आहेत. अहमदाबादमधल्या व्हिचर वस्तूसंग्रहालयात बरीच भांडी बघायला मिळतात. या संग्रहालयात चार हजारपेक्षा अधिक भांडी मांडण्यात आली आहेत. ही सगळी भांडी विविध धातूंपासून बनवण्यात आली आहेत. प्राचीन काळातली भांडी इथे पहायला मिळतात. राजधानी दिल्लीत सुलभ आंतरराष्ट्रीय टॉयलेट म्युझियम आहे. इथे वेगवेगळ्या आकाराची शौचालयं पहायला मिळतात. हे संग्रहालय दिल्लीतलं खास आकर्षण आहे. इथे पुरातन शौचालयंही आहेत. हे संग्रहालय के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. दिल्लीतच एक बाहुल्यांचं संग्रहालय आहे. या संग्रहालयात अत्यंत सुंदर आणि आकर्षक बाहुल्या पहायला मिळतात. हे म्युझियमही के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. गुवाहाटीतल्या मायोंग गावात खूपच विचित्र संग्रहालय आहे. या संग्रहालयात मानवी कवट्या तसंच जादूटोण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. जादूटोना संग्रहालय याच नावाने ते ओळखलं जातं.






# पुरातन ठेवा परत मिळाला

संगीतकार स्टिफन मॉरिस यांना त्यांचं हरवलेलं व्हायोलिन हे वाद्य परत मिळालं आहे. लंडनच्या दक्षिण भागात रेल्वेने प्रवास करताना त्यांचं व्हायोलिन हरवलं होतं. हे व्हायोलिन ३१० वर्षांपूर्वीचं असल्यामुळे मॉरिस यांच्या जीवाची घालमेल सुरू होती. जुन्या काळातलं व्हायोलिन परत मिळू शकत नसल्याने ते खूपच अस्वस्थ झाले होते. मात्र १० दिवसांनी त्यांना व्हायोलिन मिळालं. या पुरातन व्हायोलिनची किंमत थोडीथोडकी नाही. हे वाद्य खरेदी करण्यासाठी तुम्हाला २.५ लाख पाउंड म्हणजे जवळपास २.२८ कोटी रुपये द्यावे लागतील. व्हायोलिनची ही किंमत ऐकून कोणीही उडेल. डेव्हिड टेक्लर यांनी १७०९ मध्ये हे व्हायोलिन तयार केलं होतं. स्टिफन यांनी आपलं व्हायोलिन हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीस कामाला लागते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तपासून त्यांनी आरोपीला ओळखलंही होतं. ही माहिती मिळताच फक्त २४ तासांमध्ये आरोपीने स्टिफन मॉरिस यांच्याशी ट्विटरवरून (एक्स) संपर्क साधला आणि व्हायोलिन परत देणार असल्याचं सांगितलं. ठरवलेल्या ठिकाणी रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी स्टीफन यांना व्हायोलिन मिळालं. व्हायोलिन परत केल्यामुळे आरोपीला ताब्यात घेणार नसल्याचं लंडन पोलिसांनी सांगितलं.

# पुण्यातील गुंडाचा सोलापुरात खात्मा



**सोलापूर, दि. १५ प्रतिनिधी**

पुणे पोलिसांच्या दप्तरी अनेक गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराचा पुण्यातील सराईत गुंडाचा सोलापुरात पुणे पोलिसांनी एन्काउंटर केला आहे. सोलापुरातील लांबोटीजवळ पुणे गुन्हे शाखेनं कारवाई केली. शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख (वय 23) असे या सराईत गुंडाचे नाव आहे. गंभीर अवस्थेत त्याला सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, पुणे पोलिसांनी खात्मा केलेल्या शाहरुखवर अनेक गुन्ह्यांची नोंद असून तो सराईत गुंड होता. शाहरुखवर पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल आहेत. गेल्या काही दिवापासून तो सोलापुरातील लांबोटी गावाजवळ लपून बसला असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे त्याचा मुसक्या आवळण्यासाठी पुणे गुन्हे शाखेचे पथक मध्यरात्री लांबोटी येथे आले होते. यावेळी पोलिसांनी लपलेल्या घरात छापेमारी केली. छापेमारी करताना आरोपी शाहरुख शेखने पोलिसांवर गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या गोळीबाराला प्रत्युत्तर देताना शाहरुख उर्फ अट्टी शेख गंभीर जखमी झाला. यानंतर गंभीर अवस्थेत त्याला सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

# पंतप्रधान परदेश दौऱ्यावर
## जी७ शिखर परिषदेत सहभाग



**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवार १५ जूनपासून तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. कॅनडामध्ये होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणे हा त्यांच्या या परदेश दौऱ्याचा मुख्य हेतू आहे. त्याशिवाय सायप्रस आणि क्रोएशिया या देशांनाही ते भेट देणार आहेत. मोदी यांच्या दौऱ्याची सुरुवात सायप्रस भेटीने होणार असून त्यानंतर ते कॅनडामध्ये होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होतील. ही शिखर परिषद कनानस्किस येथे होणार आहे. मोदी १६ आणि १७ जून रोजी परिषदेत सहभागी होतील. त्यापूर्वी १५ आणि १६ जून रोजी ते सायप्रसला असतील.

सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडलाइड्स यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी यांचा दौरा आयोजित करण्यात आला आहे. ते राजधानी निकोसियामध्ये अध्यक्ष क्रिस्टोडलाइड्स यांच्याशी चर्चा करतील आणि लिमासोलमध्ये व्यावसायिक नेत्यांची भेट घेतील, असे परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात नमूद केले आहे. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, १८ जून रोजी मोदी क्रोएशियाला भेट देतील, असे परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# विजयी मिरवणुकीसाठी बीसीसीआयची नवीन नियमावली

**नवी दिल्ली, दि.१५ वृत्तसंस्था**

यंदा आयपीएल हंगामात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू ने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावल्यावर बंगळूरूमध्ये सार्वजनिक विजय सोहळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेनंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भविष्यातील अशा कार्यक्रमांसाठी सुरक्षा नियमावली तयार करण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

बीसीसीआयच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, "बंगळुरू येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने व्यापक नियमावली तयार करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात येत आहे."

ही समिती बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांच्या अध्यक्षतेखालील असून उपाध्यक्ष राजीव शुक्ला आणि कोषाध्यक्ष प्रभतेज सिंग भाटिया हे इतर सदस्य असतील. बीसीसीआयच्या अलीकडील अॅपेक्स कौन्सिल बैठकीत या समितीची घोषणा करण्यात आली. समितीला



१५दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करायचा आहे. आरसीबीने आयपीएलफायनल जिंकल्यानंतर ४ जून रोजी बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर विजय सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा फार कमी वेळात आणि कोणतीही औपचारिक परवानगी न घेता आयोजित करण्यात आला. परिणामी सुमारे दोन लाख लोकांची गर्दी झाली, जी स्टेडियमच्या क्षमतेच्या खूपच पलीकडची होती. सुरक्षेचा अभाव, अपुरी तयारी आणि वाहतूक पोलिसांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती बिघडली आणि चेंगराचेंगरी झाली.

विधान सौध येथून नियोजित मिरवणूक रद्द करण्यात आली होती, तरीही यापूर्वीच चाहत्यांनी मोठ्या संख्येने परिसरात गर्दी केली होती.

या घटनेनंतर आरसीबी च्या मार्केटिंग प्रमुखासह डीएनए एंटरटेनमेंट कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. कर्नाटका क्रिकेट असोसिएशनचे सचिव आणि कोषाध्यक्ष यांनी नैतिक जबाबदारी घेत राजीनामे दिले आहेत.

कर्नाटक राज्य सरकारने आरसीबी आणि बीसीसीआय दोघांनाही यासाठी जबाबदार धरले असून, आयोजनातील हलगर्जीपणावर तीव्र टीका केली आहे.

# इराण-इस्त्रायल युद्धात पाकिस्तानने घेतली भूमिका
## मुस्लीम देशांना एकजूट होण्याचे आवाहन

**इस्लामाबाद, दि. १५ वृत्तसंस्था**



इस्त्रायलविरोधात सैन्य संघर्षात इराणलाचीन आणि रशियानंतर आता पाकिस्तानची साथ मिळाली आहे. पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी इराणचे राष्ट्रपती मसूज पेजेश्कियन यांच्याशी संवाद साधला. इस्त्रायलकडून होणारे हल्ले उकसवण्याचा प्रकार असल्याचे पाकिस्तानने म्हटले. त्यासोबतच इस्त्रायलविरोधात मुस्लीम राष्ट्रांना एकजूट होण्याचं आवाहन पाकिस्तानने केले आहे. इस्त्रायलने शुक्रवारी इराणच्या अण्वस्त्र सेंटर आणि सैन्य तळांवर हल्ले केले. त्यात इराणचे अनेक वरिष्ठ सैन्य प्रमुख आणि अण्वस्त्र वैज्ञानिक मारले गेले. इराणनेही या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलच्या तेल अवीव या प्रमुख शहरांवर मिसाईल हल्ले केले.

शहबाज शरीफ यांनी शनिवारी इराणी राष्ट्रपतींशी फोनवरून चर्चा केली. त्यात इस्त्रायलकडून झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवला. हा हल्ला इराणच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला आव्हान देणारा असून आंतरराष्ट्रीय कायद्याचेही उल्लंघन केले आहे. इस्त्रायलने विनाकारण केलेल्या हल्ल्याविरोधात पाकिस्तान इराणसोबत एकजुटीने उभा आहे. इराणला आत्मरक्षणाचा अधिकार आहे. इस्त्रायल प्रादेशिक, जागतिक शांतता आणि स्थिरतेसाठी गंभीर धोका निर्माण करत आहे असा आरोपही शहबाज शरीफ यांनी केला.

तसेच शहबाज यांनी जागतिक समुदायाकडे, संयुक्त राष्ट्र आणि मुस्लिम देशांना इस्त्रायलविरोधात आक्रमक भूमिका घेत त्यांच्या अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी तात्काळ पाऊले उचलण्याची मागणी केली आहे. पाकिस्तान शांतता राखण्यासाठी कटिबद्ध आहे आणि त्याबाबत भूमिका निभावण्याची तयारी असल्याचे शरीफ यांनी म्हटलं. तर इराणचे राष्ट्रपती यांनीही कठीण काळात आणि संयुक्त राष्ट्र परिषदेत इराणची साथ दिल्याबद्दल पाकिस्तानचे आभार मानले आहेत. शरीफ यांच्या भूमिकेने दोन्ही देशातील संबंध आणखी घनिष्ठ झाल्याचे हे दिसून येते असंही त्यांनी म्हटलं.

दरम्यान, या तणावाच्या परिस्थितीत इराणने पाश्चात्य देशांना मोठा इशारा दिला आहे. पाश्चात्य देशांनी जर इस्त्रायलला मदत केली तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. जर पाश्चात्य देशांनी इस्त्रायलवर होणारे इराणी हल्ले रोखण्यास मदत केली तर अमेरिका, ब्रिटन, फ्रान्सच्या सैन्य ठिकाणांवर आणि त्यांच्या युद्धनौकांवर टार्गेट हल्ला करण्यात येईल असं इराणने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

# इंधन कमी झाले आणि ब्रिटिश नौदलाचे अत्याधुनिक फायटर जेट थेट केरळमध्ये उतरले

**तिरुअनंतपुरम, दि. १५ वृत्तसंस्था**

युनायटेड किंगडमच्या नौदलातील अत्याधुनिक F-35 फायटर जेटने शनिवारी सायंकाळी इंधन कमी झाल्यामुळे केरळच्या तिरुअनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग केल्याची घटना समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, हे लढाऊ विमान ब्रिटनच्या HMS Prince of Wales या विमानवाहू युद्धनौकेचा भाग आहे. हे विमान सध्या तिरुअनंतपुरम विमानतळावरच थांबवण्यात आले आहे. हे विमान भारतीय महासागरावर गस्त घालत असताना ही घटना घडली.

हे 5व्या पिढीतील स्टेल्थ फायटर जेट यूकेच्या प्रिन्स ऑफ वेल्स कॅरिअर स्ट्राईक ग्रुपचा एक भाग आहे, जो सध्या इंडो-पॅसिफिक क्षेत्रात तैनात असून अलीकडेच भारतीय नौदलासोबत संयुक्त सागरी सराव पूर्ण केला आहे.

लष्करी विमान तज्ज्ञांनुसार, ही घटना काहीशी दुर्मिळ असली तरी



अभूतपूर्व नाही. F-35B प्रकार हे शॉर्ट टेक-ऑफ आणि व्हर्टिकल लँडिंग क्षमतेसाठी डिझाइन करण्यात आले आहे, जे त्याला विमानवाहू नौकांवर उड्डाण आणि लँडिंग करण्यास सक्षम बनवते — विशेषतः अशा जहाजांवर जेथे पारंपरिक कॅटपल्ट प्रणाली नाही.

हे विमान पुन्हा HMS Prince of Wales वर लँडिंग का करू शकले नाही, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र प्राथमिक माहितीप्रमाणे, विमानवाहू नौकेभोवती असलेल्या प्रतिकूल हवामानामुळे सुरक्षित लँडिंग शक्य झाले नसावे, असा अंदाज वर्तवला जात आहे.

F-35 कार्यक्रम हा अमेरिकन संरक्षण कंपनी लॉकहीड मार्टिनच्या नेतृत्वाखाली विकसित केला असून, तो जगातील सर्वात अत्याधुनिक बहुउद्देशीय लढाऊ विमान कार्यक्रमांपैकी एक मानला जातो.

या विमानाची स्टेल्थ क्षमता, इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली आणि डेटा शेअरिंग प्रणाली या गोष्टी अमेरिका, यूके, इस्रायल व नाटोच्या आधुनिक हवाई रणनीतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.

या आपत्कालीन लँडिंगबाबत यूकेच्या संरक्षण मंत्रालयाकडून किंवा लॉकहीड मार्टिनकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. रविवारी सकाळपर्यंत, हे लढाऊ विमान तिरुअनंतपुरम विमानतळावरच तैनात आहे.

या घटनेपूर्वीच भारतीय नौदल आणि युनायटेड किंगडमच्या कॅरिअर स्ट्राईक ग्रुप यांच्यात पश्चिम अरबी समुद्रात 'पासेज एक्सरसाइज' नावाचा संयुक्त सराव पार पडला. या सरावाद्वारे यूके स्ट्राईक ग्रुपने इंडो-पॅसिफिक प्रदेशात त्यांचा पहिला मोठा सहभाग नोंदवला.

## ओसवाल पंप्सची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर खुली




कंपनीचा इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) शुक्रवार, १३ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि मंगळवार, १७ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २४ इक्विटी शेअर्ससाठी बोली लावू शकतात आणि त्यानंतर २४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ८९० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि विवेक गुप्ता यांच्या ८१,००,००० पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा मिश्रण आहे.

**लोकार्थ**

गेल्या तीन आर्थिक वर्षात महसूल वाढीच्या बाबतीत भारतातील सर्वात वेगाने वाढणारी एकात्मिक सौर पंप उत्पादक कंपनी ओसवाल पंप्स लिमिटेडचे आर्थिक वर्ष २०२२ आणि आर्थिक वर्ष २०२४ दरम्यान उत्पन्न ४५.०७ टक्क्यांच्या 'सीएजीआर'ने वाढले आहे. त्यांनी त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी रु. १ दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी रु. ५८४/- ते रु. ६१४ किंमतपट्टा निश्चित केला आहे.

त्याच्या नवीन इश्यूमधून मिळालेले उत्पन्न, कंपनीच्या काही भांडवली खर्चासाठी निधी देण्यासाठी ८९.८६ कोटी रुपयांपर्यंत; हरियाणातील कर्नाल येथे नवीन उत्पादन युनिट्सच्या स्थापनेसाठी निधी देण्यासाठी तिच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी, ओसवाल सोलरमध्ये इक्विटीच्या स्वरूपात गुंतवणूकीसाठी २७२.७६ कोटी रुपये; कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांच्या अंशतः किंवा पूर्ण, पूर्व-पेमेंट/पुनर्भरणासाठी २८० कोटी रुपये; वापरण्यात येणार आहेत.

## अहमदाबाद विमान अपघातातील बळींसाठी एलआयसीच्या सवलती जाहीर

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या फ्लाइट एआय १७१ मधील प्रवाशांच्या आणि क्रू सदस्यांच्या तसेच जमिनीवरील लोकांच्या मृत्यूबद्दल एलआयसी ऑफ इंडिया तीव्र दुःख व्यक्त करते.एलआयसी ऑफ इंडिया बाधितांना मदत करण्यास वचनबद्ध आहे आणि आर्थिक मदत देण्यासाठी दाव्याचे निपटारे जलद करेल.

एलआयसी ऑफ इंडियाने एलआयसी पॉलिसींच्या दावेदारांच्या अडचणी कमी करण्यासाठी अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. मृत्यू प्रमाणपत्रांऐवजी, विमान अपघातामुळे पॉलिसीधारकाच्या मृत्यूच्या सरकारी नोंदींमधील कोणताही पुरावा किंवा केंद्र/राज्य सरकार/विमान प्राधिकरणांनी दिलेली कोणतीही भरपाई मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारली जाईल.दावेदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि बाधित कुटुंबांना दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील.अधिक मदतीसाठी दावेदार जवळच्या शाखा/विभाग/ग्राहक क्षेत्राशी संपर्क साधू शकतात.

दावेदार आमच्या कॉल सेंटरवर देखील कॉल करू शकतात - ०२२ ६८२७६८२७

## एमसीए पुणे येथे बजाज लायटिंगद्वारे एलईडी रूपांतरणासह स्टेडियमला चमक



नावीन्य, कामगिरी आणि शाश्वततेचे मिश्रण करत एक ऐतिहासिक पाऊल उचलत, बजाज लाइटिंगने पुण्यातील गहुंजे येथील प्रतिष्ठित महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) स्टेडियममध्ये पुढील पिढीतील एलईडी फ्लडलाइटिंगसह यशस्वीरित्या सुधारणा केली आहे.

हे केवळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यापुरते मर्यादित नाही – हे क्रीडा प्रकाशयोजना आणि प्रसारण उत्कृष्टतेमध्ये जागतिक मानके प्रस्थापित करण्याच्या भारताच्या तयारीचे एक धाडसी विधान आहे.

या परिवर्तनात ब्लास्टर एलईडी – बजाज लाइटिंगची अत्याधुनिक फ्लडलाइटिंग प्रणाली – समाविष्ट आहे, जी खेळाच्या मैदानावर एकसंध, चकाकीविरहित प्रकाश देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा मानकांनुसार डिझाइन केलेली ही प्रकाशयोजना केवळ उजेडच सुधारित करत नाही, तर खेळाडूंना, स्टेडियममधील प्रेक्षकांना आणि जगभरातील लाखो प्रेक्षकांना एक तल्लीन करणारा अनुभवही प्रदान करते.

"हा प्रकल्प सीमा ओलांडण्याच्या आमच्या अटल वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे," असे बजाज लाइटिंग सोल्युशन्सचे सीओओ राजेश नाईक म्हणाले. "बजाज लाइटिंगमध्ये, आमचा ठाम विश्वास आहे की प्रकाशयोजना ही प्रेरणादायी आणि सक्षम करणारी असावी. एमसीए स्टेडियमच्या माध्यमातून, आम्ही केवळ जागतिक दर्जाची प्रकाशयोजना सादर केली नाही, तर भारतीय क्रीडास्थळांच्या भविष्याचा मजबूत पाया घातला आहे – जिथे तंत्रज्ञान, शाश्वतता आणि कामगिरी एकत्र येतात."

## आल्पेनलिबेने भारतातील पहिले लिक्विड चॉको भरलेले पॉप केले लॉन्च !




आल्पेनलिबे इक्लेयर्स ही तिच्या समृद्ध, चोको सारखे लिक्विड ने भरलेल्या स्वादासाठी ओळखली जाते आणि अनेक वर्षांपासून ती ग्राहकांची आवडती राहिली आहे. या खास आणि लोकप्रिय चवेला पुढे नेत, आल्पेनलिबे आता घेऊन आली आहे एक नवे रूप, आल्पेनलिबे इक्लेयर्स पॉप, भारतातील पहिली लॉलीपॉप ज्यामध्ये आहे चोको सारख्या लिक्विड भरलेलं.

केवळ रु. 5 मध्ये मिळणारी इक्लेयर्स पॉप एक खास स्वादानुभव देते, बाहेरून मऊ आणि चवदार कैरेमलचा थर आणि आतमध्ये गोडसर, वाहणारा चोको सारखा लिक्विड फिलिंग. ही लज्जतदार ट्रीट आता अधिक सोयीस्कर आणि सहज खाण्यासारख्या रूपात सादर करण्यात आली आहे, विशेषतः किशोरवयीन आणि तरुणांसाठी, जे कोणत्याही वेळी, कुठेही आपली गोड खाण्याची इच्छा पूर्ण करू इच्छितात. हळूहळू चव घेतली तरी वा एकदम खाल्ली तरीही इक्लेयर्स पॉप नेहमीच्या स्नॅक्सला एका गोड चोको सारख्या आनंदात बदलतो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकन जनतेचा रस्त्यावर उतरून निषेध
## परेड आणि वाढदिवसासाठी 350 कोटींचा चुराडा

**वॉशिंग्टन, दि. १५ वृत्तसंस्था**

अमेरिकेत एकाच वेळी उत्सव आणि निषेधाचे वातावरण दिसत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा वाढदिवस आणि अमेरिकन सैन्याच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त उत्सवाचे वातावरण आहे. तर ट्रम्प यांचा वाढदिवस आणि या निमित्ताने अमेरिकन सैन्याची भव्य परेड यासाठी तब्बल ३५० कोटींचा चुराडा करण्यात आला. त्यामुळे ट्रम्प यांच्या धोरणांनी आधीच संतप्त असलेल्या जनतेच्या संतापात भर पडली आणि त्याचा निषेध करण्यासाठी जनता मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी १४ जून रोजी त्यांचा ७९वा वाढदिवस साजरा केला. तसेच याच



दिवशी अमेरिकन सैन्याचा २५०वा वर्धापन दिनही आहे. या प्रसंगी राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये एक भव्य सैन्य परेड आयोजित करण्यात आली होती. त्यात ६००० हून अधिक सैनिक, १५० हून अधिक चिलखती वाहने आणि ५० हून अधिक लढाऊ विमानांचा सहभाग होता. या भव्य परेडवर ३५० कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. त्याचा जनतेतून निषेध व्यक्त होत आहे.

ट्रम्प यांच्या धोरणांना आणि लष्करी परेडला हुकूमशाहीचे प्रतीक मानून नो किंग्ज अशा घोषणा देत निदर्शकांना निषेध व्यक्त केला आहे. अमेरिकेत अनेक ठिकाणी हे निदर्शने होत आहेत. नो किंग्ज असे फलक घेत जनता रस्त्यावर उतरली आहे. अमेरिकेत १५०० हून अधिक ठिकाणी निदर्शने होत आहेत. हॉलिवूडमधील अनेक तारे या निदर्शनांमध्ये सहभागी झाले होते. हे चित्रपट तारे मूळतः ट्रम्प यांच्या धोरणांना, विशेषतः बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्धच्या त्यांच्या कठोर कारवाईला विरोध करण्यासाठी आग्रेसर आहेत. ट्रम्प समर्थक या परेडला देशाच्या लष्करी ताकदीचे प्रतीक मानतात, तर विरोधक याला हुकूमशाही म्हणत आहेत. त्यामुळे अमेरिकेत आता संघर्ष शिगेला पोहचला आहे.

# स्मार्ट सिटीच्या नावावर 2700 कोटींचा घोटाळा

**जयपूर, दि. १५ वृत्तसंस्था**

'धोलेरा स्मार्ट सिटी प्रोजेक्ट'च्या नावाखाली राजस्थानमधील दोन भावांनी जवळपास 70,000 गुंतवणूकदारांना तब्बल 2676 कोटी रुपयांनी गंडा घातल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

राजस्थानच्या सीकर जिल्ह्यातील सुभाष बिजारणी आणि रणवीर बिजारणी या दोन भावांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह Nexa Evergreen नावाची कंपनी स्थापन केली होती. त्यांनी गुंतवणूकदारांना गुजरातमधील 'धोलेरा स्मार्ट सिटी'त फ्लॅट्स, प्लॉट्स आणि मोठ्या परताव्याचं आमिष दाखवून पैसे उकळले.

सुभाष आणि रणवीर यांनी दावा केला की त्यांच्याकडे मोठी जमीन आहे, जी धोलेरा स्मार्ट सिटीच्या विकासासाठी वापरली जाणार आहे. लोकांना गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचं आमिष दाखवण्यात आलं. "लेव्हल इनकम", रेफरल कमिशन आणि विविध भेटवस्तू (लॅपटॉप, बाईक्स, कार्स) दिल्या जात होत्या, ज्यामुळे गुंतवणूकदार आकर्षित झाले. यामध्ये राजस्थानभर एजंट्स नेमले गेले. ज्यांना मोठ्या प्रमाणावर कमिशन देण्यात आलं. तब्बल १५०० कोटी रुपये केवळ कमिशनमध्ये वाटण्यात आले.


या रकमेपैकी बऱ्याच भागात त्यांनी जमीन, लक्झरी गाड्या, हॉटेल्स, खाण प्रकल्प, अहमदाबादमधील फ्लॅट्स आणि गोव्यात २५ रिसॉर्ट्स विकत घेतले. २५० कोटी रुपये रोख स्वरूपात घेतले गेले आणि उरलेले पैसे २७ शेल कंपन्यांमध्ये ट्रान्सफर करण्यात आले त्यानंतर सर्व कार्यालयं बंद करून आरोपी फरार झाले.

राजस्थानमधील जोधपूर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून चौकशी सुरू आहे. अंमलबजावणी संचालनालय (ED) ने जयपूर, सीकर, झुंझुनू आणि अहमदाबादमध्ये २५ ठिकाणी छापे टाकले. हा सर्व प्रकार 'धोलेरा स्मार्ट सिटी घोटाळा' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

## 'कांतारा'च्या शुटिंगवेळी दुर्घटना
### ऋषभ शेट्टीसह ३० क्रू मेंबर्स बचावले

**शिवमोग्गा, दि. १५ वृत्तसंस्था**

कन्नड चित्रपट 'कांतारा: चॅप्टर 1' च्या चित्रीकरणादरम्यान बोट जलाशयात पलटली. ही दुर्घटना शिवमोग्गा जिल्ह्यातील मस्ती कट्टे परिसरातील मणी तलावात चित्रीकरणादरम्यान घडली. अभिनेता ऋषभ शेट्टीसह ३० क्रू मेंबर्स थोडक्यात बचावले.



या दुर्घटनेबाबत माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, कन्नड चित्रपट 'कांतारा: चॅप्टर 1 च्या चित्रीकरण शिवमोग्गा जिल्ह्यातील मस्ती कट्टे परिसरातील मणि तलावात सुरू होते. तलावाच्या उथळ भागात बोट पलटली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. अभिनेता-दिग्दर्शक ऋषभ शेट्टी आणि ३० क्रू मेंबर्स या अपघातातून सुखरूप बचावले आहेत. कॅमेर आणि अन्य साहित्य पाण्यात बुडल्याचे सांगण्यात येत आहे. आर्थिक नुकसानीबाबत अद्याप कोणतीही माहिती निर्मात्यांनी दिलेली नाही. पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत.

क्रू मेंबरने सांगितले की, बोट पलटली तेव्हा काही क्रू मेंबर्स घाबरले होते; परंतु बोट उथळ पाण्यात असल्याने ते सर्वजण सुरक्षितपणे बाहेर पडले. दरम्यान, शनिवार, १४ जून रोजी मिमिक्री कलाकार कलाभवन निजू यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गुरुवारी ते बेंगळुरूमध्ये 'कांतारा २' चित्रपटाचे चित्रीकरण करत होते. 'कांतारा २' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान ४३ वर्षीय कलाभवन यांना छातीत दुखू लागले, त्यांना रुग्णालयात नेण्यात आले पण उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

## सरफराज खानचे 'वनडे स्टाईल' शतक

**बेकेनहॅम, दि. १५ वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या आगामी ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात मधल्या फळीतील फलंदाज सरफराज खानला स्थान मिळाले नाही. ८ वर्षांनंतर कसोटी संघात पुनरागमन करणाऱ्या सरफराज खानपेक्षा अनुभवी फलंदाज करुण नायरला प्राधान्य देण्यात आले. पण संघातून वगळल्यानंतर सरफराज खान इंग्लंडमध्ये खूप धावा करत आहे. सरफराज खानने अलीकडेच इंग्लंड लायन्सविरुद्धच्या पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात इंडिया-अ साठी ९२ धावांची शानदार खेळी केली होती. आता सरफराज खानने इंट्रा-स्क्वॉड सामन्यात शतक झळकावले आहे. हा सामना बेकेनहॅम येथील काउंटी ग्राउंडवर भारत आणि इंडिया-अ दरम्यान खेळला जात आहे.

इंट्रा-स्क्वॉड सामन्याच्या दुसऱ्या दिवशी सरफराज खानने इंडिया-अ साठी ७६ चेंडूत १०१ धावा केल्या. त्यात ज्यामध्ये १५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. शतक पूर्ण केल्यानंतर तो रिटायर्ड झाला. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी टीम इंडियाचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि एनसीए प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण देखील स्टेडियममध्ये उपस्थित होते.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**